

परम पूज्य तपश्चर्या–चक्रवर्ती पट्टाधीशाचार्यश्री

## सुविधिसागर जी महाराज

के

50 वें जन्मदिवस के पावन अवसर पर

सुविधि–परिवार के द्वारा आयोजित

## जिनवाणी-महोत्सव

# सहस्रग्रन्थसंग्रह


* जन्मदिवस 19–03–1971 * मुनिदीक्षा–11–05–1989 * आचार्यपद– 20–06–2004

पट्टाधीशपद– 24–12–2010 (20–06–2004 को की गई उद्घोषणा के अनुसार)

परम पूज्य आचार्यश्री सन्मतिसागर जी महाराज के द्वारा की गई उद्घोषणा:–

हमारी समाधि के पश्चात् आपको इस संघ के संचालकपद पर नियुक्त करते हैं।

(अंकलीकर वाणी–जुलाई 2004) (अक्षयज्योति–अक्तूबर 2004)



# अपभ्रंश व्याकरण

ग्रन्थकर्त्ता

**आचार्य हेमचन्द्र जी**

अनुवादक

**के. वा. आप्टे**

प्रकाशक

**मराठी संशोधन मण्डल**

**मुम्बई (महाराष्ट्र)**

(परम्परानायक)



परम पूज्य चारित्र–चक्रवर्ती,
आचार्यश्री आदिसागर जी महाराज
(अंकलीकर)

(द्वितीय पट्टाधीश)



परम पूज्य तीर्थभक्त–शिरोमणि,
आचार्यश्री महावीरकीर्ति जी महाराज

(तृतीय पट्टाधीश)



परम पूज्य सिद्धान्त–चक्रवर्ती,
आचार्यश्री सन्मतिसागर जी महाराज

(चतुर्थ पट्टाधीश)



परम पूज्य तपश्चर्या–चक्रवर्ती, आचार्यश्री सुविधिसागर जी महाराज

दिगम्बर साधु निरन्तर पगविहार करते रहते हैं। ग्रन्थभण्डार को साथ में रख कर विहार करना अशक्यप्राय: होता है। फलत: उनको ग्रन्थों के सन्दर्भ देखने में असुविधा होती है। उनकी सुविधा के लिये इस कोश का निर्माण किया गया है। इस कोश के निर्माण में किसी भी प्रकार का व्यापारिक हेतु नहीं है।

आर्थिक दृष्टि से सम्पन्न श्रावकबन्धुओं से निवेदन है कि वे ग्रन्थ का विक्रय कर अध्ययन करने की परम्परा को कायम रखें।

मुखपृष्ठ पर हमने ग्रन्थकर्त्ता, अनुवादक, सम्पादक, प्रकाशक आदि के नाम दिये हैं। किसी संस्थान का कर्तुत्व हमने लुप्त नहीं किया है।

इस कोश के लिये आवश्यक ग्रन्थ हमें अनेक स्रोतों से प्राप्त हुये हैं। हम उन सभी का आभार मानते हैं।

सुविधि–परिवार

हेमचंद्रकृत

# अपभ्रंश-व्याकरण

(मराठी भाषांतर)

भाषांतरकार

के. वा. आपटे

मराठी संशोधनमंडळ

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय,

१७२, नायगाव क्रास रोड,

दादर, मुंबई १४

१९६३

किंमत रुपये २.५०

# प्रास्ताविक

## हेमचंद्राचें प्राकृत-व्याकरण —

जैनधर्मीयात हेमचद्र (इ स १०८८-११७२) हा फार सुप्रसिद्ध आहे त्यानें अनेक ग्रंथ लिहिलेले आहेत सिद्धराजाच्या सूचनेवरून हेमचद्रानें आपलें प्राकृत-व्याकरण लिहिलें आणि त्याला 'सिद्ध-हेम-शब्दानुशासन' असें नाव दिलें

हेमचंद्राच्या या प्राकृत-व्याकरणात आठ अध्याय आहेत त्यातील पहिले सात अध्याय संस्कृत व्याकरणावर आहेत शेवटचा आठवा अध्याय माहाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, पैशाची, चूलिका पैशाची आणि अपभ्रंश या प्राकृत भाषाचें व्याकरण स्पष्ट करतो हेमचद्राचें हें प्राकृत-व्याकरण विस्तृत व प्रमाणभूत आहे या प्राकृत-व्याकरणाच्या नियमाचीं उदाहरणें हेमचद्रकृत कुमारपालचरित या ग्रंथातहि आढळतात

उपर्युक्त आठव्या अध्यायाचे चार पाद आहेत त्यापैकीं चौथ्या पादांतील सूत्र ३२९ पासून सूत्र ४४६ पर्यंत अपभ्रंश व्याकरणाचा विचार हेमचद्रानें केला आहे अपभ्रंशाला महत्त्वाचें स्थान देऊन, तिचें सविस्तर व सोदाहरण विवेचन करणारा हेमचद्र हाच पहिला व्याकरणकार होय नतरच्या प्राकृत-वैयाकरणानीं हेमचद्राचें अनुकरण केले आहे येथेंच हें सागण्यास हरकत नाहीं : इतर व्याकरणकारानीं सागितलेले अपभ्रंशाचे उपप्रकार मात्र हेमचद्रानें सागितलेले नाहींत

## अपभ्रंश —

अपभ्रंश म्हणजे काय याचीं विविध स्पष्टीकरणें पूर्व ग्रथात आढळतात अपभ्रंश शब्दाचा जुन्यातला जुना उपयोग पतंजलीच्या महाभाष्यात आढळतो संस्कृतच्या दृष्टीनें जी अपभ्रष्टता ती अपभ्रंश, असा त्याचा रोल आहे (भूयांसोऽपशब्दा अल्पीयास शब्दा इति। एकैकस्य हि शब्दस्य बहवोऽपभ्रंशा तद् यथा गौरित्यस्य शब्दस्य गावी गोणी गोता गोपोतालिका, इत्यादयो बहवोऽपभ्रंशा।-महाभाष्य, १ १ १) भामहानें केलेल्या अपभ्रंशाच्या उल्लेखावरून (शब्दार्थौ सहितौ काव्य गद्य पद्य च तद् द्विधा। संस्कृत प्राकृत चान्यदपभ्रंश इति त्रिधा॥-काव्यालकार १ ३६) अपभ्रंश शब्दाच्या अर्थावर फारसा प्रकाश पडत नाहीं दडीनें अपभ्रंश शब्दाचे दोन अर्थ सांगितल आहेत काव्यामध्ये आभीर इत्यादींची भाषा ती अपभ्रंश, परतु शास्त्रात मात्र अपभ्रंश म्हणजे संस्कृतेतर भाषा (आभीरादि-गिर काव्येष्वपभ्रंशतया स्मृता। शास्त्रे तु संस्कृतादन्य-दपभ्रंशतयोदितम्॥- काव्यादर्श, १ ३६) रुद्रटाच्या मतें "देश-विशेषादपभ्रंश" (काव्यालकार, २ १२) (यावरील टीकेंत 'प्राकृतमेवापभ्रंश' असें नमिसाधूनें म्हटलें आहे) त्या त्या देशातील शुद्ध भाषा म्हणजे अपभ्रंश, असें वाग्भट सांगतो (अपभ्रंशस्तु

यच्चुर्द तत्तद्देशेषु भाषितम्।-काव्यालंकार, २·३) पिशेल, ग्रीयर्सन, इत्यादि आधुनिक विद्वानांचीहि अपभ्रंशाबद्दल विविध मतें आहेत

अपभ्रंशाचे अनेक प्रकार मानले गेले आहेत. नमिसाधूनें उपनागर, आभीर आणि ग्राम्य या प्रकाराचा उल्लेख केला आहे. मार्कंडेयानें अपभ्रंशाचे २७ उपप्रकार सांगितले असून, त्यातील नागर, उपनागर व व्राचड हे महत्त्वाचे आहेत, असें तो म्हणतो. हेमचंद्रानें मात्र उपप्रकार असे कांहीं सांगितलेले नाहींत

राजशेखरानें म्हटलें आहे कीं, मारवाड (मरू), टक्क आणि भादानक प्रदेशातील भाषा-प्रयोग अपभ्रंश-मिश्र आहेत (सापभ्रंशप्रयोगाः सकल-मरूभुवटक्क-भादानकाश्च।-काव्यमीमांसा, पृ. ३४). गुर्जरांना अपभ्रंशानें आनंद होतो, असें भोजानें सांगून ठेवलें आहे. (अपभ्रंशेन तुष्यन्ति स्वेन नान्येन गुर्जराः।-सरस्वती-कंठाभरण २ १३).

अपभ्रंश फार भव्य आहे, असें राजशेखर म्हणतो (सुभव्योऽपभ्रंशः।-बाल-रामायण १·११). कुवलयमालाकार उद्योतन हा संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश यांचें वर्णन असें करतो; संस्कृत हें 'दुज्जण-हिययं विव विसम,' प्राकृत हें 'सज्जण-वयणं पिव सुह-संगयं,' आणि अपभ्रंश हें "पणय-कुविय-पिय-पणइणि-समुल्लाव-सरिसं मणोहरं."

### अपभ्रंश आणि मराठी :—

अर्वाचीन भारतीय आर्य-भाषांच्या-गुजराती, मराठी, हिंदी, इत्यादींच्या-अभ्यासात संस्कृत व प्राकृत याप्रमाणेंच अपभ्रंश भाषेलाहि महत्त्वाचें स्थान आहे.

अपभ्रंश व मराठी यांचा परस्परसंबंध काय, हा एक विद्वानांत वादाचा विषय आहे. तो संबंध कोणताहि असो, अपभ्रंशाचा कांहीं प्रमाणात मराठीवर प्रभाव पडला आहे, हें पुढील गोष्टींवरून स्पष्ट होईल :

### रूपविचार :—

(अ) (१) अपभ्रंशातल्याप्रमाणें (सू. ३३१), जुन्या मराठींत अकारान्त शब्दांची प्रथमा ए. व. चीं उकारान्त रूपें आढळतात. उदा. :—गणेशु (ज्ञानेश्वरी १·२), मोदकु, अंकुशु (ज्ञानेश्वरी १·११). (२) मराठींतील तृतीया ए. व. चीं एकारान्त रूपें हीं सरळ अपभ्रंशावरून (सू. ३३३, ३४२). उदा. :—नावें, विवेकें, दैवें, इ. (३) मराठींत पंचमीचा 'हून' हा प्रत्यय आहे. त्याचीं कांहीं स्पष्टीकरणें देण्यात आलेलीं आहेत. तथापि, अपभ्रंशातील पंचमीच्या 'हुं' प्रत्ययावरून (सू. ३४१) मराठींतील 'हून' प्रत्यय आला, हें अधिक सयुक्तिक वाटतें. (४) मराठींतील सप्तमी ए. व (उदा. :—घरीं, दारीं, इ.) अपभ्रंशातील तृतीया व सप्तमी, ए. व. यावरून आलें आहे. (५) संबोधनाचा 'हो' हा प्रत्यय अपभ्रंशांत आहे. (सू. ३४६). हा

प्रत्यय मराठींत जशाच्या तसा आला आहे. उदा. :—लोकहो, सज्जनहो, इ. (आ) (१) अपभ्रंशांत वर्तमानकाळ प्र. पु. ए. चा उं प्रत्यय आहे. मराठींतील पुढील रूपें पहा : जाणों, नेणों, पुसों, इ. (*राजवाडेकृत ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें* व्याकरण, पृ. ७६). वर्तमान. प्र. पु ए. व. च्या 'तो' या प्रत्ययांतहि हा ओ आहे.

(२) अपभ्रंशांत आज्ञार्थ द्वि. पु ए. व. चे इ, उ, ए असे प्रत्यय आहेत (सू. ३८७). मराठींतील आज्ञार्थाची पुढील रूपें पहा : न धरी शंका, न रहे उगा; इ. (३) मराठींतील विध्यर्थी रूपें अपभ्रंशांतील एव्वउं, एवा (सू. ४३८) या प्रत्ययान्त वि. क. धा. वि. च्या रूपांपर्यंत भिडविता येतात (इ.) (१) अपभ्रंशांत किम् या सर्वनामाचे 'काइ' व 'कवण' असे आदेश होतात (सू. ३६७). हे दोन्ही 'काहीं' *आणि 'कवण' व 'कोण' या स्वरूपांत मराठींत आढळतात.* (२) जुन्या मराठींतील तुम्हीं व आम्हीं हीं सानुनासिक रूपें अपभ्रंशांतील तुम्हइं। (सू. ३६९) व अम्हइं (सू. ३७६) या रूपावरून आलीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. (३) मराठींतील पैं व पां यांचा संबंध अपभ्रंशांतील युष्मद्च्या द्वितीया एकवचनी पइं (सू. ३७०) यांशीं असण्याची शक्यता आहे.

शब्द :—

अपभ्रंशांत जे कांहीं देशी शब्द आढळतात, त्यांतील अनेकांचीं मराठी प्रतिरूपें आढळतात. उदा :—छोल्ल-सोलणें, झलक्क-झळकणें, खुडुक्क-खुडुक (होऊन वसणें), घुडुक्क-गडगडणें, चंप-चेंपी, चापेंग, विट्टाल-विटाळ, कुड्ड-कोड, दड्वड-दड्वादड्वी (ख्रिस्तपुराण १·२३·३३), उड्ड-बईस-ऊठबैस, घुंट-घुटुघुट्; इत्यादि. तसेंच, अपभ्रंश भाषेंत 'इव' च्या अर्थी येणारा 'जणु' हा आदेश (सू. ४४४) मराठींत 'जणुं' या स्वरूपांत आढळतो.

वर्णविकार :—

संस्कृत शब्द अपभ्रंशांत येतांना त्यांत कांहीं विकार होतात. अपभ्रंशांतल्याप्रमाणें मराठींत आढळणारे पुढील विकार पहा :-(१) म-वँ (सू. ३९७)- वँ :-ग्राम-गांव, नाम-नांव, इ. (२) यथा तथा-जिवँ तिवँ (सू ४०१) :—जंव तंव (३) यादृश, तादृश, कीदृश—जइस, तइस, कइस (सू ४०३) :— जैसा, तैसा, कैसा, (४) यत्र, तत्र, अत्र,—जेत्थु, तेत्थु एत्थु, (सू ४०४-४०५) :— जेथें, तेथें, एथें (५) यावत् तावत्—जावँहि (जामहि) तावँहि (तामहि) :— जेव्हां तेव्हां (६) जेवडु तेवडु (सू. ४०७), एवडु, केवडु (सू ४०८) :— जेवढा, तेवढा, एवढा, केवढा.

तद्धितें :—

(१) मराठींतील पुढें दिलेलीं व तसलींच इतर स्वार्थे प्रत्ययान्त रूपें अपभ्रंशांतून आलेलीं आहेत :— *म्हातारडा, घेरडा, तांबडा, मुखडा; दुबळी, कोरडें, आंतडें, चामडें;*

जिमल्ली, दिवली ( सू. ४२९-४३० पहा ). ( २ ) मराठींतील भाववाचक नामें साधण्याचा 'पणा' हा प्रत्यय अपभ्रंशातील 'प्पण' ( सू. ४३७ ) या प्रत्ययावरून आहे हें अगदीं स्पष्ट आहे.

**इतर :—**

आणखी एका बाबतींत अपभ्रंशाचा मराठीवर प्रभाव पडला आहे. अपभ्रंशातील पद्यात प्राय पादान्तीं यमक आढळतें. बरोबर हीच प्रवृत्ति मराठींतील पद्यातहि आढळते.

वरील विवेचनावरून एक गोष्ट प्रामुख्यानें स्पष्ट होते कीं, काहीं प्रमाणात का होईना अपभ्रंश भाषेनें मराठीवर आपला स्वत:चा प्रभाव पाडला आहे.

**प्रस्तुत पुस्तकांत अवलंबिलेली पद्धति :—**

प्रथम हेमचंद्राचीं संस्कृतमधील सूत्रें व त्यावरील त्याची वृत्ति, व मग त्याचें मराठींत भाषांतर दिलें आहे. सूत्राचा मथितार्थ वृत्तींत येत असल्यानें सूत्राचें भाषांतर स्वतंत्ररीत्या दिलेलें नाहीं. तथापि, सूत्रात आलेल्या काहीं पारिभाषिक संज्ञा टीपात स्पष्ट केल्या आहेत. मुळात नसलेले पण भाषांतरात आवश्यक असे शब्द (          ) अशा कंसात ठेवले आहेत. मूळ सूत्रपाठातल्याप्रमाणेंच सूत्राचे क्रमांक ठेवले आहेत. उदाहरणातील *पद्यांना त्या सूत्राखालीं एक, दोन, इत्यादि क्रमांक दिले आहेत. मागील सूत्राखालीं* येऊन गेलेलीं जीं पद्यें पुनः पुढें आलेलीं आहेत, तेथें त्या पद्यांचीं पूर्वींचीं स्थानें ( सूत्र व पद्य क्रमांक ) कंसात दिलेलीं आहेत; त्याचें भाषांतर मात्र पुनः दिलेलें नाहीं उदाहरणांतील शब्द, वा वाक्यें अथवा पद्यें याची संस्कृत छाया (          ) अशा कंसात दिली असून मग त्याचे अर्थ सांगितले आहेत. अधिक स्पष्टीकरण [          ] अशा कंसात ठेवलें आहे. मुद्रित अपभ्रंश-भागात व्यंजन-संपृक्त ए वा ओ अथवा स्वतंत्र ए किंवा ओ यावरील ˘ ही खूण त्याचें ह्रस्व उच्चारण दर्शविण्यास वापरली आहे. तसेंच, काहीं ठिकाणीं तळटीपा दिल्या आहेत या खेरीज, आवश्यक तो स्पष्टीकरणात्मक भाग व काहीं तुलनात्मक भाग शेवटीं टीपात दिला आहे. या टीपामध्यें, पूर्वे सूत्राखालीं आलेल्या काहीं शब्दाच्या रूपांसाठीं तीं तीं पुढील सूत्रें पहाण्यास सांगितलें आहे. संक्षेपाचें स्पष्टीकरण स्वतंत्र स्थानीं दिलें आहे.

**आभार प्रदर्शन :—**

प्रस्तुत पुस्तक लिहिताना ज्यांच्या ग्रंथांचा उपयोग झाला त्या सर्व पूर्वसूरींचा मी ऋणी आहें. गु डॉ. म. गो. माईणकर, गु. प्रा. ह. दा. वेलणकर, प्रा डॉ. स गं. मालशे, प्रा. के. पा. जोग, प्रा. मु आ गावस्कर, प्रा. गो रा. राणे, प्रा. गो. मा काळे यानीं दिलेलें प्रोत्साहन व साहाय्य याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. कच्चीं मुद्रितें तपासण्यात प्रा श्री. तु. निमकर यानीं केलेल्या साहाय्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें प्रा अ का. प्रियोळकर यानीं हा ग्रंथ मोठ्या आपुलकीनें प्रसिद्ध केला, याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

मुंबई
दि. ९-१०-६२ } के वा. आपटे

## अनुक्रमणिका


| विषय | सूत्र |
|---|---|
| स्वरांचे स्थानी स्वर | ३२९ |
| विभक्तिप्रत्ययांपूर्वी नामाच्या अन्त्य स्वराचें ह्रस्व वा दीर्घ होणें | ३३० |
| अकारान्त शब्दांची रूपें | ३३१-३३९ |
| इकारान्त व उकारान्त शब्दांची रूपें | ३४०-३४१ |
| अकारान्त शब्दांचें तृ. ए. व. | ३४२ |
| इकारान्त व उकारान्त शब्दांचें तृतीया एकवचन | ३४३ |
| प्रथमा ए. व., द्वि. ए. व., प्रथमा अ. व., द्वितीया अ. व. प्रत्ययांचा लोप | ३४४ |
| षष्ठीच्या प्रत्ययाचा लोप | ३४५ |
| संबोधन | ३४६ |
| तृतीया अ. व. आणि सप्तमी अ. व. | ३४७ |
| स्त्रीलिंगी नामांची रूपें | ३४८-३५२ |
| नपुं. शब्दांची रूपें | ३५३ |
| ककारान्त नपुं. नामें | ३५४ |
| सर्वनामांची रूपें | ३५५-३६४ |
| इदम् चें अग आय | ३६५ |
| सर्वचा वैकल्पिक आदेश साह | ३६६ |
| किम्चे वैकल्पिक आदेश काई व कवण | ३६७ |
| युष्मद्ची रूपें | ३६८-३७४ |
| अस्मद्ची रूपें | ३७५-३८१ |
| वर्तमानकाळ | ३८२-३८६ |
| आज्ञार्थ द्वि. पु. ए. व. | ३८७ |
| भविष्यकाळाचा 'स' | ३८८ |
| क्रियेचा आदेश कीसु | ३८९ |
| भू चा ,, हुच्च | ३९० |
| ब्रू चा ,, ब्रुव | ३९१ |
| व्रज् चा ,, वुञ | ३९२ |
| दृश् चा ,, प्रस्स | ३९३ |
| ग्रह्चा आदेश गृण्ह | ३९४ |
| तक्ष् इत्यादींचे छोल्ल इत्यादि आदेश | ३९५ |

| | |
|---|---|
| अनादि असंयुक्त क्, ख, त्, थ्, प्, फ् याचे विकार | ३९६ |
| अनादि असंयुक्त म चा विकार | ३९७ |
| संयुक्त व्यंजनातील रेफ | ३९८ |
| रेफाचा आगम | ३९९ |
| आपद्, विपद्, संपद् याचे विकार | ४०० |
| कथं, यथा, तथा याचे विकार | ४०१ |
| यादृक्, तादृक्, कीदृक्, व ईदृक् याचे विकार | ४०२ |
| यादृश, तादृश, कीदृश, व ईदृश याचे विकार | ४०३ |
| यत्र, तत्र, कुत्र, अत्र याचे विकार | ४०४–४०५ |
| यावद्, तावद् याचे विकार | ४०६–४०७ |
| इयत्, कियत् याचे विकार | ४०८ |
| परस्पर चा विकार | ४०९ |
| व्यंजनसंपृक्त ए, ओ याचें उच्चारण | ४१० |
| पदान्तीच्या उं, हुं, हिं, हं याचें उच्चारण | ४११ |
| म्ह चा म्भ | ४१२ |
| अन्यादृश चे विकार | ४१३ |
| प्रायस्चे आदेश | ४१४ |
| अन्यथा चा आदेश | ४१५ |
| कुतस् चे आदेश | ४१६ |
| ततस् व तदा याचा आदेश | ४१७ |
| एवं, परं, समं, ध्रुव, मा, मनाक्, किल, अथवा, दिवा, सह, नहि, पश्चाद्, एवमेव, एव, इदानीम्, प्रत्युत, इतस् याचे आदेश | ४१८–४२० |
| विषण्ण, उक्त, वर्त्मन् यांचे आदेश | ४२१ |
| शीघ्र इत्यादींचे वहिल्ल इत्यादि आदेश | ४२२ |
| हुहुरु, घुग्घ इत्यादींचे उपयोग | ४२३ |
| घइं इत्यादींचे उपयोग | ४२४ |
| तादर्थ्यी निपात | ४२५ |
| पुनर्, विना, अवश्यं, एकशः याचे स्वार्थे प्रत्यय | ४२६–४२८ |

| | |
|---|---|
| स्वार्थे प्रत्यय | ४२९ |
| स्वार्थे प्रत्ययाचे संयोगानें होणारे स्वार्थे प्रत्यय | ४३० |
| स्त्रीलिंगी शब्दांची स्वार्थे रूपें | ४३१ |
| वरील नियमाचा अपवाद, इत्यादि | ४३२-४३३ |
| ईय प्रत्ययाचा डार आदेश | ४३४ |
| अतु प्रत्ययाचा आदेश | ४३५ |
| त्र प्रत्ययाचा आदेश | ४३६ |
| त्व, तल् प्रत्ययाचे आदेश | ४३७ |
| तव्य प्रत्ययाचे आदेश | ४३८ |
| क्त्वा प्रत्ययाचे आदेश | ४३९-४४० |
| तुम् प्रत्ययाचे आदेश | ४४१ |
| गम् धातूला एप्पि, एप्पिणु हे प्रत्यय लागताना | ४४२ |
| तृन् प्रत्ययाचा आदेश | ४४३ |
| इव चे अर्थी येणारे शब्द | ४४४ |
| लिंगविचार | ४४५ |
| शौरसेनीप्रमाणें कार्य | ४४६ |
| सामान्य उपसंहार | ४४७-४४८ |
| सूत्रसूची | |

## संक्षेप

### (अकारानुक्रमानें)

| | |
|---|---|
| अ. व. | अनेक वचन |
| ए. व | एक वचन |
| गी ल. को | गीर्वाण लघुकोश |
| च | चतुर्थी |
| जु. म. | जुने मराठी |
| तृ | तृतीया |
| तृ पु | तृतीय पुरुष |
| द्वि. | द्वितीया |
| द्वि पु | द्वितीय पुरुष |
| पं. | पंचमी |
| प्र. | प्रथमा |
| प्र. पु | प्रथम पुरुष |
| ब. व | बहुवचन |
| म. | मराठी |
| व. का. धा वि | वर्तमान कालवाचक धातुसाधित विशेषण |
| वि. क धा. वि. | विध्यर्थी कर्मणि धातु-साधित विशेषण |
| श. | शब्दशः |
| ष. | षष्ठी |
| स. | सप्तमी |
| सं. | संबोधन |
| सि. कौ. | सिद्धांतकौमुदी |
| सू. | सूत्र |
| हेम. | हेमचंद्रकृत प्राकृत व्याकर |

# हेमचंद्रकृत
# अपभ्रंश-व्याकरण

**स्वराणां स्वराः प्रायोऽपभ्रंशे ॥ ३२९ ॥**
**अपभ्रंशे स्वराणां स्थाने प्रायः स्वराः भवन्ति ।**

अपभ्रंश भाषेत स्वरांच्या स्थानीं प्रायः (इतर) स्वर येतात. उदा —

**कच्चु, काच्च** (क्वचित्) **वेण, वीण** (वेणी) **बाह, बाहा, बाहु,** (बाहु) **पट्ठि, पिट्ठि, पुट्ठि** (पृष्ठ) **तणु, तिणु, तृणु** (तृणम्) **सुकिदु, सुकिओ, सुकृदु** (सुकृतम्) **किन्नओ, किलिन्नओ** (क्लिन्न) **लिह, लीह, लेह** (लेखा) **गउरि, गोरि** (गौरी)

*प्रायोग्रहणाद्यस्यापभ्रंशे विशेषो वक्ष्यते तस्यापि क्वचित् प्राकृतवत् शौरसेनीवच्च* कार्यं भवति ।

(सूत्रातील) 'प्राय' या शब्दाने असें दर्शविलें जातें की ज्या [शब्दा]चा अपभ्रंश भाषेंत विशेष सांगितला आहे त्याच मुद्धां क्वचित् (माहाराष्ट्री) प्राकृत व शौरसेनीप्रमाणें कार्य होतें.

**स्यादौ दीर्घ-ह्रस्वौ ॥ ३३० ॥**
**अपभ्रंशे नाम्नोन्त्यस्वरस्य दीर्घह्रस्वौ स्यादौ प्रायो भवतः ।**

अपभ्रंशात विभक्ति प्रत्ययापूर्वी (स्यादौ) नामाचा अन्त्य (ह्रस्व वा दीर्घ) स्वर प्रायः दीर्घ वा ह्रस्व होतो. उदा —

**सौ ।** प्रथमा एकवचनाच्या प्रत्ययापूर्वी —
**ढोल्ला सामला धण चंपावण्णी ।**
**णाइ सुवण्णरेह कसवट्टइ दिण्णी ॥ १ ॥**
(विट श्यामः धन्या चम्पकवर्णा ।
इव सुवर्णरेखा कषपट्टके दत्ता ॥)

प्रियकर श्यामल वर्णाचा आहे. प्रिया (धण) चंपकवर्णी आहे. ती कसोटीच्या (काळ्या) दगडावर ओढलेल्या सुवर्णाच्या रेखेप्रमाणें दिसते.

[ येथें, ढोल्ल व सामल या (पुल्लिंगी) शब्दाच्या अन्त्य 'अ'चा दीर्घ म्हणजे आ झाला आहे. 'धण''व' सुवण्णरेह' या (स्त्रीलिंगी) शब्दाच्या अन्त्य 'आ' चा ह्रस्व म्हणजे 'अ' झाला आहे. ]

आमन्त्र्ये । संबोधन विभक्तीत :—

**ढोल्ला मइँ तुहुँ वारिया मा कुरु दीहा माणु ।**
**निद्दए गमिही रत्तडी दडवड होइ विहाणु ॥ २ ॥**

( विट मया त्वं वारित मा कुरु दीर्घं मानम् ।
*निद्रया गमिष्यति रात्रि शीघ्रं ( दडवड ) भवति विभातम् ॥* )

हे प्रिया, मी तुला सांगितले होते की दीर्घ काळ मान धरू नको, ( कारण ) झोपेत रात्र सपून जाईल आणि लौकर प्रभात होईल

[येथें, 'ढोल्ल' शब्दाच्या अन्त्य 'अ' चा दीर्घ म्हणजे 'आ' झाला आहे ]

स्त्रियाम् । स्त्रीलिंगी शब्दात ( सुद्धा अन्त्य ऱ्हस्व वा दीर्घ स्वराचा दीर्घ वा ऱ्हस्व होतो ) उदा —

**बिट्टीए मइ भणिय तुहुँ मा करु वंकी दिट्ठि ।**
**पुत्ति, सकण्णी भल्लि जिवँ मारइ हिअइ पइट्ठि ॥ ३ ॥**
( पुत्रि ( बिट्टीए ) मया भणिता त्वं मा कुरु वक्रां दृष्टिम् ।
पुत्रि सकर्णा भल्लिर्यथा मारयति हृदये प्रविष्टा ॥ )

मुली, मी तुला सांगितले होते की वक्र दृष्टि करू नको ( कारण ) हे मुली, ( ही वक्र दृष्टि ) अणकुचीदार ( धारदार ) भाल्याप्रमाणे ( दुसऱ्याच्या ) हृदयात प्रविष्ट होऊन त्याला ठार करते

[ येथें, दिट्ठि, पइट्ठि, भणिय या शब्दात दीर्घ स्वराचा ऱ्हस्व स्वर झाला आहे ]

जसि । प्रथमा अनेकवचनात —

**एइ ति घोडा एह थलि एइ निसिआ खग्ग ।**
**एत्थु मुणीसिम जाणिअइ जो नवि वालइ वग्ग ॥ ४ ॥**
( एते ते अश्वा ( घोडा ) एषा स्थली एते ते निशिता खड्ग ।
अत्र मनुष्यत्वं ( पौरुष ) ज्ञायते य नापि वालयति वल्गाम् ॥ )

हे ते घोडे, ही [ती] [युद्ध-] भूमि, हे ते तीक्ष्ण खड्ग, जो घोड्याचा लगाम ( मागे ) खेचीत नाही ( तर रणक्षेत्रावर युद्ध करीत रहातो ) येथ पौरुषाची परीक्षा होते

[ येथें, 'घोडा' व 'निसिआ' मध्ये ऱ्हस्व स्वराचा दीर्घ झाला आहे, आणि 'खग्ग' आणि 'वग्ग' मध्ये दीर्घ स्वराचा ऱ्हस्व झाला आहे ]

**स्यमोरस्योत् ॥ ३३१ ॥**

**अपभ्रंशे अकारस्य स्यमो परयो उकारो भवति ।**

अपभ्रंश भाषेत प्रथमा ए व आणि द्वितीया ए व या प्रत्ययापूर्वी (शब्दाच्या अन्त्य) अकाराचा उकार होतो उदा —

> दहमुहु भुवणभयंकरु तोसिअ-संकरु
> णिग्गउ रहवरि चडिअउ।
> चउमुहु छंमुहु झाइवि एक्कहिं लाइवि
> णावइ दइवें घडिअउ ॥ १ ॥
> (दशमुखः भुवनभयङ्करः तोषितशङ्करः
> निर्गतः रथवरे (रथोपरि) आरूढः
> चतुर्मुखं षण्मुखं ध्यात्वा एकस्मिन्
> लगित्वा इव दैवेन घटितः ॥)

भुवनभयंकर असा रावण (दशमुख) शंकराला संतुष्ट करून रथात चढला ब्रह्मदेव कार्तिकेय यांचे ध्यान करून व त्यांना एकत्र करून जणु देवानी त्या (रावणा) ला निर्मिला होता

[येथे दहमुहु भयंकरु संकरु णिग्गउ चडिअउ, घडिअउ या शब्दांत प्रथमा एकवचनात अन्त्य अ चा उ झाला आहे चउमुहु छंमुहु या शब्दांत द्वितीया एकवचनांत अन्त्य अ चा उ झाला आहे ]

## सौ पुंस्योद्वा ॥ ३३२ ॥

अपभ्रंशे पुंल्लिङ्गे वर्तमानस्य नाम्नोकारस्य सौ परे ओकारो वा भवति।

अपभ्रंशात पुल्लिंगात असणाऱ्या नामाच्या अन्त्य अकाराचा प्रथमा एकवचना प्रत्ययापूर्वी विकल्पाने ओकार होतो उदा —

> अगलिअ-नेह निवट्टाहं जोअण लक्खु वि जाउ।
> वरिस-सएण वि जो मिलइ सहि सोक्खहँ सो ठाउ ॥ १ ॥
> (अगलितस्नेहनिर्वृत्तानां योजनलक्षमपि जायताम्।
> वर्षशतेनापि यः मिलति सखि सौख्यानां स स्थानम् ॥)

स्नेह नष्ट झाल्या नसल्याने स्नेहाने परिपूर्ण अशा व्यक्तीमध्ये लाख योजनांचे अंतर असू दे, हे सखी (स्नेह नष्ट न होता) जो शंभर वर्षांनी भेटतो ता सौख्याचे स्थान आहे

[येथे जो व सो या शब्दांत प्रथमा एकवचनात अन्त्य अ चा ओ झालेला आहे ]

पुंसीति किम्। (सूत्रात) पुंसि हा शब्द असे का म्हटले आहे ? (याचे कारण असे की नपुंसकलिंगी शब्दांच्या अन्त्य अ चा विकल्पाने ओ होत नाही उदा –)

अगहिँ अगु न मिलिउ हलि अहरेँ अहरु न पत्तु ।
पिअ जोअंतिहे मुहकमलु एम्वइ सुरउ समत्तु ॥ २ ॥
( अङ्गै अङ्ग न मिलितं सखि ( हलि ) अधरेण अधर न प्राप्त ।
प्रियस्य पश्यन्त्या मुखकमल एव सुरत समाप्तम् ॥ )

सखी, ( प्रियकराच्या ) अगाशी ( माझे ) अग भिडले नाहीं अधराला अधर मिळाला नाहीं प्रियकराचे मुखकमल पहात असतानाच ( आमची ) सुरत-क्रीडा समाप्त झाली

[ येथें, प्रथमा एकवचनी अगु मिलिउ, सुरउ यामध्ये तसेंच द्वितीया एकवचनी कमलु या शब्दात अन्त्य 'अ' चा विकल्पाने ओ होत नाहीं ]

## एट्टि ॥ ३३३ ॥

अपभ्रंशे अकारस्य टायामेकारो भवति।

अपभ्रंशात तृतीया एकवचनात ( शब्दाच्या अन्त्य ) अकाराचा एकार होतो उदा —

जे महु दिण्णा दिअहडा दइएँ पवसन्तेण ।
ताण गणन्तिएँ अगुलिउ जज्जरिआउ नहेण ॥ १ ॥
( ये मम दत्ता दिवसा दयितेन प्रवसता ।
तान् गणयन्त्या ( मम ) अङ्गुल्य जर्जरिता नखेन ॥ )

प्रवासाला निघताना प्रियकराने ( अवधि ) म्हणून जे दिवस सांगितले ते मोजताना ( माझी ) बोटे नखानीं जर्जरित झाली

[ येथें दइएँ मध्ये अन्त्य अकाराचा एकार झाला आहे ]

## ङिनेच्च ॥ ३३४ ॥

अपभ्रंशे अकारस्य ङिना सह इकार एकारश्च भवत ।

अपभ्रंश भाषेत ( शब्दाच्या अन्त्य ) अकाराचा सप्तमी एकवचनी प्रत्ययासह इकार व एकार होतो उदा —

सायरु उप्परि तणु धरइ तलि घल्लइ रयणाइ ।
सामि सुभिच्चु वि परिहरइ सम्माणेइ खलाइ ॥ १ ॥
( सागर उपरि तृणानि धरति तले क्षिपति ( पक्षे ) रत्नानि ।
स्वामी सुभृत्यमपि परिहरति सम्मानयति खलान् ॥ )

सागर गवताला वर ( उचलून ) धरतो आणि रत्नाना तळात ढकलतो ( तद्वत् ) स्वामी चागल्या सेवकाला सोडून देतो आणि खलाचा ( दुष्टाचा ) सन्मान करतो

[ येथें तलि या सप्तमी एकवचनी रूपात अकाराचा प्रत्ययासह इकार झालेला आहे ]

तले घल्लइ । ( तले क्षिपति । )

[ येथें, तले या सप्तमी एकवचनी रूपात अकाराचा एकार झालेला आहे ]

**भिस्येद्वा ॥ ३३५ ॥**

**अपभ्रंशे अकारस्य भिसि परे एकारो वा भवति ।**

अपभ्रंशात तृतीया अनेकवचनी प्रत्ययापूर्वी ( शब्दाच्या अन्त्य ) अकाराचा विकल्पानें एकार होतो उदा —

**गुणहिँ न संपइ कित्ति पर फल लिहिआ भुञ्जन्ति ।**

**केसरि न लहइ बोड्डिअ वि गय लक्खेहिँ घेप्पन्ति ॥ १ ॥**

( गुणै न संपत् कीर्तिः पर ( जना ) फलानि लिखितानि भुञ्जन्ति ।

केसरी कपर्दिकामपि ( बोड्डिअ ) न लभते गजा लक्षै गृह्यन्ते ॥ )

गुणांनीं कीर्ति मिळते, पण संपत्ति मिळत नाहीं ( दैवानें भाळीं ) लिहिलेलीं फळेंच ( लोक ) भोगतात सिंहाला एक कवडीसुद्धा मिळत नाहीं पण हत्तींना लाखो रुपये पडतात

[ येथें, लक्खेहिँ या शब्दात अन्त्य अकाराचा एकार झाला आहे जेव्हां अकाराचा एकार होत नाहीं तेव्हां अकार तसाच रहातो उदा –गुणहिँ ]

**ङसेर्हे-हू ॥ ३३६ ॥**

**अस्येति पञ्चम्यन्तं विपरिणम्यते । अपभ्रंशे अकारात्परस्य ङसेर्हे हु इत्यादेशौ भवत ।** ( सू. ३३१ मधील ) ‘अस्य’ ( = अकारस्य ) हें ( आता ) पञ्चम्यन्त ( म्हणजे ) अकारात् असें बदललें गेलें आहे

अपभ्रंशात ( शब्दाच्या अन्त्य ) अकारापुढं पंचमी एकवचनी प्रत्ययाच ‘हे’ आणि ‘हु’ असे आदेश होतात उदा —

**वच्छहे गृण्हइ फलइ जणु कडुपल्लव वज्जेइ ।**

**तो वि महद्दुमु सुअणु जिवँ ते उच्छङ्गि धरेइ ॥ १ ॥**

( वृक्षात् गृह्णाति फलानि जन कटुपल्लवान् वर्जयति ।

तथापि महाद्रुम सुजन इव तान् उत्सङ्गे धरति ॥ )

लोक वृक्षाचीं फळें घेतात आणि कडु पान्याचा त्याग करतात तथापि सुजनाप्रमाणें महावृक्ष त्याना मांडीवर धारण करतो

[ येथें, वच्छहे या पंचमी एकवचनी रूपात ‘हे’ आदेश आलेला आहे ]

वच्छहु गृण्हइ । ( वृक्षात् गृह्णाति । )

[ येथें, वच्छहु या पंचमी एकवचनी रूपात ‘हु’ आदेश आलेला आहे ]

**भ्यसो हुं ॥ ३३७ ॥**

**अपभ्रंशे अकारात्परस्य भ्यस पञ्चमीबहुवचनस्य हुं इत्यादेशो भवति ।**

अपभ्रंश भाषेत ( शब्दाच्या अन्त्य ) अकारापुढे पंचमी बहुवचनी प्रत्ययाचा 'हुं' असा आदेश होतो उदा —

दूरुड्डाणें पडिउ खलु अप्पणु जणु मारेइ ।
जिह गिरिसिंगहुं पडिअ सिल अन्नु वि चूरु करेइ ॥ १ ॥

( दूरोड्डाणेन पतितः खलः आत्मानं जनं ( च ) मारयति ।
यथा गिरिशृङ्गेभ्यः पतिता शिला अन्यदपि चूर्णीकरोति ॥ )

उंच उड्डाण करून ( मग खाली ) पडलेला खलपुरुष स्वतःला ( व ) ( इतर ) जनांना ठार करतो, जसें गिरिशिखरावरून पडलेली शिला ( स्वतःबरोबर ) इतरांचाहि चूर्ण करते.

[ येथें ०सिंगहुं या पंचमी अनेकवचनी रूपात 'हुं' असा आदेश आहे ]

## ङसः सु हो-स्सवः ॥ ३३८ ॥

अपभ्रंशे अकारात्परस्य ङसः स्थाने सु हो स्सु इति त्रय आदेशा भवन्ति।

अपभ्रंशात ( शब्दाच्या अन्त्य ) अकारापुढे षष्ठी एकवचनी प्रत्ययाच्या स्थानीं 'सु', 'हो' व 'स्सु' असे तीन आदेश होतात उदा —

जो गुण गोवइ अप्पणा पयडा करइ परस्सु ।
तसु हउं कलिजुगि दुल्लहहो बलि किज्जउं सुअणस्सु ॥ १ ॥

[ यः गुणान् गोपयति आत्मीयान् प्रकटान् करोति परस्य ।
तस्य अहं कलियुगे दुर्लभस्य बलिं करोमि सुजनस्य ॥ ]

जो आपले गुण झाकतो व दुसऱ्याचे गुण प्रकट करतो, अशा कलियुगात दुर्लभ असणाऱ्या त्या सज्जनाची मी पूजा करतो.

[ येथें परस्सु, तसु, दुल्लहहो, सुअणस्सु या षष्ठी एकवचनी रूपात 'सु', 'हो' व 'स्सु' हे आदेश आहेत ]

## आमो हं ॥ ३३९ ॥

अपभ्रंशे अकारात्परस्यामो हमित्यादेशो भवति ।

अपभ्रंशात [ शब्दाच्या अन्त्य ] अकारापुढे षष्ठीच्या बहुवचनी प्रत्ययाचा 'हं' असा आदेश होतो उदा —

तणहं तइज्जी भंगि न वि तें अवड-यडि वसन्ति ।
अह जणु लग्गिवि उत्तरइ अह सह सइं मज्जन्ति ॥ १ ॥

[ तृणानां तृतीया भङ्गी नापि [ नैव ] तानि अवटतटे वसन्ति ।
अथ जनः लगित्वा उत्तरति अथ सह स्वयं मज्जन्ति । ]

तृणांना तिसरा मार्ग नाहीं; तीं आडाच्या कांठावर उगवतात; त्यांना धरून लोक (आड) ओलांडतात अथवा त्यांच्यासह तीं स्वतः बुडतात.

[ येथें तणहं या षष्ठी अनेकवचनी रूपात 'हं' आदेश आला आहे ]

## हुं चेदुद्भ्याम् ॥ ३४० ॥

**अपभ्रंशे इकारोकाराभ्यां परस्यामो हुं हं चादेशौ भवतः।**

अपभ्रंशात (शब्दाच्या अन्त्य) इकार व उकार यापुढे षष्ठीच्या बहुवचनी प्रत्ययाचे 'हुं' आणि 'हं' असे आदेश होतात. उदा :—

**दइवु घडावइ वणि तरुहुँ सउणिहँ पक्क फलाइं।**
**सो वरि सुक्खु पइट्ठ ण वि कण्णहिँ खलवयणाइं ॥ १ ॥**

*(देव घटयति वने तरूणां शकुनीनां (कृते) पक्वफलानि।*
*तद् वरं सौख्यं प्रविष्टानि नापि कर्णयोः खलवचनानि ॥)*

*पक्ष्यांच्या साठीं वनात वृक्षावर पिकलीं फळें देवानें निर्माण केलीं आहेत;* तें सुख (असणें) चागलें; पण खलाचीं वचनें कानात प्रविष्ट होणें नको

[येथें, तरुहुँ व सउणिहँ या षष्ठी अनेकवचनी रूपांत 'हु' आणि 'ह' असे आदेश आलेले आहेत ]

## प्रायोधिकारात् क्वचित्सुपोपि हुं।

'प्राय'च्या अधिकारामुळें, क्वचित् सप्तमी बहुवचनी प्रत्ययाचासुद्धा हु (असा आदेश होतो) उदा० :—

**धवलु विसूरइ सामिअहो गरुआ भरु पिक्खेवि।**
**हउँ किं न जुत्तउ दुहुँ दिसिहि खंडइँ दोण्णि करेवि ॥ २ ॥**

(धवल खिद्यति (विसूरइ) स्वामिनः गुरुं भारं प्रेक्ष्य।
अहं किं न युक्तः द्वयोर्दिशोः खण्डे द्वे कृत्वा ॥)

स्वामीचा मोठा भार पाहून ढवळा (बैल) खेद करतो (व स्वतःशीं म्हणतो—) *'माझे दोन तुकडे करून (जुवाच्या) दोन दिशाना मला का बरें जोडलें नाहीं?'*

[येथें, दुहुँ या सप्तमी अनेकवचनी रूपात 'हु' आदेश आहे ]

## ङसि-भ्यस्-ङीनां हे-हुं-हयः ॥ ३४१ ॥

**अपभ्रंशे इदुद्भ्यां परेषां ङसि भ्यस् ङि इत्येतेषां यथासंख्यं हे हु हि इत्येते त्रय आदेशा भवन्ति।**

अपभ्रंशात (शब्दाच्या अन्त्य) 'इ' व 'उ' याच्यापुढे पचमी एकवचनी प्रत्यय, पचमी अनेकवचनी प्रत्यय आणि सप्तमी एकवचनी प्रत्यय याचे अनुक्रमें हे, हुं आणि हि असे हे तीन आदेश होतात.

ङसेर्हे। *पचमी एकवचनी प्रत्ययाचा 'हे' आदेश होतो उदा —*

**गिरिहे सिलायलु तरुहे फलु घेप्पइ नीसावँन्नु।**
**घरु मेल्लेप्पिणु माणुसहं तो वि न रुच्चइ रन्नु ॥ १ ॥**

*(गिरेः शिलातलं तरोः फलं गृह्यते निःसामान्यम्।*
*गृहं मुक्त्वा मनुष्याणां तथापि न रोचते अरण्यम् ॥)*

वेगवेगळ्या भेदभावाविना (अरण्यांत) पर्वताची शिळा व वृक्षाची फळें मिळतात (हीं घेतली जातात) तथापि घराचा त्याग करून अरण्य (-वास) माणसांना आवडत नाहीं

[येथें, गिरिहे आणि तरुहे या पंचमी एकवचनाच्या रूपांत 'हे' आदेश आलेला आहे]

भ्यसो हुं। पंचमी अनेकवचनी प्रत्ययाचा 'हुं' आदेश होतो उदा —

तरुहुँ वि वक्कलु फलु मुणि वि परिहणु असणु लहंति।
सामिहुँ एत्तिउ अग्गलउ आयरु भिच्चु गृहंति ॥ २ ॥
(तरुभ्य अपि वल्कलं फलं मुनय अपि परिधानं अशनं लभन्ते।
स्वामिभ्य इयत् अधिकं (अग्गलउं) आदरं भृत्या गृह्णन्ति ॥)

वृक्षापासून वल्कल हें परिधान म्हणून व फळें हें भोजन म्हणून मुनिसुद्धां मिळवितात (वस्त्र व भोजन याचेबरोबरच) सेवक स्वामीपासून आदर (हा) अधिक मिळवितात

[येथें, सामिहुँ व तरुहुं या रूपांत 'हुं' आदेश आलेला आहे]

ङेर्हि। सप्तमी एकवचनी प्रत्ययाचा 'हि' आदेश होतो उदा —

अह विरलपहाउ जि कलिहि धम्मु ॥ ३ ॥
(अथ विरलप्रभावः एव कलौ धर्मः।)

आता कलियुगांत धर्म हा खरोखर कमी प्रभावी आहे

[येथें, कलिहि या सप्तमी ए. व. रूपांत 'हि' असा आदेश आहे]

### आट्टो णानुस्वारौ ॥ ३४२ ॥

**अपभ्रंशे अकारात्परस्य टावचनस्य णानुस्वारावादेशौ भवतः।**

अपभ्रंश भाषेत (शब्दाच्या अन्त्य) अकारापुढें तृतीया एकवचनी प्रत्ययाचे 'ण' व अनुस्वार असे आदेश होतात उदा —

दइएं पवसंतेण (३३३. १)

['येथें, 'दइएँ' या रूपांत 'ए' वर अनुस्वार आला आहे, 'पवसंतेण' या रूपांत 'ण' आलेला आहे]

### एं चेदुतः ॥ ३४३ ॥

**अपभ्रंशे इकारोकाराभ्यां परस्य टावचनस्य एं चकारात् णानुस्वारौ च भवन्ति।**

अपभ्रंशांत (शब्दाच्या अन्त्य) इकार व उकार यांपुढें तृतीया एकवचनाचा 'एं' आणि (सूत्रांतील) चकारामुळें ('आणि' या शब्दामुळें) 'ण' व अनुस्वार (हेहि) होतात उदा —

एं। एं [चें उदाहरण] —
अग्गिएँ उण्हउ होइ जगु वाएं सीअलु तेवँ।
जो पुणु अग्गि सीअला तसु उण्हत्तणु केवँ ॥ १ ॥

[ अग्निना उष्णं भवति जगत् वातेन शीतलं तथा।
यः पुनः अग्निना शीतलः तस्य उष्णत्वं कथम्॥]

*जग अग्नीमुळें उष्ण व वायुमुळें शीतल होतें पण जो अग्नीनेंहि शीतल होतो त्याला उष्णतेचें काय?*

[ यथ, अग्गिएँ या रूपात ऍं आहे ]

णानुस्वारौ। ण व अनुस्वार [ याचें उदाहरण ]—

विप्पिअ-आरउ जइ वि पिउ तो वि त आणहि अज्जु।
अग्गिण दड्ढा जइ वि घरु तो तें अग्गि कज्जु॥ २॥

( विप्रियकारकः यद्यपि प्रियः तदापि तं आनय अद्य।
*अग्निना दग्धं यद्यपि गृहं तदपि तेन अग्निना कार्यम्॥* )

जरी प्रियकर अप्रिय करणारा आहे तरी त्याला आज आण जरी अग्नीने घर जाळलें जातें तरी त्या अग्नीशी ( आपलें ) काम असतेंच

[ येथ 'अग्गिण' या रूपात 'ण' आहे, व 'अग्गिं' या रूपात अनुस्वार आहे ]

एवमुकारादप्युदाहार्यौ।

याचप्रमाणें उकारापुढेंहि तृतीया एकवचनात 'ण' व अनुस्वार यणारीं उदाहरणें घ्यावयाचीं

## स्यम्-जस्-शसां लुक्॥ ३४४॥

अपभ्रंशे सि अम् जस् शस् इत्येतेषां लोपो भवति।

*अपभ्रंशात प्रथमा एकवचन द्वितीया एकवचन प्रथमा बहु (अनेक) वचन आणि* द्वितीया बहु (अनेक) वचन यांच्या प्रत्ययाचा लोप होतो

एइ ति घोडा एह थलि ( ३३० ४ ) इत्यादि। अत्र स्यम्जसां लोपः।

( उदा ) एइ ति घोडा एह थलि इत्यादि यथें (या उदाहरणात) प्रथमा ए. व (एह थलि) द्वितीया ए. व (वग्ग) व प्रथमा अनेकवचन (एइ घोडा) यांच्या प्रत्ययाचा लोप झाला आहे

जिवँ जिवँ वंकिम लोअणहं णिरु सामलि सिक्खइ।
तिवँ तिवँ वम्महु निअय-सर खर-पत्थरि तिक्खइ॥ १॥

अत्र स्यम्शसां लोपः।

( यथा यथा वक्रिमाणं लोचनयोः नितरां श्यामला शिक्षते।
तथा तथा मन्मथः निजकशरान् खरप्रस्तरे तीक्ष्णयति॥ )

*जसजशी श्यामा स्त्री डोळ्यांचें वाकडेपण (वक्र कटाक्ष टाकण्यास) शिकते तसतसा* मदन कठिण दगडावर आपल्या बाणांना धार लावतो

*यथें (या उदाहरणात) प्रथमा ए. व (सामलि) द्वितीया ए. व (वंकिम) आणि* द्वितीया अ व (°सर) यांच्या प्रत्ययांचा लोप झाला आहे

षष्ठ्याः ॥ ३४५ ॥

अपभ्रंशे षष्ठ्या विभक्त्या प्रायो लुग् भवति ।

अपभ्रंशात षष्ठी विभक्ती (प्रत्यया) चा प्राय लोप होतो उदा —

संगरसएँहिँ जु वण्णिअइ देक्खु अम्हारा कन्तु ।
अइमत्तहँ चत्तङ्कुसहँ गय कुम्भइँ दारंतु ॥ १ ॥

( सङ्गरशतेषु यो वर्ण्यते पश्य अस्माकं कान्तम् ।
अतिमत्तानां त्यक्ताङ्कुशानां गजानां कुम्भान् दारयन्तम् ॥ )

शकडो युद्धात ज्याचे वर्णन केले जाते (तो) आमचा प्रियकर पहा (जो) अतिमत्त झालेल्या व अंकुशाला दाद न देणाऱ्या (अशा) हत्तींची गंडस्थळे फोडणारा म्हणून ज्याचे वर्णन केले जाते (तो) आमचा प्रियकर पहा

[ येथे 'गय' या स्थानी षष्ठी विभक्तीच्या अ व प्रत्ययाचा लोप झाला आहे ]

पृथग्योगो लक्ष्यानुसारार्थः ।

लक्ष्यास अनुसरून अर्थ करावयाचा या दर्शन ( सू. ३४५ हे सू. ३४४ पेक्षा ) पृथक्पणे सांगितले आहे[1]

## आमन्त्र्ये जसो होः ॥ ३४६ ॥

अपभ्रंशे आमन्त्र्यार्थे वर्तमानान्नाम्नः परस्य जसो हो इत्यादेशो भवति। लोपापवादः ।

अपभ्रंशात संबोधनार्थी असणाऱ्या नामापुढे प्रथमा अनेकवचनी प्रत्ययाचा 'हो' असा आदेश होतो (हा नियम) लोप होतो (सू ३४४ पहा) या (नियमा) चा अपवाद आहे उदा —

तरुणहो तरुणिहो मुणिउ मइँ करहु म अप्पहो घाउ ॥ १ ॥

( हे तरुणाः तरुण्यः (च) ज्ञातं मया कुरुत मा आत्मनः घातम् ।)

हे तरुणतरुणींनो मला कळले आपला घात करू नका

[ येथे तरुणहो तरुणिहो या संबोधनी स्थानी 'हो' आदेश आहे ]

## भिस्सुपोर्हिं ॥ ३४७ ॥

अपभ्रंशे भिस्सुपोः स्थाने हिं इत्यादेशो भवति ।

अपभ्रंश भाषेत तृतीया अनेकवचन आणि सप्तमी अनेकवचन यांच्या प्रत्ययांच्या स्थानी 'हिं' असा आदेश होतो उदा —

गुणहिँ न संपइ कित्ति पर ॥ (३३५ १)

[ येथे, गुणहिँ या तृतीया अ व स्थानी 'हिं' आदेश आहे ]

सुप्। सप्तमी अनेकवचन (हि आदेशाचे उदाहरण) —

भाईरहि जिवँ भारइ मग्गहिँ तिहिँ वि पयट्टइ ॥ १ ॥

---

1. ज्या विभक्तीचे उदाहरण असेल त्यानुसार अर्थ करावयाचा आहे
2. संबोधनाचे अनेकवचनाचे प्रत्यय हे प्रथमा अनेकवचनी प्रत्ययांसारखेच असतात

सुंदरी (मुग्धा) अंधारात सुद्धा स्वतःच्या मुखाच्या किरणांनी हात पहाते, मग पूर्ण चंद्राच्या चांदण्यात ती दूरच्या वस्तु कां पहात नाहीं ?

[ येथें, ° चंदिमए या तृतीया एकवचनी रूपात ' ए ' हा आदेश आहे ]

जहिं मरगयकन्तिएं संवलिअं ॥ २ ॥

( यत्र मरकतकान्त्या संवलितम् । )

जेथ मरकत मण्याच्या प्रकाशानें वेष्टित आहे

[ येथें, ° कंतिएं या तृतीया एकवचनी रूपात ' ए ' हा आदेश आहे ]

ङस् – ङस्योर्हे ॥ ३५० ॥

*अपभ्रंशे स्त्रियां वर्तमानान्नाम्नः परयोर्ङस् ङसि इत्येतयोर्हे इत्यादेशो भवति ।*

अपभ्रंश भाषेंत स्त्रीलिंगांत असणाऱ्या नामाच्या पुढें पंचमी ए. व. आणि षष्ठी ए. व. या प्रत्ययांचा ' हे ' असा आदेश होतो उदा० –

ङस् : । षष्ठी एकवचनाचें उदाहरण –

तुच्छमज्झहे तुच्छजंपिरहे ।
तुच्छच्छरोमावलिहे तुच्छराय तुच्छयरहासहे ।
पियवयणु अलहंतिअहे तुच्छकायवम्महनिवासहे ।
अन्नु जु तुच्छउं तहे धणहे तं अक्खणह न जाइ ।
कटरि थणंतरु मुद्धडहे जें मणु विच्चि ण माइ ॥ १ ॥

( तुच्छमध्यायाः तुच्छजल्पनशीलायाः ।
तुच्छाच्छरोमावल्याः तुच्छरागायाः तुच्छतरहासायाः ।
प्रियवचनमलभमानायाः तुच्छकायमन्मथनिवासायाः ।
अन्यद् यत्तुच्छं तस्याः धन्यायाः तदाख्यातुं न याति ।
आश्चर्यं स्तनान्तरं मुग्धायाः येन मनो वर्त्मनि न माति ॥ )

तुच्छ[1] कमर असलेली, तुच्छ बोलणारी, तुच्छ व सुंदर रोमावली (उदरावर) असणारी, तुच्छ प्रेम असणारी (दाम्पविगारी), तुच्छ हसणारी, प्रियकराची वार्ता न कळल्यानें शरीर तुच्छ[2] झालेली, (जणुं) मदनाचा निवास, अशा त्या सुंदरी (मुग्धा) चें आणखी जें कांहीं तुच्छ आहे तें सांगतां येत नाहीं, आश्चर्य हें की तिच्या दोन स्तनामधलें अंतर इतकें तुच्छ आहे की त्या (दोन स्तनामधील) मार्गावर मनसुद्धा मावत नाहीं

---

१ येथें बारीक, नाजूक, सूक्ष्म या अर्थी, कृश इत्यादि अर्थांनी तुच्छ शब्द वापरलेला आहे

२ प्रियकराची वार्ता जिला कळलेली नाहीं, आणि जिच्या कृश शरीरांत मदनाचा निवास आहे, असाहि अर्थ करतां येईल

[ येथें, °मज्हहे, °जपिरहे, °रोमावलिहे, °हासहे अलईतिअहे, °निग्रामहे, धणहे मुद्धहे या स्थान 'हे' असा आदेश आहे ]

ङसे । पंचमी एकवचनाचें उदाहरण —

फोडंति जे हियडउँ अप्पणउँ ताहँ पराई कवण घृण ।
रक्खेज्जहु लोअहो अप्पणा बालहे जाया विसम थण ॥ २ ॥
(स्फोटयत यौ हृदयं आत्मीयं तयोः परकीया (परविषये) का घृणा ।
रक्षत लोकाः आत्मानं बालाया जातौ विषमौ स्तनौ ॥)

आपलेंच हृदय फोडणाऱ्या (स्तना) ना दुसऱ्याविषयीं काय दया वाटणार ? हे लोकहो, त्या तरुणीपासून स्वतःचे रक्षण करा (तिचे) स्तन आतां संपूर्ण (विषम, हृदय फोडणारे) झाले आहेत

[ येथें, बाल्हे या स्थान 'हे' आदेश आलेला आहे ]

भ्यसामोर्हु ॥ ३५१ ॥

अपभ्रंशे स्त्रियां वर्तमानान्नाम्नः परस्य भ्यस आमश्च हु इत्यादेशो भवति ।

अपभ्रंशांत स्त्रीलिंगात असणाऱ्या नामापुढें पंचमी बहुवचन आणि षष्ठी बहुवचन य प्रत्ययाचा 'हु' असा आदेश होतो उदा —

भल्ला हुआ जु मारिआ बहिणि महारा कन्तु ।
लज्जेज्जतु वयंसिअहु जइ भग्गा घरु एन्तु ॥ १ ॥
(भव्य (=साधु) (भद्र) भूत यन्मारितः भगिनि अस्मदीयः कान्तः ।
अलज्जिष्यत् वयस्याभ्यः यदि भग्नः गृहं ऐष्यत् ॥)

हे भगिनी माझा प्रियकर (पति) (युद्धात) मारला गेला हें चांगलें झालें (कारण) पराभूत होऊन जर तो घरीं परत आला असता तर (माझ्या) मैत्रिणींच्या पुढं लाज वाटली असती

वयस्याभ्यो वयस्यानां वा इत्यर्थः ।

मैत्रिणींपासून वा मैत्रिणींच्या (पुढं) असा अर्थ आहे

[ येथें, वयसिअहु (पंचमी अ व आणि षष्ठी अ व ) या स्थानं 'हु' आदेश आहे ]

ङेर्हि ॥ ३५२ ॥

अपभ्रंशे स्त्रियां वर्तमानान्नाम्नः परस्य ङे सप्तम्येकवचनस्य हि इत्यादेशो भवति ।

अपभ्रंश भाषेंत स्त्रीलिंगात असणाऱ्या नामाच्या पुढं ङि म्हणजे सप्तमी एकवचनी प्रत्ययाचा 'हि' असा आदेश होतो उदा । —

वायसु उड्डावन्तिअए पिउ दिट्ठउ सहस त्ति ।
अद्धा वलया महिहि गय अद्धा फुट्ट तड त्ति ॥ १ ॥
(वायसं उड्डापयन्त्या प्रियो दृष्टः सहसेति ।
अर्धानि वलयानि मह्यां गतानि अर्धानि स्फुटितानि तटिति ॥)

कावळ्याला उडवून लावणाऱ्या स्त्रीला अचानक प्रियकर दिसला (तिच्या) अर्ध्या बांगड्या जमिनीवर (पडून) पडल्या आणि (उरलेल्या) अर्ध्या (बांगड्या) तडतडा फुटल्या

[ येथ महिहि या सप्तमी एकवचनी रूपात 'हि' आदेश आहे ]

क्लीबे जस्शसोरिं ॥ ३५३ ॥

अपभ्रंशे क्लीबे वर्तमानान्नाम्नः परयोर्जस्शसोः इं इत्यादेशो भवति ।

अपभ्रंशात नपुंसकलिंगात (क्लीब) असणाऱ्या नामाच्या पुढे प्रथमा बहुवचन व द्वितीया बहुवचन प्रत्ययाचा 'इं' असा आदेश होतो उदा –

कमलइं मेल्लवि अलिउलइं करिगण्डाइं महंति ।
असुलहमेच्छण जाहँ भलि ते ण वि दूर गणंति ॥ १ ॥

कमलानि मुक्त्वा अलिकुलानि करिगण्डान् कांक्षन्ति ।
असुलभम् एष्टुं यषा निर्बन्ध (भक्ति) ते नापि (=नैव) दूर गणयन्ति ॥)

कमळे सोडून भ्रमरसमूह हत्तींच्या गंडस्थळांची इच्छा करतात दुर्लभ (वस्तु) मिळविण्याचा ज्यांना आग्रह आहे ते दूरत्वाचा विचार करीत नाहीत

[ येथे उलइं (प्रथमा अ व ) आणि कमलइं व गण्डाइं (द्वितीया अ व ) यामध्ये 'इं' हा आदेश आहे ]

कान्तस्यात उं स्यमोः ॥ ३५४ ॥

अपभ्रंशे क्लीबे वर्तमानस्य ककारान्तस्य नाम्नो योऽकारस्तस्य स्यमोः परयोः उं इत्यादेशो भवति ।

अपभ्रंशात नपुंसकलिंगात असणाऱ्या ककारान्त नामाचा जो (अन्त्य) अकार त्याच्यापुढे प्रथमा ए व आणि द्वितीया एकवचन याच्या प्रत्ययाचा 'उं' असा आदेश होतो उदा –

अन्नु जु तुच्छउँ तहे धणहे। (३५० १)

[ येथे तुच्छउँ या प्रथमा एकवचनी रूपात 'उं' आदेश आहे ]

भग्गउँ देक्खिवि निअयबलु बलु पसरिअउँ परस्सु ।
उम्मिल्लइ ससिरेह जिवँ करि करवालु पियस्सु ॥ १ ॥

(भग्नक दृष्ट्वा निजकबल बल प्रसृतक परस्य ।
उन्मीलति शशिलेखा यथा करे करवाल प्रियस्य ॥)

आपले सैन्य पराभूत झालेले पाहून व शत्रूचे सैन्य पसरत चाललेले पाहून (माझ्या) प्रियकराच्या हातात चंद्रलेखेप्रमाणे तरवार चमकू लागली

[ येथे भग्गउँ व पसरिअउँ या द्वितीया एकवचनी रूपात 'उं' हा आदेश आहे ]

---

१ अन्नीं यणार हा 'क' स्वार्थे क आहे

सर्वादेर्ङसेर्हां ॥ ३५५ ॥

अपभ्रंशे सर्वादिरकारान्तात्परस्य ङसेर्हां इत्यादेशो भवति ।

अपभ्रंश भाषेंत अकारान्त सर्वनामापुढें पंचमी एकवचन प्रत्ययाचा 'हां' असा आदेश होतो. उदा० :–

जहां होंतउ आगदो । तहां होंतउ आगदो । कहां होंतउ आगदो ।

(यस्मात् भवान् आगतः । तस्मात् भवान् आगतः । कस्मात् भवान् आगतः ।)

जेथून आला. तेथून आला. कोठून आला.

[ येथें, ज (यद्), त (तद्), क (किम्) या सर्वनामांच्या जहां, तहां, कहां या पंचमी एकवचनी रूपांत 'हां' आदेश आहे ]

किमो डिहे वा ॥ ३५६ ॥

अपभ्रंशे किमोकारान्तात् परस्य ङसेर्डिहे इत्यादेशो वा भवति ।

अपभ्रंशांत अकारान्त किम् (क) च्या पुढें पंचमी एकवचन प्रत्ययाचा 'इहे' (डिहे) असा आदेश विकल्पानें होतो उदा० :–

जइ तहे तुट्टउ नेहडा मइँ सहुँ न वि तिलतार ।
तं किहे वंकेहिं लोअणेहिं जोइज्जउँ सयवार ॥ १ ॥

(यदि तस्याः त्रुट्यतु स्नेहः मया सह नापि तिलतारः (?) ।
तत् कस्माद् वक्राभ्यां लोचनाभ्यां दृश्ये (अहं) शतवारम् ॥)

जर तिचा माझ्यावरील अत्यंत दृढ (तिलतार) स्नेह संपला असेल, तर शेंकडों वेळां वक्र दृष्टींनी मी का बरें पाहिला जातों ?

[ येथें, किहे या पंचमी एकवचनी रूपांत 'इहे' आदेश आहे. ]

ङेर्हिं ॥ ३५७ ॥

अपभ्रंशे सर्वादिरकारान्तात्परस्य ङेः सप्तम्येकवचनस्य हिं इत्यादेशो भवति ।

अपभ्रंश भाषेंत अकारान्त सर्वनामापुढें ङि म्हणजे सप्तमी एकवचन प्रत्ययाचा 'हिं' असा आदेश होतो. उदा.:—

जहिं कप्पिज्जइ सरिण सरु छिज्जइ खग्गिण खग्गु ।
तहिं तेहइ भडघडनिवहि कंतु पयासइ मग्गु ॥ १ ॥

(यत्र (अथवा यस्मिन्) कल्प्यते शरेण शरः छिद्यते खड्गेन खड्गः ।
तस्मिन् तादृशे भटघटानिवहे कान्तः प्रकाशयति मार्गम् ॥)

जेथें बाणानें बाण व खड्गानें खड्ग छिन्न केलें जातें त्या तशाप्रकारच्या योद्ध्यांच्या समुदायांत (माझा) प्रियकर (योद्ध्यांसाठी) मार्ग प्रकाशित करतो.

[ येथें, जहिं, तहिं या सप्तमी एकवचनी रूपांत 'हिं' आदेश आहे. ]

एक्कहिँ अक्खिहिँ सावणु अन्नहिँ भद्दवउ
माहउ महिअल-सत्थरि गण्डत्थले सरउ।
अङ्गहिँ गिम्ह सुहच्छी तिल-वणि मग्गसिरु
तहे मुद्धहे मुह-पङ्कइ आवासिउ सिसिरु॥ २॥

(एकस्मिन् अक्ष्णि श्रावणः अन्यस्मिन् भाद्रपदः
माधवः (अथवा माघः) महीतलस्रस्तरे गण्डस्थले शरत्।
अङ्गेषु ग्रीष्मः सुखासिकातिलवने मार्गशीर्षः
तस्या मुग्धाया मुखपङ्कजे आवासितः शिशिरः॥)

त्या सुंदरी (मुग्धा) च्या एका डोळ्यात श्रावण, दुसऱ्या डोळ्यात भाद्रपद आहे, जमिनीवरील बिछान्यावर माधव (अथवा माघ) (आहे) गालावर शरद्, अंगावर ग्रीष्म आहे, सुखासिकारूपी तिळाच्या वनात मार्गशीर्ष आहे आणि मुखकमलावर शिशिर राहिला आहे.

[येथे, एक्कहिँ, अन्नहिँ या रूपात 'हिँ' आदेश आहे]

हिअडा फुट्टि तड त्ति करि कालक्खेवें काइँ।
देक्खउँ हयविहि कहिँ ठवइ पइँ विणु दुक्खसयाइँ॥ ३॥

(हृदय स्फुट 'तड' इति (शब्दं) कृत्वा कालक्षेपेण किम्।
पश्यामि हतविधिः क्व स्थापयति त्वया विना दुःखशतानि॥)

हे हृदया, तड्दिशी फुट. विलंब करून काय उपयोग? तुझ्याविना शेकडो दुःखे दैव कोठे ठेवते ते मी पाहीन.

[येथे, कहिं या सप्तमी एकवचनी रूपात 'हिं' आदेश आहे]

यत्तत्किम्भ्यो ङसो डासुर्न वा॥ ३५८॥

अपभ्रंशे यत्तत् किम् इत्येतेभ्योकारान्तेभ्यः परस्य ङसो डासु इत्यादेशो वा भवति।

अपभ्रंशात अकारान्त यद्, तद्, किम् (म्हणजे ज, त, क) यांच्यापुढे षष्ठी एकवचन प्रत्ययाला 'आसु' (डासु) असा आदेश विकल्पाने होतो. उदा. —

कन्तु महारउ हलि सहिए निच्छइँ रूसइ जासु।
अत्थिहिँ सत्थिहिँ हत्थिहिँ वि ठाउ वि फेडइ तासु॥ १॥

(कान्तः अस्मदीयः हले सखिके निश्चयेन रुष्यति यस्य (=यस्मै)।
अस्त्रैः शस्त्रैः हस्तैः अपि स्थानमपि स्फोटयति तस्य॥)

---

१ आरम्भाने वर्णों

हला सखी (माझा) प्रियकर ज्याचयार रागावतो त्याच स्थान तो अस्त्रांनी शस्त्रांनी (वा) हातांनी फोडतो

[ येथ जासु तासु या रूपांत आसु हा आदेश आहे ]

जीविउ कासु न वल्लहउँ धणु पुणु कासु न इट्ठु ।

दोण्णि वि अवसर निवडिअइ तिणसम गणइ विसिट्ठु ॥ २ ॥

(जीवितं कस्य न वल्लभकं धनं पुनः कस्य नेष्टम् ।

द्वे अपि अवसरनिपतिते तृणसमे गणयति विशिष्टः ॥)

जीवित कुणाला प्रिय नाही? धनाची इच्छा कुणाला नाही? तथापि वेळप्रसंगी विशिष्ट (श्रेष्ठ) व्यक्ति (या) दोहोनांदि तृणासमान मानतात

[ येथ कासु या रूपांत आसु हा आदेश आहे ]

स्त्रियां डहे ॥ ३५९ ॥

**अपभ्रंशे स्त्रीलिङ्गे वर्तमानेभ्य यत्तत्किम्भ्य परस्य ङसो डहे इत्यादेशो वा भवति ।**

अपभ्रंशात स्त्रीलिंगात असणाऱ्या यद्, तद्, किम् याच्यापुढे षष्ठी एकवचन प्रत्ययाचा अहे (डहे) असा आदेश विकल्पाने होतो उदा —

जहे केरउ । तहे केरउ । कहे केरउ ।

(यस्याः कृते । तस्याः कृते । कस्याः कृते ।)

जिच्यासाठी तिच्यासाठी कुणाच्या साठी

[ येथ जहे तहे कहे या रूपांत अहे असा आदेश आहे ]

यत्तद स्यमोर्ध्रं त्रं ॥ ३६० ॥

**अपभ्रंशे यत्तदो स्थाने स्यमो परयो यथासंख्य ध्रुं त्रं इत्यादेशौ वा भवतः ।**

अपभ्रंश भाषेत यद् व तद् याच्या स्थानी प्रथमा एकवचन आणि द्वितीया एकवचन सामध्ये अनुक्रमे ध्रु व त्र असे आदेश विकल्पाने होतात उदा —

**पंगणि चिट्ठदि नाहु ध्रु त्र रणि करदि न भ्रंति ॥ १ ॥**

(प्राङ्गणे तिष्ठति नाथ यत्तद् रणे करोति न भ्रान्तिम् ॥)

ज्या अर्थी नाथ अंगणात उभा आहे त्या अर्थी तो रणक्षेत्रावर फिरत नाही आहे

[ येथ ध्रु व त्र ही यद् व तद्ची अनुक्रमे प्रथमा ए. व. आणि द्वितीया ए. व. याची वैकल्पिक रूपे आहेत ]

**पक्षे ।** विकल्पपक्षी (म्हणजे जेव्हा ध्रुं व त्रं हे आदेश होत नाहीत तेव्हा)

तं बोल्लिअइ जु निव्वहइ ।

(तत् जल्प्यते यन्निर्वहति ।)

जे करतो ते बोलून दाखवितो

[येथे, त व तु ही अनुक्रम प्र ए व आणि द्वि ए व यांचीं रूपें आहेत ]

इदम इमु क्लीवे ॥ ३६१ ॥

अपभ्रंशे नपुंसकलिङ्गे वर्तमानस्येदम स्यमो परयो इमु इत्यादेशो भवति।

अपभ्रंशात नपुंसकलिंगात असणाऱ्या इदम् (सर्वनामा)चे पुढें प्रथमा एकवचन आणि द्वितीया एकवचन यामध्यें 'इमु' असा आदेश होतो उदा —

इमु कुलु तुह तणउ । इमु कुलु देक्खु ।

(इद कु‍ तव तनय । इद कुल पश्य ।)

मुला, हें तुझें कुळ ह कुळ पहा

[येथं पहिला 'इमु' ह प्रथमा एकवचनी रूप असून, दुसरा 'इमु' द्वितीया एकवचनी रूप आहे ]

एतद स्त्री पुंक्लीबे एह एहो एहु ॥ ३६२ ॥

अपभ्रंशे स्त्रियां पुंसि नपुंसके वर्तमानस्यैतद स्थाने स्यमो परयोर्यथासंख्य एह एहो एहु इत्यादेशा भवन्ति।

अपभ्रंशात स्त्रीलिंग, पुल्लिंग व नपुंसकलिंग यात असणाऱ्या एतद् (सर्वनामा) च्या पुढ प्रथमा ए. व आणि द्वितीया ए. व यामध्य अनुक्रम एह, एहो एहु असे आदेश होतात उदा —

एह कुमारी एहो नरु एहु मणोरहठाणु।

एहउँ वढ चिंतताह पच्छइ होइ विहाणु ॥ १ ॥

(एषा कुमारी एष (अहं) नर एतन्मनोरथस्थानम्।

एतत् मूर्खाणा चिन्तमानानां पश्चाद् भवति विभानम् ॥)

ही कुमारी, हा (मी) पुरुष ह मनोरथाचें स्थान (जेव्हां) मूर्ख (फक्त) असाच विचार करीत रहातात (तव्हा नंतर) त्याच प्रभात होते

[येथे, 'एह' हें स्त्रीलिंगी एतद् च प्र ए. व, 'एहो' हें पुल्लिंगी एतद्चें प्र ए. व आणि 'एहु' ह नपु एतद्च प्र ए. व आहे ]

एइर्जस्-शसो ॥ ३६३ ॥

अपभ्रंशे एतदो जस् शसो परयो एइ इत्यादेशो भवति ।

अपभ्रंश मधील एतद् (सर्वनामा) च पुढें प्रथमा बहुवचन आणि द्वितीया बहुवचन यामध्यें 'एइ' असा आदेश होतो उदा —

एइ ति घोडा एह थलि। (३३० ४)

[येथ एइ हें एतद्च प्रथमा अनेकवचनी रूप आहे ]

एइ पेच्छ। (एतान् पश्य।) हे पहा

[ यथें, एइ हे एतद्‌चे द्वितीया अनेकवचनी रूप आहे ]

अदस ओइ ॥ ३६४ ॥

**अपभ्रंशे अदस स्थाने जस शसो परयो ओइ इत्यादशो भवति ।**

अपभ्रंशात अदस् ( सर्वनामा ) च स्थानी प्रथमा बहुवचन आणि द्वितीया बहुवचन यामध्ये ओइ' असा आदेश होतो उदा –

**जइ पुच्छह घर वड्डाइं तो वड्डा घर ओइ ।**

**विहलिअ जण अब्भुद्धरणु कन्तु कुडीरइ जोइ ॥ १ ॥**

( यदि पृच्छत गृहाणि महान्ति तद् महान्ति गृहाणि अमूनि ।

विह्वलितजनाभ्युद्धरणं कान्तं कुटीरके पश्य ॥ )

जर मोठी घरे विचारीत असाल तर ती ( पहा ) मोठी घरे ( पण ) दुःखी जनांचा उद्धार करणारा ( माझा ) प्रियकर झोपडीत आहे ( तो ) पहा

**अमूनि वर्तन्ते पृच्छ वा ।**

ती आहेत वा त्यासंबंधी विचार

[ यथें ओइ हे अदस् चे प्रथमा व द्वितीया अनेकवचनी रूप आहे ]

इदम आय ॥ ३६५ ॥

**अपभ्रंशे इदम् शब्दस्य स्यादौ आय इत्यादेशो भवति ।**

अपभ्रंशात प्रथमादि विभक्तीत इदम् शब्दाचा आय' असा आदेश[1] होतो उदा —

**आयइँ लोअहो लोअणइँ जाइँ सरइँ न भंति ।**

**अप्पिए दिट्ठइ मउलिअहिं पिए दिट्ठइ विहसंति ॥ १ ॥**

( इमानि लोकस्य लोचनानि जातिं स्मरन्ति न भ्रान्तिः ।

अप्रिये दृष्टे मुकुलन्ति प्रिये दृष्टे विकसन्ति ॥ )

लोकांच्या ह्या डोळ्यांना ( पूर्व ) जन्माचे स्मरण होते यात शंका नाही ( कारण ) अप्रिय ( वस्तु ) पाहून ते संकुचित होतात व प्रिय ( वस्तु ) पाहून ते विकसित होतात

[ यथें आयइँ हे इदम् चे प्रथमा अनेकवचनी रूप आहे ]

**सोसउ म सोसउ चिअ उअही वडवानलस्स किं तेण ।**

**जं जलइ जले जलणो आएण वि किं न पज्जत्तं ॥ २ ॥**

( शुष्यतु मा शुष्यतु एव ( वा ) उदधिः वडवानलस्य किं तेन ।

यद् ज्वलति जले ज्वलनः एतेनापि किं न पर्याप्तम् ॥ )

समुद्र सुकी वा न सुकी वडवानलाला त्याचे काय? अग्नि पाण्यात जळत राहतो हेच त्याचा पराक्रम ( दर्शविण्यास ) पुरेसे नाही काय?

---

१ विभक्ति प्रत्ययापूर्वी इदम सर्वनामाचे आय' असे अंग होते

[ येथें, 'आएण' हें इदम् चें तृतीया एकवचनाचें रूप आहे. ]

आयहो दड्ढकलेवरहो जं वाहिउ तं सारु।
जइ उट्ठब्भइ तो कुहइ अह डज्झइ तो छारु ॥ ४ ॥

( अस्य दग्धकलेवरस्य यद् वाहितं (=लब्धं) तत् सारम्।
यदि आच्छाद्यते तत् कुथ्यति यदि दह्यते तत्क्षारः ॥ )

या तुच्छ शरीरापासून जें प्राप्त होतें तें चांगलें; जर तें झांकलें तर तें कुजतें; जर जाळलें तर त्याची राख होते.

[ येथें, 'आयहो' हें इदम् चें षष्ठी एकवचनी रूप आहे. ]

**सर्वस्य साहो वा ॥ ३६६ ॥**

अपभ्रंशे सर्वशब्दस्य साह इत्यादेशो वा भवति।

अपभ्रंशांत सर्व या शब्दाचा 'साह' असा आदेश विकल्पानें होतो. उदा.—

साहु वि लोउ तडप्फडइ वड्डत्तणहो तणेण
वड्डप्पणु परि पाविअइ हत्थि मोक्कलडेण ॥ १ ॥

(सर्वोऽपि लोकः प्रस्पन्दते (तडप्फडइ) महत्त्वस्य कृते।
महत्त्वं पुनः प्राप्यते हस्तेन मुक्तेन ॥)

मोठेपणासाठीं सर्व लोक तडफडतात. मोठेपण मुक्तहस्तानें ( दान करून ) प्राप्त होतें.

[ येथें, साहु या प्रथमा एकवचनी रूपांत सर्व चा 'साह' आदेश आहे. ]

पक्षे। विकल्पपक्षीं (म्हणजे जेथें सर्व चा 'साह' असा आदेश होत नाहीं तेथें 'सव्व असेंच होईल. उदा.—)

सव्वु वि। (सर्वः अपि।)

**किमः काइं-कवणौ वा ॥ ३६७ ॥**

अपभ्रंशे किमः स्थाने काइं कवण इत्यादेशौ वा भवतः।

अपभ्रंश भाषेंत किम् ( सर्वनामा )च्या स्थानीं 'काइं' व 'कवण' हे आदेश विकल्पानें होतात. उदा :—

जइ न सु आवइ दूइ घरु काइं अहो मुहुं तुज्झु।
वयणु जु खंडइ तउ सहिए सो पिउ होइ न मज्झु ॥ १ ॥

( यदि न स आयाति दूति गृहं किं अधो मुखं तव।
वचनं यः खण्डयति तव सखिके स प्रियो भवति न मम ॥ )

हे दूती, जर तो (प्रियकर) घरीं येत नसेल, तर तुझें अधोमुख कां ? सखी, जो वचन मोडतो तो माझा प्रिय ( असणार ) नाहीं

[ येथें, किम् चे स्थानीं 'काइँ' हा आदेश आहे. ]

काइँ न दूरे देक्खइ। ( ३४९.१ )

[ येथें, किम् चा 'काइँ' असा आदेश आहे ]

फोडेंति जे हिअडउँ अप्पणउँ ताहँ पराई कवण घृण।

रक्खेज्जहु लोअहो अप्पणा बालहे जाया विसम थण ॥ २ ॥ ( ३५०.२ )

[ येथें, किम् चें स्थानीं 'कवण' हा आदेश आहे. ]

सुपुरिस कंगुहे अणुहरहिं भण कज्जें कवणेण।

जिवँ जिवँ वड्डत्तणु लहहिं तिवँ तिवँ नवहिँ सिरेण ॥ ३ ॥

( सुपुरुषा कङ्गोः अनुहरन्ति भण कार्येण केन।

यथा यथा महत्त्व लभन्ते तथा तथा नमन्ति शिरसा ॥ )

सत्पुरुष कोणत्या कारणास्तव कंगु ( रोपटा ) चें अनुकरण करतात, तें सांग. जसजसें महत्त्व प्राप्त होतें तसतसे ते मस्तक खालीं नमवितात

[ येथें, किम् चें स्थानीं कवण हा आदेश आहे ]

पक्षे। विकल्पपक्षी ( म्हणजे जेव्हा किम् चे स्थानीं 'काइं' आणि 'कवण' हे आदेश होत नाहीत, तेव्हा ).—

जइ ससणेही तो मुइअ अह जीवइ निम्नेह।

बिहिं वि पयारेंहिं गइअ धण किं गज्जहि खल मेह ॥ ४ ॥

( यदि सस्नेहा तन्मृता अथ जीवति नि स्नेहा।

द्वाभ्यामपि प्रकाराभ्यां गतिरा ( गता ) धन्या किं गर्जसि खल मेघ ॥ )

जर तिचें ( माझ्यावर ) प्रेम असेल तर ती मेली असणार, जर ती जिवत असेल तर तिचें ( मजवर ) प्रेम नाहीं, ( एवं च ) दोन्हीं प्रकारानीं प्रिया ( मला ) नष्ट झाली; ( तेव्हां ) हे दुष्ट मेघा, तू ( वृथा ) गर्जना का करतोस ?

[ येथें, काइ व कवण हे दोन्हीहि आदेश नसून 'किम्' चाच उपयोग आहे ]

## युष्मदः सौ तुहुं ॥ ३६८ ॥

अपभ्रंशे युष्मदः सौ परे तुहुं इत्यादेशो भवति।

अपभ्रंश भाषेंत प्रथमा एकवचनात युष्मद् ( सर्वनामा )चा 'तुहुं' असा आदेश होतो. उदा :—

भमर म रुणझुणि रण्णडइ सा दिसि जोइ म रोइ।

सा मालइ देसंतरिअ जसु तुहुँ मरहि विओइ ॥ १ ॥

( भ्रमर मा रुणझुणशब्दं कुरु अरण्ये ता दिशं विलोकय मा रुदिहि।

सा मालती देशान्तरिता यस्या त्वं म्रियसे वियोगे ॥)

भ्रमरा, अरण्यात रुणझुण ध्वनि करू नको, त्या दिशेला पहा, रडू नको. जिच्या वियोगामुळें तू मरत आहेस ती मालती अन्य देशीं आहे

[ तुहुँ हें युष्मद्चें प्रथमा एकवचन आहे. ]

**जस्-शसोस्तुम्हे तुम्हइं ॥ ३६९ ॥**

**अपभ्रंशे युष्मदो जसि शसि च प्रत्येकं तुम्हे तुम्हइं इत्यादेशौ भवतः ।**

अपभ्रंशांत युष्मद् चे प्रथमा बहुवचन आणि द्वितीया बहुवचन यांमध्यें प्रत्येकीं 'तुम्हे' व 'तुम्हइं' असे आदेश होतात उदा :—

तुम्हे तुम्हइं जाणह । ( यूयं जानीथ । ) तुम्ही जाणता.

तुम्हे तुम्हइं पेच्छइ । ( युष्मान् प्रेक्षते । ) तुम्हाला पहातो.

[ येथें, प्रथमा आणि द्वितीया अनेकवचनांत 'तुम्हे' व 'तुम्हइं' हे आदेश आहेत ]

**वचनभेदो यथासंख्यनिवृत्त्यर्थः ।**

( सूत्रांत प्रथमा ब. व. आणि द्वितीया ब. व. असा ) वचनभेद एवढ्यासाठीं सांगितला आहे कीं प्रथमा व द्वितीया अनेकवचनांत हे आदेश अनुक्रमें होतात, असें समजलें जाऊं नये

**टा-ङ्यमा पइं तइं ॥ ३७० ॥**

**अपभ्रंशे युष्मदः टा ङि अम् इत्येतैः सह पइं तइं इत्यादेशौ भवतः ।**

अपभ्रंश भाषेंत युष्मद्चे तृतीया ए. व., सप्तमी ए. व. आणि द्वितीया ए. व. यांचे प्रत्ययासह 'पइं' व 'तइं' असे आदेश होतात उदा :—

टा । तृतीया एकवचनी प्रत्ययासह :—

पइं मुक्काहं वि वरतरु फिट्टइ पत्तत्तणं न पत्ताणं ।
तुह पुणु छाया जइ होज्ज कह वि ता तेहिं पत्तेहिं ॥ १ ॥
[ त्वया मुक्तानामपि वरतरो विनश्यति ( फिट्टइ ) पत्रत्वं न पत्राणाम् ।
तव पुनः छाया यदि भवेत् कथमपि तदा तैः पत्रैः ( एव ) ॥ ]

हे सुंदर वृक्षा, तुझ्यापासून सुटे झाले तरी पानांचें पानपण नष्ट होत नाहीं, परंतु तुझी कशीहि जरी छाया असली तरी त्या पानांमुळेंच.

[ येथें, युष्मद्च्या तृतीया एकवचनांत 'पइं' हा आदेश आहे. ]

महु हिअउं तइं ताए तुहुं स वि अन्नें विनडिज्जइ ।
पिअ काइं करउं हउं काइं तुहुं मच्छें मच्छु गिलिज्जइ ॥ २ ॥
( मम हृदयं त्वया तया त्वं सापि अन्येन विनाट्यते ।
प्रिय किं करोम्यहं किं त्वं मत्स्येन मत्स्यः गिल्यते ॥ )

माझें हृदय तू (जिंकलें आहेस), तिने तुला (जिंकले आहे), आणि तीसुद्धा दुसऱ्याकडून पीडली जात आहे प्रियकरा, मी काय करू? तू काय करणार? माश्याकडून मासा गिळला जात आहे

[ येथे, तृतीया एकवचनात युष्मद् चा 'तइ' हा आदेश आहे ]

ङिना । सप्तमी एकवचनी प्रत्ययासह —

पइँ मइँ बेहिँ वि रणगयहिँ को जयसिरि तक्केइ ।
केसहिँ लेप्पिणु जमघरिणि भण सुहु को थक्कइ ॥ ३ ॥

(त्वयि मयि द्वयोरपि रणगतयो को जयश्रियं तर्कयति ।
केशैर्गृहीत्वा यमगृहिणीं भण सुखं कस्तिष्ठति ॥)

तू व मी दोघेहि रणांगणावर गेल्यावर (दुसरा) कोण (वरं) विजयश्रीची इच्छा करील? यमाच्या पत्नीचे केस धरल्यावर कोण सुखात राहील, तें सांग

[ येथें, युष्मद्च्या सप्तमी एकवचनात 'पइँ' हा आदेश आहे ]

एव तइ । याचप्रमाणें तइ (आदेश सप्तमी ए. व. मध्ये होतो)

अमा । द्वितीया एकवचनी प्रत्ययासह —

पइँ मेल्लन्तिहेँ महु मरणु मइँ मेल्लन्तहो तुज्झु ।
सारस जसु जो वेग्गला सो वि कृदन्तहो सज्झु ॥ ४ ॥

(त्वां मुञ्चन्त्या मम मरणं मां मुञ्चतस्तव ।
सारस (यथा) यस्य दूरे (वेग्गल) स कृतान्तस्य साध्यः ॥)

(सारस पक्ष्याप्रमाणें) तुला जर मी टाकलें तर मी मरेन, मला तू टाकलेंस तर तू मरशील, (कारण सारसपक्ष्यांपैकीं) जो सारस ज्यापासून वेगळा असेल तो कृतान्ताच भक्ष्य होतो

[ येथें, द्वितीया एकवचनात युष्मद्चा पइ हा आदेश आहे ]

एव तइँ । याचप्रमाणें तइ (हा आदेश द्वितीया एकवचनात होतो)[1]

## भिसा तुम्हेहिं ॥ ३७१ ॥

अपभ्रंशे युष्मदो भिसा सह तुम्हेहिं इत्यादेशो भवति ।

अपभ्रंश भाषेंत युष्मद् चा तृतीया बहुवचनी प्रत्ययासह 'तुम्हेहिं' असा आदेश होतो उदा —

तुम्हेहिँ अम्हेहिँ जं किअउँ दिट्ठउँ बहुअजणेण ।
तं तेवड्डउ समरभरु निज्जिउ एक्कखणेण ॥ १ ॥

---

1 तइ च उदाहरण – तइँ कजग । कुमारपालचरित ८ ३४

(युष्माभिः अस्माभिः यत् कृतं दृष्टं बहुकजनेन ।
तत् (=तदा) तावन्मात्रः समरभरः निर्जितः एकक्षणेन ॥)

तुम्हीं आम्ही जें केलें तें पुष्कळ लोकानी पाहिलें, त्यावेळीं इतकें मोठें युद्ध (आपण एका क्षणात जिंकलें

[ येथें, युष्मद्च्या तृतीया अनेकवचनांत 'तुम्हेहिं' असा आदेश आहे ]

### ङसि-ङस्भ्यां तउ तुज्झ तुध्र ॥ ३७२ ॥

अपभ्रंशे युष्मदो ङसिङस्भ्यां सह तउ तुज्झ तुध्र इत्येते त्रय आदेशा भवन्ति।

अपभ्रंशांत युष्मद्‌च पचमी ए. व., आणि षष्ठी ए. व. यांच प्रत्ययासह तउ, तुज्झ व तुध्र असे तीन आदेश होतात उदा — (पचमी ए व –)

तउ होंतउ आगदो । तुज्झ होंतउ आगदो । तुध्र होंतउ आगदो ।

(त्वत् भवान्[1] आगतः ।) तुझ्याकडून आला,

इत्या । षष्ठी एकवचनी प्रत्ययासह —

तउ गुणसंपइ तुज्झ मदि तुध्र अणुत्तर खति ।
जइ उप्पत्ति अन्न जण महिमडलि सिक्खति ॥ १ ॥
(तव गुणसम्पदं तव मतिं तव अनुत्तरां क्षान्तिम् ।
यदि उत्पद्य अन्यजना महीमण्डले शिक्षन्ते ॥)

भूमडलावर जन्म घेऊन इतरे जनानीं तुमची गुणसपदा, मति व क्षमा शिकावी

[ येथें, तउ, तुज्झ, तुध्र हे युष्मद्चे षष्ठी ए. व. चे आदेश आहेत ]

### भ्यसाम्भ्यां तुम्हहं ॥ ३७३ ॥

अपभ्रंशे युष्मदो भ्यस् आम् इत्येताभ्यां सह तुम्हहं इत्यादेशो भवति ।

अपभ्रंश भाषेत युष्मद्‌चा पचमी बहुवचन आणि षष्ठी बहुवचन यांच प्रत्ययासह 'तुम्हहं' असा आदेश होतो उदा —

तुम्हहं होंतउ आगदो । (युष्मत् भवान् आगतः ।)
तुमच्याकडून आला
तुम्हहं केरउं धणु । (युष्माकं कृते धनम् ।)
तुमच्यासाठीं धन

[ येथें, युष्मद्च्या पचमी व षष्ठी अनेकवचनांत 'तुम्हहं' आदेश आहे ]

---

१ होंतउ ची भवत् अशीहि संस्कृत छाया दिली गेली आहे

## तुम्हासु सुपा ॥ ३७४ ॥

**अपभ्रंशे युष्मद सुपा सह तुम्हासु इत्यादेशो भवति ।**

अपभ्रंशात युष्मद्‌च्या सप्तमी बहुवचनी प्रत्ययासह ' तुम्हासु ' असा आदेश होतो उदा —

तुम्हासु ठिअ । ( युष्मासु स्थितम् । ) तुमच्यात स्थित

## सावस्मदो हउं ॥ ३७५॥

**अपभ्रंशे अस्मद सौ परे हउं इत्यादेशो भवति।**

अपभ्रंशात अस्मद्‌च्या प्रथमा एकवचनात ' हउं ' असा आदेश होतो उदा –

तसु हउँ कलिजुगि दुल्लहहो । ( ३३८ १ )

[ येथें, प्रथमा एकवचनात अस्मद्‌च्या हउं हा आदेश आहे ]

## जस् शसोरम्हे अम्हइं ॥ ३७६ ॥

**अपभ्रंशे अस्मदो जसि शसि च परे प्रत्येकं अम्हे अम्हइं इत्यादेशौ भवत ।**

अपभ्रंश भाषेंत अस्मद्‌चा प्रथमा बहुवचन व द्वितीया बहुवचन यामध्यें प्रत्येकीं ' अम्हे ' व ' अम्हइं असे आदेश होतात उदा —

अम्हे थोवा रिउ बहुअ कायर एम्व भणंति।
मुद्धि निहालहि गयणयलु कइ जण जोण्ह करंति ॥ १॥
( वयं स्तोका रिपव बहव कातरा एवं भणन्ति ।
*मुग्धे निभालय गगनतलं कति जना ज्योत्स्ना कुर्वन्ति ॥ )*

आपण थोडे, शत्रु नाल, असें भित्रे ( लोक ) म्हणतात सुदरी ( मुग्धे ), आकाशात पहा ( तेथें ) किती लोक चादणें देतात ? ( उत्तर–फक्त चद्रच )

[ येथें, प्रथमा अनेकवचनात अस्मद्‌चा अम्हे आदेश आहे ]

अबणु लाइवि जे गया पहिअ पराया के वि।
अवस न सुअहिँ सुहच्छिअहिँ जिवँ अम्हइँ तिवँ ते वि ॥ २॥
*( अम्लत्व लागयित्वा ये गता पथिका परकीया केऽपि ।*
अवश्य न स्वपन्ति सुखासिकायां यथा वय तथा तेऽपि ॥ )

प्रेम ( अम्लत्व ) जोडून जे कोणी परकीय पथिक ( प्रवासी ) गेले आहेत ते अवश्य आमच्याप्रमाणेंच सुखानें झोपू शकणार नाहींत

[ येथें, अस्मद् च्या प्रथमा अनेकवचनात अम्हइं हा आदेश आहे ]

[ द्वितीया अनेकवचनांत ]

अम्हे देक्खइ। अम्हइ देक्खइ। ( अस्मान् पश्यति । ) आम्हाला पहातो

[ येथें, द्वितीया अनेकवचनात अस्मद् चे अम्हे व अम्हइं हे आदेश आहेत ]

वचनभेदो यथासंख्यानिवृत्त्यर्थं ।

(सूत्रात प्रथमा ए. व. आणि द्वितीया ए. व. अस्मा) वचनभेद अशासाठी सांगितला आहे की प्रथमा व द्वितीया अनेकवचनात हे आदेश अनुक्रमे होतात असें मानलें जाऊ नये)

## टा ङ्यमा मइं ॥ ३७७ ॥

अपभ्रंशे अस्मदः टा ङि अम् इत्येतैः सह मइं इत्यादेशो भवति।

अपभ्रंश भाषेत अस्मद् चा तृतीया ए. व. सप्तमी ए. व. आणि द्वितीया ए. व. याचे प्रत्ययासह 'मइं' असा आदेश होतो उदा –

टा। तृतीया एकवचनी प्रत्ययासह

मइँ जाणिउँ प्रिअ विरहिअहं क वि धर होइ विआलि।
णवर मिअंक वि तिह तवइ जिह दिणयरु खयगालि ॥ १ ॥
(मया ज्ञातं प्रिय विरहितानां कापि धरा भवति विकाले।
केवलं (= परं) मृगाङ्कोऽपि तथा तपति यथा दिनकरः क्षयकाले ॥)

प्रियकरा, मला वाटत होतं की विरही जनांना संध्याकाळीं काहींतरी आधार (अव लंबन, दुःखनिवृत्ति–धरा) मिळतो पण प्रलयकाळीं जसा सूर्य तसाच चंद्र (यावेळीं) ताप देत आहे

[ येथें मइँ हें अस्मद् च तृतीया एकवचनाचें रूप आहे ]

ङिना। सप्तमी एकवचनी प्रत्ययासह

पइं मइं बेहिं वि रणगयहिं। (३७० ३)

अमा। द्वितीया एकवचनी प्रत्ययासह –

मइँ मेल्लन्तहो तुज्झु। (३७० ४)

## अम्हेहिं भिसा ॥ ३७८ ॥

अपभ्रंशे अस्मदो भिसा सह अम्हेहिं इत्यादेशो भवति।

अपभ्रंशात अस्मद् चा तृतीया बहुवचनी प्रत्ययासह 'अम्हेहिं' असा आदेश होतो उदा –

तुम्हेहिं अम्हेहिं जं किअउँ। (३७१ १)

## महु मज्झु ङसिङस्भ्याम् ॥ ३७९ ॥

अपभ्रंशे अस्मदो ङसिना ङसा च सह प्रत्येकं महु मज्झु इत्यादेशौ भवतः।

अपभ्रंश भाषेत अस्मद् चें पंचमी एकवचन व षष्ठी एकवचन याचे प्रत्ययासह प्रत्येकी 'महु' व 'मज्झु' असे आदेश होतात उदा –

[ पचमी एकवचनात : ] महु होंतउ गदो । मज्झु होंतउ गदो ।

[ मत्त (अथवा) मत् भवान् गत । ) माझ्याकडून गेला

हसा । पष्ठी एकवचनी प्रत्ययासह ·

महु कंतहो वे दोसडा हेल्लि म झंखहि आलु ।
दतहो हउ पर उव्वरिअ जुज्झंतहो करवालु ॥ १ ॥

( मम कान्तस्य द्वौ दोषौ सखि मा पिधेहि अलीकम् ।
ददत अहं पर उर्वरिता युध्यमानस्य करवाल ॥ )

माझ्या प्रियकराचे दोन दोष आहेत, सखी, आरोप दडवू नको जेव्हा तो दान देतो तेव्हा फक्त मी उरते, आणि जेव्हा तो लढतो तेव्हा फक्त तरवार उरते

[ येथे, महु हें अस्मद्चे पष्ठी एकवचनाचें रूप आहे ]

जइ भग्गा पारक्कडा तो सहि मज्झु पिएण ।
अह भग्गा अम्हह तणा तो मारिअडेण ॥ २ ॥

( यदि भग्ना परकीया तदा ( वा तत· ) सखि मम प्रियेण ।
अथ भग्ना अस्माक सत्कीन तदा तेन मारितेन ॥ )

सखी, जर शत्रूचा पराभव झाला असेल तर तो माझ्या प्रियकराकडून, जर आपला पराभव झाला असेल तर तो ( माझा प्रियकर ) मारला गेल्यावरच

[ येथ, अस्मद्च्या पष्ठी एकवचनात ' मज्झु ' हा आदेश आहे ]

## अम्हह भ्यसाम्भ्याम् ॥ ३८० ॥

अपभ्रंशे अस्मदो भ्यसा आमा च सह अम्हहं इत्यादेशो भवति ।

अपभ्रंशात अस्मद्चा पचमी बहुवचन आणि षष्ठी बहुवचन यांचे प्रत्ययासह 'अम्हह' असा आदेश होतो उदा –( पचमी अनेकवचनात ) अम्हहं होंतउ आगदो । ( अस्मत् भवान् आगत । ) आमच्याकडून आला

आमा । षष्ठी अनेकवचनी प्रत्ययासह –

अइ भग्गा अम्हहं तणा । ( ३७९ २ )

## सुपा अम्हासु ॥ ३८१ ॥

अपभ्रंशे अस्मद सुपा सह अम्हासु इत्यादेशो भवति ।

अपभ्रंशात अस्मद्चा सप्तमी बहुवचनी प्रत्ययासह 'अम्हासु' असा आदेश होतो. उदा —

अम्हासु ठिअं । ( अस्मासु स्थितम् । ) आमच्यात स्थित.

## त्यादेराद्यत्रयस्य संबन्धिनो हिं न वा ॥ ३८२ ॥

स्यादीनामाद्यत्रयस्य संबन्धिनो बहुत्वर्थेषु वर्तमानस्य वचनस्यापभ्रंशे हिं इत्यादेशो वा भवति ।

धातूना लागणाऱ्या प्रत्ययांतील (त्यादि) आद्य तिन्हींचें (म्हणजे तृतीय पुरुषी तीन वचनें) संबंधि जें बहुवचन, त्याचा अपभ्रंशात 'हिं' असा आदेश विकल्पानें होतो उदा —

मुह कबरि-बंध तहे सोह धरहिं
न मल्लजुज्झु ससिराहु करहिं ।
तहे सहहिं कुरल भमर उल तुलिअ
न तिमिरडिंभ खेल्लंति मिलिअ ॥ १ ॥

(मुखकबरीबन्धौ तस्याः शोभां धरतः
ननु मल्लयुद्धं शशिराहू कुरुतः ।
तस्याः शोभन्ते कुरलाः भ्रमरकुलतुलिताः
ननु तिमिरडिम्भाः क्रीडन्ति मिलिताः ॥ )

तिचें मुख आणि केशबंध (अशी) शोभा धारण करतात कीं जणुं चंद्र व राहु मल्ल युद्ध करीत आहेत भ्रमराच्या समुदायाशीं तुल्य अशा तिच्या कुरळ्या केसांच्या बटा (अशा) शोभतात कीं जणु अंधाराचीं पिलें एकत्र येऊन क्रीडा करीत आहेत

[ येथें, धरहिं, करहिं सहहिं हीं तृ पु अनेकवचनाचीं रुपें आहेत ]

## मध्यत्रयस्याद्यस्य हि ॥ ३८३ ॥

स्यादीनां मध्यत्रयस्य यदाद्यं वचनं तस्यापभ्रंशे हि इत्यादेशो वा भवति ।

धातूना लागणाऱ्या प्रत्ययांपैकीं मधल्या तिन्हींच (म्हणजे द्वितीय पुरुषी तीन वचनांचें) जें आद्य (म्हणजे एक-) वचन, त्याचा अपभ्रंशात 'हि' असा आदेश विकल्पानें होतो उदा -

बप्पीहा पिउ पिउ भणवि कित्तिउ रुअहि हयास ।
तुह जलि महु पुणु वल्लहइ बिहुँ वि न पूरिअ आस ॥ १ ॥

(चातक 'पिउ पिउ' (पिबामि पिबामि तसेंच प्रियः प्रियः इति)
भणित्वा कियद्रोदिषि हताश ।
तव जले मम पुनर्वल्लभे द्वयोरपि न पूरिता आशा ॥ )

हे चातका, पिउन पिउन असें म्हणत अरे हताशा, तू किती रडणार ? (आपणा) दोघांचीहि—तुझी पाण्याविषयीची व माझी वल्लभाविषयीची—आशा पुरी होत नाहीं आहे

[ येथें रुअहि हें द्वितीय पुरुष एकवचनाचें रूप आहे ]

आत्मनेपदे । आत्मनेपदानमुद्धा (द्वितीय पुरुष एकवचनात 'हि' असा आदेश विकल्पानें होतो) उदा –

बप्पीहा कइँ बोल्लिएण निग्घिण वार इ वार ।
सायरि भरिअइ विमलजलि लहहि न एक्कइ धार ॥ २ ॥

(चातक किं कथनेन निर्घृण वारंवारम्
सागरे भृते विमलजलेन लभसे न एकामपि धाराम् ॥)

हे निर्घृण चातका, वारंवार तुला सांगून काय उपयोग की विमल जलान भरलेल्या सागरातून तुला एक थब (श – धारा) सुद्धा पाणी मिळणार नाहीं

[ येथें, लहहि मध्यें द्वि पु एकवचनात 'हि' आदेश आहे. ]

सप्तम्याम् । विध्यर्थीत (सुद्धा) (द्वि पु ए व त हि आदेश होतो) उदा –

आयहिँ जम्महिँ अन्नहिँ वि गोरि सु दिज्जहि कन्तु ।
गय मत्तहँ चत्तङ्कुसहं जो अब्भिडइ हसन्तु ॥३ ॥

(अस्मिन् जन्मनि अन्यस्मिन्नपि गौरि तं दद्या कान्तम् ।
गजाना मत्ताना त्यक्ताङ्कुशाना य सगच्छते हसन् ॥)

हे गौरी, या जन्मात तसेच अन्य जन्मात (मला) तोच प्रियकर द्यावास की जो हसत हसत मातलेल्या व अङ्कुशाला न जुमानणाऱ्या हत्तींशी भिडतो

[ येथें, दिज्जहि या विध्यर्थी द्वि पु एकवचनात 'हि' आदेश आहे ]

पक्षे । रुअसि । इत्यादि ।

विकल्पपक्षीं (म्हणजे जेथें 'हि' आदेश होत नाहीं तेथें माहाराष्ट्री प्राकृतप्रमाणें रूप होईल उदा) रुअसि । (रोदिषि) इत्यादि

**बहुत्वे हु ॥ ३८४ ॥**

**त्यादीना मध्यत्रयस्य संबन्धि बहुष्वर्थेषु वर्तमानं यद्वचन तस्यापभ्रंशे हु इत्यादेशो वा भवति ।**

धातूला लागणाऱ्या प्रत्ययातील मधल्या तीन्हींच संबंधी जें बहुवचन, त्याचा अपभ्रंशात 'हु' असा आदेश विकल्पानें होतो उदा –

बलि-अब्भत्थणि महुमहणु लहुईहूआ सोइ ।
जइ इच्छहु वड्डत्तणउ देहु म मग्गहु कोइ ॥ १ ॥

(बले अभ्यर्थने मधुमथनो लघुकीभूत सोपि ।
यदि इच्छथ महत्त्व (वड्डत्तणउ) दत्त मा मार्गयत कमपि ॥)

बळीजवळ याचना करताना तो विष्णु (मधुमथन) सुद्धा लघु झाला (तर्हा) जर मोठेपणा हवा असेल तर (दान) द्या, (पण) कुणाजवळहि (काहींहि) मागू नका

[ येथें इच्छहु या द्वि पु अनकवचनी रूपात 'हु' आदेश आहे ]

पक्षे । इच्छह । इत्यादि ।

विकल्पपक्षीं ( म्हणजे नेव्हा 'हु' आदेश होत नाहीं तेव्हा नेहमींप्रमाणें रूप होतें उदा ) इच्छह । ( इच्छथ । ), इत्यादि

अन्त्यत्रयस्याद्यस्य उ ॥ ३८५ ॥

त्यादीनामन्त्यत्रयस्य यदाद्य वचन तस्यापभ्रंशे उ इत्यादेशो वा भवति ।

धातूला लागणाऱ्या प्रत्ययांपैकीं अन्त्य तीन्हींचे ( म्हणने प्रथम पुरुष ए व, द्वि व, आणि ब व याच ) जें आद्य ( म्हणने एक – ) वचन, त्याचा अपभ्रंशात 'उ' असा आदेश विकल्पानें होतो उदा –

विहि विणडउ पीडतु गह म धणि करहि विसाउ ।
सपइ कड्ढउँ वस जिवँ छुडु अग्घइ ववसाउ ॥ १ ॥
( विधिर्विनाटयतु ग्रहा पीडयन्तु मा धन्ये कुरु विषादम् ।
सम्पद कर्षामि वेषमिव यदि अर्घति (= स्यात्) व्यवसाय ॥ )

दैव विमुख असो, ग्रह पीडा देवोत सुदरी विषाद करू नको जर व्यवसाय करीन तर वेषाप्रमाणें ( मी ) सपदा ओढून आणीन

[ यथं, कड्ढउ हें प्र पु एकवचनाचें रूप आहे ]

बलि किज्जउँ सुअणस्सु । ( ३३८ १ )

[ येथें किज्जउँ या प्र पु एकवचनी रूपात 'उ' आदेश आहे ]

पक्षे । कड्ढामि । इत्यादि ।

विकल्पपक्षीं ( म्हणजे जेथे 'उ' आदेश होत नाहीं तेथें ) कड्ढामि ( कर्षामि । ) इत्यादि ( रूपें होतात )

बहुत्वे हुं ॥ ३८६ ॥

त्यादीनामन्त्यत्रयस्य सबन्धि बहुष्वर्थेषु वर्तमान यद्वचन तस्य हुं इत्यादेशो वा भवति ।

धातूला लागणाऱ्या प्रत्ययातील अन्त्य तीन्हींचें सबधी जें बहुवचन ( म्हणजे प्र पु बहुवचन ) त्याचा ( अपभ्रंशात ) हुं असा आदेश विकल्पानें होतो उदा –

खग्गविसाहिउ जहिँ लहहु पिय तहिँ देसहिँ जाहुं ।
रणदुब्भिक्खें भग्गाइं विणु जुज्झें न वलाहुं ॥ १ ॥
( खड्गविसाधितं यत्र लभामहे तत्र देशे याम ।
रणदुर्भिक्षेण भग्ना विना युद्धेन न वलामहे ॥ )

प्रियकरा, जेथें तरवारीला काम मिळेल त्या देशीं जाऊ या रणरूपी दुर्भिक्षानें आपण पीडित आहोंत, युद्धाविना आपण ( सुखी ) राहू शकणार नाहीं

[ येथें, व्रहहु, जाहु, व वगाहु या प्र पु अनेकवचनी रूपात ' हु ' आदेश आहे ]

पक्षे । लहिमु । इत्यादि ।

विकल्पपक्षीं ( उदाहरण ) लहिमु । ( लभामहे । ), इत्यादि

## हि-स्वयोरिदुदेत् ॥ ३८७ ॥

**पञ्चम्या हिस्वयोरपभ्रंशे इ उ ए इत्येते त्रय आदेशा वा भवन्ति ।**

आज्ञार्था( पचमी )च्या ( द्वि पु ए. व ) हि आणि स्व या प्रत्ययाचे अपभ्रंशात इ, उ व ए असे तीन आदेश विकल्पानें होतात उदा -

इत् । ' इ ' हा आदेश झाला असतां ( उदाहरण ) ---

**कुंजर सुमरि म सलइउ सरला सास म मेल्लि ।**
**कवल जि पाविय विहिवसिण ते चरि माणु म मेल्लि ॥ १ ॥**

( कुंजर स्मर मा सल्लकी सरलान् श्वासान् मा मुंच ।
कवला ये प्राप्ता विधिवशेन तांश्चर मानं मा मुंच ॥ )

हे हत्ती, सल्लकी ( वृक्षा )ची आठवण करू नको दीर्घ सुस्कारे सोडू नको, दैववशात् मिळालेले घास खा मान सोडू नको

[ येथें, सुमरि, मेल्लि, चरि या रूपात ' इ आदेश आहे ]

उत् । ' उ ' हा आदेश झाला असतां ( उदाहरण ) -

**भमरा एत्थु वि लिंबडइ के ँवि दियहडा विलंबु ।**
**घणपत्तलु छायाबहुलु फुल्लइ जाम कयंबु ॥ २ ॥**

( भ्रमर अत्रापि निम्बके कति ( चित् ) दिवसान् विलम्बस्व ।
घनपत्रवान् छायाबहुलो फुल्लति यावत्कदम्ब ॥ )

हे भ्रमरा, दाट पानें व छाया असणारा कदंब ( वृक्ष ) फुलेपर्यंत या लिंबाचे वृक्षावर काहीं दिवस काढ

[ येथें, विलंबु या रूपात ' उ ' आदेश आहे ]

एत् । ' ए ' हा आदेश झाला असतां ( उदाहरण ) -

**प्रिय एम्वहिं करे ँसेल्लु करि छड्डहि तुहुँ करवालु ।**
**जं कावालिय बप्पुडा लेहिँ अभग्गु कवालु ॥ ३ ॥**

( प्रिय इदानीं कुरु भल्लं करे त्यज त्वं करवालम् ।
येन कापालिका वराका लान्ति अभग्नं कपालम् ॥ )

प्रियकरा, आता हातात भाला देव, तरवार टाकून दे म्हणजे बिचाऱ्या कापालिकांना ( निदान ) न फुटलेले कपाऽ ( भिक्षेसाठी ) मिळेल

[ येथें, करे मध्यें ' ए ' आदेश आहे ]

**पक्षे । सुमरहि । इत्यादि ।**

विकल्पपक्षीं ( म्हणजे जेव्हा हे आदेश होत नाहीत, तेव्हा ) सुमरहि । ( स्मर । ), इत्यादि

**वत्स्यति-स्यस्य स ॥ ३८८॥**

अपभ्रंशे भविष्यदर्थविषयस्य त्यादेः स्यस्य सो वा भवति ।

अपभ्रंशांत धातूना लागणाऱ्या भविष्यार्थक प्रत्ययात ' स्य ' चा स विकल्पानें होतो. उदा –

दिअहा जंति झडप्पडहिं पडहिँ मनोरह पच्छि ।
जं अच्छइ तं माणिअइ होसइ करतु म अच्छि ॥ १ ॥
( दिवसा यान्ति वेगैः ( झडप्पडहिं ) पतन्ति मनोरथा पश्चात् ।
यदस्ति तन्मान्यते भविष्यति ( इति ) कुर्वन् मा आस्व ॥ )

दिवस झटपट जातात मनोरथ मागें पडतात ( म्हणून ) जें आहे तें स्वीकारावें ( मानावे ), ' होईल ' असें म्हणत ( स्वस्थ ) बसू नको

[ येथें, ' होसइ ' या रुपात ' स ' झाला आहे ]

पक्षे । होहिइ ।

विकल्पपक्षीं ( उदा ) होहिइ । ( भविष्यति । )

**क्रियेः कीसु ॥ ३८९॥**

क्रिये इत्येतस्य क्रियापदस्यापभ्रंशे कीसु इत्यादेशो वा भवति ।

' क्रिये ' या क्रियापदाचा अपभ्रंशात ' कीसु ' असा आदेश विकल्पाने होतो उदा –

संता भोग जु परिहरइ तसु कन्तहो बलि कीसु ।
तसु दइवेण वि मुण्डियउँ जसु खल्लिहडउँ सीसु ॥ १ ॥
( सतो भोगान् य परिहरति तस्य कान्तस्य बलिं क्रिये ।
तस्य दैवेनैव मुण्डितं यस्य खल्वाटं शीर्षम् ॥ )

असणाऱ्या भोगांचा त्याग करणाऱ्या प्रियकराची मी पूजा करते ज्याच्या डोक्याला टक्कल पडलें आहे, त्याचें दैवानच मुण्डन केलं आहे

[ येथें, क्रिय चा ' कीसु ' हा आदेश आहे ]

पक्षे । साध्यमानावस्थात् क्रिये इति संस्कृतशब्दादेष प्रयोग ।
बलि किज्जउँ सुअणस्सु । ( ३३८ १ )

विकल्पपक्षीं ( उदाहरण ) बलि किज्जउं सुअणस्सु।

साध्यमान-अवस्थेंतील 'क्रिये' या संस्कृत शब्दावरून हा प्रयोग आहे

**भुवः पर्याप्तौ हुच्चः ॥ ३९० ॥**

**अपभ्रंशे भुवो धातो: पर्याप्तावर्थे वर्तमानस्य हुच्च इत्यादेशो भवति ।**

पर्याप्ति[1] या अर्थी असणाऱ्या भू धातूचा अपभ्रंशात 'हुच्च' असा आदेश होतो. उदा. -

**अइतुगत्तणु जं थणहं सो छेयउ न हु लाहु।**
**सहि जइ केवँइ तुडिवसेॅण अहरि पहुच्चइ नाहु ॥ १ ॥**

( अतितुङ्गत्वं यत्स्तनयो: स च्छेदक: न खलु लाभ: ।
सखि यदि कथमपि त्रुटिवशेन अधरे प्रभवति नाथ: ॥ )

स्तनाचे जें अति तुंगत्व तें लाभ नसून तोटाच ( छेदक-हानि ) आहे ( कारण ) हे सखी, प्रियकर मोठ्या कष्टानें व विलंबानें अधरापर्यंत पोचतो

[ येथें, पहुच्चइ मध्यें भू चा हुच्च आदेश झालेला आहे ]

**ब्रूगो ब्रुवो वा ॥ ३९१ ॥**

**अपभ्रंशे ब्रूगो धातोर्ब्रुव इत्यादेशो वा भवति ।**

अपभ्रंशांत ब्रू धातूचा 'ब्रुव' असा आदेश विकल्पानें होतो. उदा. -

**ब्रुवह सुहासिउ किं पि।** ( ब्रूत सुभाषितं किमपि । ) कोणते तरी सुभाषित सांगा

[ येथ, 'ब्रुवह' मध्यें ब्रूचा 'ब्रुव' आदेश आहे ]

पक्षे । विकल्पपक्षीं ( ब्रू चा ब्रोप्प असा आदेश होतो. उदा. - )

**इत्तउँ ब्रोप्पिणु सउणि ठिउ पुणु दूसासणु ब्रोप्पि।**
**तो हउँ जाणउँ एहो हरि जइ महु अग्गइ ब्रोप्पि ॥ १ ॥**

( इयत् उक्त्वा शकुनि: स्थित: पुनर्दु:शासन उक्त्वा ।
तदा अहं जानामि एष हरि: यदि ममाग्रत उक्त्वा ॥ )

( दुर्योधन म्हणतो - ) इतकें बोलून शकुनि थांबला ( तितकेंच ) बोलून दु:शासन थांबला, ( मग ) मला कळलें कीं ( बोलायचे तें ) बोलून हा हरि ( श्रीकृष्ण ) माझ्यापुढें ( उभा राहिला )

[ येथें, ब्रोप्पिणु ब्रोप्पि हीं ब्रू चीं अपभ्रंशातील त्वान्ताचीं रूपें आहेत ]

---

[1] समर्थ असणें, प्रभावी असणें या अर्थी

### व्रजेर्वुञ ॥ ३९२ ॥

अपभ्रंशे व्रजतेर्धातोर्वुञ इत्यादेशो भवति ।

अपभ्रंशात व्रज् धातूचा 'वुञ' असा आदेश होतो उदा -

वुञइ । (व्रजति ।) वुञेप्पि । वुञेप्पिणु । (व्रजित्वा ।) जातो जाऊन

### दृशेः प्रस्स ॥ ३९३ ॥

अपभ्रंशे दृशेर्धातो प्रस्स इत्यादेशो भवति ।

अपभ्रंशात दृश् धातूचा 'प्रस्स' असा आदेश होतो उदा -

प्रस्सदि । (पश्यति ।) पहातो

### ग्रहेर्गृण्ह ॥ ३९४ ॥

अपभ्रंशे ग्रहेधातोर्गृण्ह इत्यादेशो भवति ।

अपभ्रंशात ग्रह् धातूचा 'गृण्ह' असा आदेश होतो उदा -

पढ गृण्हेप्पिणु व्रतु ।
(पठ गृहीत्वा व्रतम् ।)
व्रत घेऊन पठन कर

### तक्ष्यादीनां छोल्लादय ॥ ३९५ ॥

अपभ्रंशे तक्षिप्रभृतीनां धातूनां छोल्ल इत्यादय आदेशा भवन्ति ।

अपभ्रंशात तक्ष् प्रभृति धातूचे छोल्ल इत्यादि आदेश होतात उदा -

जिवँ तिवँ तिक्खा लेवि कर जइ ससि छोल्लिज्जंतु ।
तो जइ गोरिहे मुहकमलि सरिसिम का वि लहंतु ॥ १ ॥
(यथा तथा तीक्ष्णान् लात्वा करान् यदि शशी अतक्षिष्यत ।
तदा जगति गौर्या मुखकमलेन सदृशता कामपि अलप्स्यत ॥)

कसेंहि करून जर तीक्ष्ण किरण काढून (घेऊन) चद्राला तासला असता, तर या जगात गौरीच्या मुखकमलाशी थोडेसें सादृश्य त्याला लाभलें असतें

[येथें, छोल्ल हा तक्ष् चा आदेश आहे]

आदिग्रहणाद् देशीषु ये क्रियावचना उपलभ्यन्ते ते उदाहार्या ।

(सूत्रातील) 'आदि' शब्दामुळें देशी भाषेंत जे क्रियावाचक शब्द आहेत ते उदाहरणें म्हणून घ्यावयाचे (उदा -)

चूडुल्लउ चुण्णीहोइ सइ मुद्धि कवोलि निहित्तउ ।
सासानलजालझलक्किअउ बाहसलिलसंसित्तउ ॥ २ ॥
(कङ्कण चूर्णीभवति स्वयं मुग्धे कपोले निहितम् ।
श्वासानलज्वालासंतप्तम् बाष्पजलसंसिक्तम् ॥)

सुंदरी, गालावर ठेवलेलें, श्वासरूपी अग्नीच्या ज्वाळांनीं तापलेलें व अश्रुजलानें भिजलेलें कंकण आपण होऊनच चूर्ण होतें आहे

[ येथें, झलक्क हा तापय् चा आदेश आहे ]

अब्भडवंचिउ बे पयइं पेम्मु निअत्तइ जावँ ।
सव्वासणरिउसम्भवहो कर परिअत्ता तावँ ॥ ३ ॥

( अनुगम्य द्वे पदे प्रेम निवर्तते यावत् ।
सर्वाशनरिपुसम्भवस्य करा परिवृत्ता तावत् ॥ )

जेव्हां प्रेम ( प्रिया ) दोन पावलं जाऊन परतलें, तेव्हा सर्व खाणाऱ्या ( अग्नी ) चा जो शत्रु ( म्हणजे पाणी, समुद्र ), त्यापासून निर्माण झालेला जो चंद्र, त्याचे किरण परावृत्त होऊ लागले

[ येथें, अब्भडवंचिउ हा 'अनुगम्य' चा आदेश आहे ]

हिअइ खुडुक्कइ गोरडी गयणि घुडुक्कइ मेहु ।
वासारत्तिपवासुअह विसमा संकडु एहु ॥ ४ ॥

( हृदये शल्यायते गौरी गगने गर्जति मेघ ।
वर्षारात्रप्रवासिकाना विषम संकटमेतत् ॥ )

हृदयात सुंदरी शल्याप्रमाणें ( त्रास देत ) आहे आकाशांत मेघ गर्जत आहे पावसाळ्यात प्रवासास निघणाऱ्याना हें मोठें संकट आहे

[ येथें 'खुडुक्कइ' हा शल्यायते याचा, व 'घुडुक्कइ' हा गर्जति याचा आदेश आहे ]

अम्मि पओहर वज्जमा निच्चु जे॑ संमुह थंति ।
महु कंतहो॑ समरंगणइ गयघड भज्जिउ जंति ॥ ५ ॥

( अम्ब पयोधरौ वज्रमया नित्य यौ संमुखौ तिष्ठत ।
मम कान्तस्य समराङ्गणके गजघटा भङ्क्तु यात ॥ )

आइ, ( हे माझे ) स्तन वज्रमय आहेत ( कारण ) ते नेहमीं माझ्या प्रियकरासमोर असतात, व रणांगणावर गजसमूह नष्ट करण्यास जातात

[ येथें, था हा स्था चा आदेश आहे ]

पुत्तें जाएँ कवणु गुणु अवगुणु कवणु मुएण ।
जा बप्पीकी भुंहडी चंपिज्जइ अवरेण ॥ ६ ॥

( पुत्रेण जातेन को गुण अपगुण क मृतेन ।
यत् पैतृकी ( बप्पीकी ) भूमि आक्रम्यतेऽपरेण ॥ )

[ येथे, सुध मध्ये स चा ध झाला आहे ]

तथपफानां दधबभा । त, थ, प, फ याचे द, ध, ब, भ –

सबधु करेप्पिणु कधिदु मइँ तसु पर सभलउँ जम्मु ।
जासु न चाउ न चारहडि न य पम्हट्ठउ धम्मु ॥ ३ ॥

( शपथं कृत्वा कथितं मया तस्य परं सफलं जन्म ।
यस्य न त्यागः न च आरभटी न च प्रमृष्टः धर्मः ॥ )

शपथ घेऊन मीं सांगितलें– ज्याचा त्याग ( दानशूरता ) पराक्रम ( आरभटी ), आणि धर्म नष्ट झालेला नाहीं त्याचा जन्म संपूर्ण सफल झाला आहे

[ येथें, सबधु मध्यें थ चा ध आणि प चा ब झाला आहे कधिदु मध्ये थ चा ध झाला आहे, व त चा द झालेला आहे सभलउँ मध्यें फ चा भ झालेला आहे ]

अनादाविति किम्। ( सूत्रात ) ‘अनादि असतां’ असें कां म्हटलें आहे? ( कारण जर अनादि नसेल तर हा नियम लागणार नाहीं उदा – )

सबधु करेप्पिणु । अत्र कस्य गत्वं न भवति ।

यथ, करेप्पिणु मधील क अनादि नसल्यानें त्या क चा ग होत नाहीं

स्वरादिति किम्। ( सूत्रात ) स्वरापुढ असें कां म्हटलें आहे? ( कारण स्वरापुढें नसल्यास हा नियम लागणार नाहीं उदा – )

गिलि गिलि राहु मयंकु ।

[ येथें, मयंकु मध्यें क हा स्वरापुढ नसून ङ् या व्यंजनापुढ आहे, त्यामुळ येथें क चा ग होत नाहीं ]

असंयुक्तानामिति किम्। ( सूत्रात ) असंयुक्त असणाऱ्याचा’ असें कां म्हटलें आहे? ( कारण असंयुक्त नसल्यास हा नियम लागणार नाहीं उदा – )

एक्कहिं अक्खिहिं सावणु । ( ३५७ २ )

[ येथें, क असंयुक्त नसल्यानें त्याचा ग होत नाहीं ]

प्रायोधिकारात्क्वचिन्न भवति ।

प्रायोधिकारामुळें क्वचित् ( क इत्यादींचें स्थानीं ग इत्यादि ) होत नाहीं उदा –

जइ केवँइ पावीसु पिउ अकिआ कुड्ड करीसु ।
पाणिउ नवइ सरावि जिवँ सव्वंगें पइसीसु ॥ ४ ॥

( यदि कथंचित् प्राप्स्यामि प्रियं अकृतं कौतुकं करिष्यामि ।
पानीयं नवके शरावे यथा सर्वाङ्गेण प्रवेक्ष्यामि ॥ )

जर कदाचित् प्रियकर मला भेटेल तर पूर्वी (कधीहि) न केलेले असे काहीतरी कौतुक मी करीन नवीन मडक्यात जसें पाणी सर्वत्र शिरते तशी मी सर्वांगानें (त्या प्रियकरांत) शिरेन

[येथें 'अकिआ,' 'नवइ' या शब्दामध्यें क चा ग झालेला नाहीं ]

उअ कणिआरु पफुल्लिअउ कचणकतिपयासु ।
गोरीवयणविणिज्जिअउ न सेवइ वणवासु ॥ ५ ॥

(पश्य कर्णिकार प्रफुल्लितक काञ्चनकान्तिप्रकाश ।
गौरीवदननिर्जितक ननु सेवत वनवासम् ॥)

*सोन्यासारख्या कातीनें चमकणारा फुललेला कर्णिकार वृक्ष पहा जणु सुंदरीच्या मुखान जिंकल्यामुळें तो वनात रहात आहे* (वनवास सेवीत आहे)

[*येथें कणिआरु मध्यें क चा ग झालेला नाहीं पफुल्लिअउ या शब्दात फ चा भ झालेला नाहीं* °पयासु या शब्दामध्यें क चा ग झालेला नाहीं आणि विणिज्जिअउ या शब्दात त चा द झालेला नाहीं ]

## मोनुनासिको वो वा ॥ ३९७ ॥

अपभ्रंशेनादौ वर्तमानस्यासयुक्तस्य मकारस्य अनुनासिको वकारो वा भवति ।

अपभ्रंश भाषेंत अनादि असणाऱ्या असयुक्त मकाराचा अनुनासिक वकार (म्हणजे वँ) विकल्पानें होतो उदा –

कवँलु कमलु (कमलम्) भवँरु भमरु (भ्रमर)

लाक्षणिकस्यापि ।

*लाक्षणिक* (मकाराचा सुद्धां अनुनासिक वकार होतो उदा० –)

जिवँ (जिम) तिवँ (तिम), जवँ (जेम) [1]तेवँ (तेम)

अनादावित्येव ।

(म) अनादि असतानाच (हा नियम लागतो मकार अनादि नसल्यास हा नियम लागत नाहीं उदा० –)

मयणु । (मदन ।)

[येथें मकार अनादि नसल्यानें म चा वँ झालेला नाहीं ]

असयुक्तस्येत्येव ।

(मकार) असयुक्त असतानाच (हा नियम लागतो मकार सयुक्त असल्यास हा नियम लागत नाहीं उदा० –)

---

१ सूत्र ४०१ पहा

तसु पर सभलउ जम्मु । ( ३९६ ३ )

[ यथें, मरार असयुक्त नसल्यानें त्याचा वें होत नाहीं ]

## घाधो रो लुक् ॥ ३९८ ॥

**अपभ्रंशे सयोगादधो वर्तमानो रेफो लुग् वा भवति ।**

अपभ्रंशात जोडाक्षरातील नतर असणाऱ्या रेफाचा (र् चा) लोप विकल्पानें होतो उदा —

जइ केवँइ पावीसु पिउ । ( ३९६ ४ )

[ यथें, पिउ ( प्रिय ) मध्यें प्रिय मधील रेफाचा लोप झाला आहे ]

**पक्षे ।** *विकल्पपक्षीं (म्हणजे रेफाचा लोप झाला नाहीं तर रेफ तसाच रहातो उदा –)*

जइ भग्गा पारक्कडा तो सहि मज्झु प्रियेण । ( ३७९ २ )

[ येथे प्रियेण मध्यें रेफाचा लोप झालेला नाहीं ]

## अभूतोऽपि क्वचित् ॥३९९ ॥

**अपभ्रंशे क्वचिदविद्यमानोऽपि रफो भवति ।**

अपभ्रंशात क्वचित् ( मुळातील जोडाक्षरात ) रेफ नसताहि रेफ यतो उदा —

**व्रासु महारिसि एँउ भणइ जइ सुइसत्थु पमाणु ।**
**मायहं चलण नवन्ताहं दिविदिवि गङ्गाण्हाणु ॥ १ ॥**

( व्यासमहर्षि एतद् भणति यदि श्रुतिशास्त्रं प्रमाणम् ।
मातॄणां चरणौ नमतां दिवसे दिवसे गङ्गास्नानम् ॥ )

*महर्षि व्यास असें म्हणतात – जर वेद व शास्त्र प्रमाण असेल तर मातेचें चरण वदन करणाऱ्याना दररोज गगास्नान घडत*

[ यथें मूळ व्यास शब्दात रेफ नसताना व्रासु मध्यें रेफ आलेला आहे ]

**क्वचिदिति किम् ।** ( सूत्रात ) क्वचित् असें कां म्हटलें आहे ?

( कारण कधीं कधीं असा रफ येत नाहीं उदा —)

*वासेण वि भारहखम्भि बद्ध ।*

( व्यासेनापि भारतस्तम्भे बद्धम् । )

व्यासानें सुद्धा भारतस्तभात सागितलें आहे

[ येथ वास मध्यें रेफ आलेला नाहीं ]

## आपद्विपत्सपदां द इः ॥ ४०० ॥

**अपभ्रंशे आपद्, विपद्, व सपद् इत्येतेषां दकारस्य इकारो भवति ।**

अपभ्रंशात आपद्, विपद्, व संपद् या ( शब्दा ) च्या ( अन्त्य ) दकाराचा इकार होतो उदा :–

अणउ करतहो पुरिसहो आवइ आवइ ।
( अनर्थं कुर्वतः पुरुषस्य आपद् आयाति । )
*वाइट ( कर्म ) करणाऱ्या पुरुषावर आपत्ति येते*
[ येथें, आवइ मध्यें दकाराचा इकार झालेला आहे ]
विवइ । ( विपद् । ) संपइ । ( सम्पद् । )

प्रायोधिकारात । प्रायोधिकारामुळें ( कधीं कधीं या शब्दात दकाराचा इकार होत नाहीं उदा – )

गुणहिँ न सपय कित्ति पर । ( ३३५१ )
*[ येथें, सपय मध्यें दकाराचा इकार झालेला नाहीं ]*

**कथ-यथा-तथा थादेरेमेमेहेधा डित ॥ ४०१ ॥**

अपभ्रंशे कथ यथा तथा इत्येषां थादेरवयवस्य प्रत्येकम्
**एम इम इह इध इत्येते डितश्चत्वार आदेशा भवन्ति ।**

अपभ्रंशात कथ, यथा, तथा या ( शब्दा ) च्या थादि अवयवाचे प्रत्येकी एम, इम, इह, इध असे चार डित् आदेश [1]होतात उदा —

केम समप्पउ दुट्ठु दिणु किध रयणी छुडु होइ ।
नववहुदंसणलालसउ वहइ मणोरह सोइ ॥ १ ॥
( कथं समाप्यतां दुष्टं दिनं कथं रात्रिः शीघ्रं ( छुडु ) भवति ।
नववधूदर्शनलालसकः वहति मनोरथान् सोऽपि ॥ )

*दुष्ट दिवस कसा संपेल ? रात्र लौकर कशी होईल ?* नववधूला भेटण्यास उत्सुक झालेला तो ( असे ) मनोरथ करतो

*[ येथें, कथम् चे केम व किध हे आदेश झालेले आहेत ]*

ओ गोरीमुहनिज्जिअउ वद्दलि लुक्कु मियङ्कु ।
अन्नु वि जो परिहवियतणु सो किवँ भवँइ निसङ्कु ॥ २ ॥
( ओ गौरीमुखनिर्जितकः वार्दले निलीनः मृगाङ्कः ।
अन्योऽपि यः परिभूततनुः स कथं भ्रमति निःशङ्कम् ॥ )

---

१ म्हणजे – कथम्–केम ( केवँ ), किम ( किवँ ), किह, किध, यथा–जेम, ( जेवँ ), जिम ( जिवँ ), जिह, जिध, तथा–तेम ( तेवँ ) तिम ( तिवँ ), तिह, तिध

मला वाटतें (की)–सुंदरीच्या मुखानें जिंकल्यानें चंद्र ढगांआड दडत आहे ज्याचे शरीर पराभूत झालें आहे असा दुसरा कोणीहि निःशंकपणें कसा वरें हिंडेल?

[ येथ कथम् चा किंवँ (किम) असा आदेश झाला आहे ]

बिंबाहरि तणु रयणवणु किह ठिउ सिरिआणंद ।
निरुवमरसु पिएं पिअवि जणु सेसहो दिण्णी मुद्द ॥ ३ ॥
( बिम्बाधरे तन्व्याः रदनव्रणः कथं स्थितः श्रीआनन्द ।
निरुपमरसं प्रियेण पीत्वा शेषस्य दत्ता मुद्रा ॥ )

आनंदा, सुंदरीच्या बिंबाधरावर दंत-व्रण कसा (राहिलेला) आहे? (उत्तर – उत्कृष्ट रस पिऊन प्रियकरानें जणु उरलेल्यावर मुद्रा केली आहे

[ येथ कथं चा किह असा आदेश झाला आहे ]

भण सहि निहुअउँ तेवँ मइ जइ पिउ दिट्ठु सदोसु ।
जेवँ न जाणइ मज्झु मणु पक्खावडिअं तासु ॥ ४ ॥
( भण सखि निभृतकं तथा मयि यदि प्रियः दृष्टः सदोषः ।
यथा न जानाति मम मनः पक्षापतितं तस्य ॥ )

सखी माझा प्रियकर मजशी सदोष असेल तर तू मला (तू) चोरून अशा प्रकारें सांग की त्याचे ठिकाणीं पक्षपाती असणारें माझें मन त्याला कळणार नाहीं

[ येथ तथा चा तेवँ (तम) व यथा चा जेवँ (जेम) असा आदेश आहे ]

जिवँ जिवँ वंकिम लोअणहं ।
तिवँ तिवँ वम्महु निअयसर ॥ ( ३४४ १ )

[ येथें यथा चा जिवँ (जिम) व तथा चा तिवँ (तिम) आदेश झाला आहे ]

मइँ जाणिउ प्रिय विरहिअहं कवि धर होइ विआलि ।
नवर मिअंकु वि तिह तवइ जिह दिणयरु खयगालि ॥ ( ३७७ १ )

[ येथें, तथा चा तिह व यथा चा जिह असे आदेश झाले आहेत ]

एवं तिधजिधावुदाहार्यौ ।

याचप्रमाणें तिध व जिध यांची उदाहरणें घ्यावयाचीं

यादृक्तादृक्कीदृगीदृशां दादेर्डेहः ॥ ४०२ ॥

अपभ्रंशे यादृगादीनां दादेरवयवस्य डित् एह इत्यादेशो भवति ।

---

१ उदा –जिध तिध तोडहि कम्मु । कुमारपालचरित ८ ४९

अपभ्रंशात यादृक् इत्यादि शब्दाच्या द आदि अवयवाचा डित् 'एह' असा आदेश होतो उदा० —

मइं भणियउ बलिराय तुहुं केहउ मग्गण एहु ।
जेहु तेहु न वि होइ वढ सइं नारायणु एहु ॥ १ ॥
(मया भणितः बलिराज त्वं कीदृग् मार्गणः एषः ।
यादृक्तादृग् नापि भवति मूर्ख स्वयं नारायण ईदृक् ॥)

हे बलिराजा हा कसला याचक आहे हें मी तुला सांगितलें होतें मूर्खा, हा असला तसला कोणी नसून हा स्वतः स्वत नारायण आहे

[ येथें, केहउ (कीदृक्), जेहु (यादृक्,) तेहु (तादृक्), व एहु (ईदृक्) असे आदेश आहेत ]

अतां डइसः ॥ ४०३ ॥

अपभ्रंशे यादृगादीनामदन्तानां यादृशतादृशकीदृशेदृशानां दादेरवयवस्य डित् अइस इत्यादेशो भवति ।

अपभ्रंशात अदन्त (अकारान्त) यादृक्[1] इत्यादि शब्दाच्या — यादृश, तादृश, कीदृश, ईदृश या शब्दाच्या — द — आदि अवयवाचा डित् 'अइस' असा आदेश होतो उदा० —

जइसो । तइसो । कइसो । अइसो ।
(यादृशः । तादृशः । कीदृशः । ईदृशः ।)
जसला तसला कसला असला

यत्रतत्रयोस्त्रस्य डिदेत्थवत्तु ॥ ४०४ ॥

अपभ्रंशे यत्रतत्रशब्दयोस्त्रस्य एत्थु अत्तु इत्येतौ डितौ भवतः ।

अपभ्रंशात यत्र व तत्र या शब्दांतील 'त्र'चे एत्थु व अत्तु असे डित्[2] होतात उदा० —

जइ सो घडदि प्रयावदी केत्थु वि लेप्पिणु सिक्खु ।
जेत्थु वि तेत्थु वि एत्थु जगि भण तो तहि सारिक्खु ॥ १ ॥
(यदि स घटयति प्रजापतिः कुत्रापि लात्वा शिक्षाम् ।
यत्रापि तत्रापि अत्र जगति भण तदा तस्याः सदृशीम् ॥)

---

१ यादृश् इत्यादिवरून मागच्या अकारान्त यादृश इत्यादि शब्दांच्या
२ यत्र—जेत्थु जत्तु, तत्र—तेत्थु, तत्तु

जर तो प्रजापति कोठून तरी शिक्षण मिळवून (प्रजा) निर्माण करीत असेल तर या जगात येथें तेथें तिच्यासारखी कोण आहे, तें सांग

[येथें यत्र चा जेत्थु व तत्र चा तेत्थु असा आदेश आहे ]

अत्तु ठिदो । तत्तु ठिदो ।
(यत्र स्थित । तत्र स्थित )
जेथें राहिला तेथें राहिला

[येथें, यत्र चा जत्तु व तत्र चा तत्तु असा आदेश आहे ]

**एत्थु कुत्रात्र ॥ ४०५ ॥**

**अपभ्रंशे कुत्र अत्र इत्येतयोस्त्रशब्दस्य डित् एत्थु इत्यादेशो भवति ।**

अपभ्रंशात कुत्र आणि अत्र या शब्दातील 'त्र' चा डित् 'एत्थु' असा आदेश होतो उदा –

केत्थु वि लेप्पिणु सिक्खु ।
जेत्थु वि तेत्थु वि एत्थु जगि (४०४ १)।

[येथें कुत्र चा केत्थु व अत्र चा एत्थु असे आदेश झालेले आहेत ]

**यावत्तावदोर्वादेर्म उ महिं ॥ ४०६ ॥**

**अपभ्रंशे यावत्तावदित्यव्यययोर्वकारादेरवयवस्य म उ महिं इत्येते त्रय आदेशा भवन्ति ।**

अपभ्रंशात यावत् आणि तावत् या अव्ययातील वकारादि अवयवाचे म, उ, महिं असे तीन आदेश होतात उदा –

**जाम न निवडइ कुम्भयडि सीहचवेडचडक्क ।**
**ताम समत्तहँ मयगलहं पइ पइ वज्जइ ढक्क ॥ १ ॥**
(यावत् न निपतति कुम्भतटे सिंहचपेटाचटत्कार ।
तावत् समस्तानां मदकलानां (गजानां) पदे पदे वाद्यते ढक्का ॥)
(तमेंच म चा वँ होऊन जावँहि आणि तावँहि असें होऊं शकतें )

जोंपर्यंत सिंहाच्या पंजाचा तडाका गंडस्थळावर पडला नाही तोंपर्यंतच पावलोंपावली सर्व मदोन्मत्त हत्तींचा नगारा वाजत असतो

---

१ यावत्-जाम (जावँ), जाउं, जामहिं तावत्-ताम (तावँ), ताउं, तामहिं

[ येथें, यावत् चा जाम, व तावत् चा ताम, असे आदेश आहेत ]

तिलहँ तिलत्तणु ताउँ पर जाउँ न नेह गलन्ति।
नेहि पणट्ठइ ते जि तिल तिल फिट्टवि खल होंति ॥ १ ॥
( तिलाना तिलत्व तावत् परं यावत् न स्नेहा गलन्ति।
स्नेहे प्रनष्टे ते एव तिला तिला भ्रष्टा खला भवन्ति ॥ )

जोंपर्यंत तेल काढलेलें नाही तोंपर्यंत तिळाचें तिळपण तेल निघून जाताच ते तिळ तिळ न रहाता खल ( पेंड, दुष्ट ) होतात

[ येथें, तावत् चा ताउ, व यावत् चा जाउ, असा आदेश झाला आहे ]

जामहिँ विसमी कज्जगइ जीवहँ मज्झे एइ।
तामहिँ अच्छउ इयरु जणु सुअणु वि अंतरु देइ ॥ २ ॥
( यावद् विषमा कार्यगति जीवाना मध्ये आयाति।
तावद् आस्तामितर जन सुजनोऽप्यन्तर ददाति ॥ )

जेव्हा जीवावर विषम कार्यगति येते, तेव्हा इतरे जन राहू देत ( पण ) सुजनसुद्धा अतर देतो

[ यथ, यावद् चा जामहिं, व तावद् चा तामहिं, असे आदेश झालेले आहेत ]

## वा यत्तदोतोर्डेवड ॥ ४०७ ॥

अपभ्रंशे यद् तद् इत्येतयोरन्त्ययोर्यावत्तावतोर्वकारादेरवयवस्य डित् एवड इत्यादेशो वा भवति।

अपभ्रंशात यद् आणि तद् यापासून बनणाऱ्या अतु प्रत्ययान्त यावद् व तावद् याच्या वकारादि अवयवाचा डित् ' एवड ' असा आदेश विकल्पानें होतो उदा –

जेवडु अतरु रावणरामहँ तेवडु अंतरु पट्टणगामहँ।
( यावद् अन्तर रावणरामयो तावद् अन्तर पट्टणग्रामयो। )

जितके अंतर राम व रावण यात तितके अतर गाव व नगर यात

[ येथ, यावत् चा जेवड, आणि तावत् चा तेवड, असे आदेश झालेले आहेत ]

पक्षे। विकल्पपक्षी ( म्हणजे यावद्, तावद् चे जेव्हा जेवड, तेवड असे आदेश होत नाहीत, तेव्हां जेत्तुल, तेत्तुल असे आदेश होतात उदा –)

जेत्तुलो। तेत्तुलो।

## वेदं – किमोर्यादे ॥ ४०८ ॥

अपभ्रंशे इदं किम् इत्येतयोरन्त्ययोरियत्कियतोर्यकारादेरवयवस्य डित् एवड इत्यादेशो वा भवति।

अपभ्रंशात इदम् व किम् यांपासून बनणाऱ्या अतु प्रत्ययान्त इयत् आणि कियत् याच्या यकारादि अवयवाचा डित् 'एवड' असा आदेश विकल्पाने होतो उदा —

एवड्डु अतरु । केवड्डु अतरु । (इयद् अन्तरम् । कियद् अन्तरम् ।)
एवढें अंतर केवढ अंतर

पक्षे । विकल्पपक्षीं (म्हणजे जेव्हा इदम् व किम् याचे एवड आणि केवड असे आदेश होत नाहींत, तेव्हा)

एत्तुलो । केत्तुलो ।

परस्परस्यादिर ॥ ४०९ ॥

अपभ्रंशे परस्परस्यादिरकारो भवति ।

अपभ्रंशात 'परस्पर' या शब्दात आरंभीं अकार येतो उदा —

ते मुग्गडा हराविआ जे परिविट्ठा ताहं ।
अवरोप्परु जोअन्ताहं सामिउ गञ्जिउ जाहं ॥ १ ॥

(ते मुद्गा हारिता ये परिविष्टा तेषाम् ।
परस्पर युध्यमानाना स्वामी पीडित येषाम् ॥)

परस्पराशीं लढणाऱ्यापैकीं ज्याचा स्वामी पीडित झाला त्याना वाढलेले अन्न (श –मूग) वाया गेले

[ येथ, अवरोप्परु मध्ये आरंभीं अकार आलेला आहे ]

कादि-स्थैदोतोरुच्चारलाघवम् ॥ ४१० ॥

अपभ्रंशे कादिषु व्यञ्जनेषु स्थितयो ए ओ इत्येतयोरुच्चारणस्य लाघवं प्रायो भवति ।

अपभ्रंशात क् इत्यादि व्यञ्जनात (संयुक्त) असणारे ए व ओ याचा उच्चार प्राय लघु (ह्रस्व) होतो उदा —

सुधे॑ चिंतिज्जइ माणु । (३९६ २)

[ यथे, सुधे॑ मध्ये ए चा उच्चार लघु आहे ]

तसु हउँ कलिजुगि दुल्लहहो॑ । (३३८ १)

[ येथ, दुल्लहहो॑ मधील ओ चा उच्चार लघु आहे ]

पदान्ते उं-हुं-हिं-हंकाराणाम् ॥ ४११ ॥

अपभ्रंशे पदान्ते वर्तमानानां उं हुं हिं हं इत्येषां उच्चारणस्य लाघवं प्रायो भवति ।

अपभ्रंशात पदान्तीं असणाऱ्या उं, हुं, हिं आणि हं याचा उच्चार प्राय: लघु होतो. उदा. :-

अन्नु जु तुच्छउँ तहे॑ घणहे। (३५०·१)

बलि किज्जउँ सुअणस्सु। (३३८·१)

[ येथें, तुच्छउँ आणि किज्जउँ मधील उँ चा उच्चार लघु आहे. ]

दइउ घडावइ वणि तरुहुँ। (३४०·१)

तरुहुँ वि वक्कलु। (३४१ २)

[ येथें तरुहुँ मधील हुँ चा उच्चार लघु आहे ]

खग्गविसाहिउ जहिँ लहहुं। (३८६·१)

[ येथें, जहिँ मधील हिँ चा उच्चार लघु आहे ]

तणहँ तइज्जी भंगि न वि (३३९ १)

[ येथें, तणहँ मधील हँ चा उच्चार लघु आहे ]

## म्हो म्भो वा ॥ ४१२ ॥

अपभ्रंशे म्ह इत्यस्य स्थाने म्भ इति मकाराक्रान्तो भकारो वा भवति।

अपभ्रंशात 'म्ह' च्या स्थानीं 'म्भ' असा मकारयुक्त भकार विकल्पानें होतो.

म्ह इति 'पक्ष्म-श्म-ष्म-स्म-ह्मां म्हः' (२·७४) इति प्राकृतलक्षण-विहितोत्र गृह्यते। संस्कृते तदसम्भवात्।

प्राकृतव्याकरणात 'पक्ष्म ... म्हः' या सूत्रानें सांगितलेला म्ह येथें घेतलेला आहे. (कारण) संस्कृतमध्यें असा म्ह असत नाहीं.

उदा. :- गिम्भो। (√ गिम्ह-ग्रीष्म) सिम्भो। (सिम्ह- √ श्लेष्मा)

बम्भ ते विरला के वि नर जे सव्वंग-छइल्ल।
जे वंका ते वंचयर जे उज्जुअ ते॑ बइल्ल॥ १ ॥
(ब्रह्मन् ते विरला: केऽपि नरा: ये सर्वाङ्गच्छेका:।
ये वक्रा: ते वञ्च (क) तरा: ये ऋजव: ते बलीवर्दा: ॥)

हे ब्राह्मणा, सर्व अंगानीं हुषार असे जे कोणी नर असतात, ते विरळा असतात. जे वाकडे आहेत ते फसविणारे असतात, जे सरळ असतात ते बैलोबा असतात.

[ येथें, बम्भ मध्यें म्ह चा म्भ झाला आहे. ]

## अन्यादृशोऽन्नाइसावराइसौ ॥ ४१३ ॥

अपभ्रंशे अन्यादृशशब्दस्य अन्नाइस अवराइस इत्यादेशौ भवतः।

अपभ्रंशात 'अन्यादृश' या शब्दाचे 'अनाइस' व 'अवराइस' असे आदेश होतात उदा — अन्नाइसो। अवराइसो। (अन्यादृश ।)

**प्रायस प्राउ–प्राइव–प्राइम्व–पग्गिम्वा: ॥४१४॥**

अपभ्रंशे प्रायस् इत्येतस्य प्राउ प्राइव प्राइम्व पग्गिम्व इत्येते चत्वार आदेश भवन्ति।

अपभ्रंशात प्रायस् या (शब्दा)चे प्राउ प्राइव प्राइम्व आणि पग्गिम्व असे चार आदेश होतात उदा —

> **अन्ने ते दीहर लोअण अन्नु तं भुअजुअलु**
> **अन्नु सु घणथणहारु स अन्नु जि मुहकमलु।**
> **अन्नु जि केसकलावु सु अन्नु जि प्राउ विहि**
> **जेण णिअंबिणि घडिअ स गुणलायण्णणिहि ॥ १ ॥**
> (अन्ये ते दीर्घे लोचने अन्यत् तद् भुजयुगलम्
> अन्यः स घनस्तनभारः तदन्यदेव मुखकमलम्।
> अन्य एव केशकलापः स अन्य एव प्रायो विधिः
> येन नितम्बिनी घटिता सा गुणलावण्यनिधिः ॥)

ते दीर्घ लोचन निराळेच आहेत तें भुजयुगल निराळेंच आहे तो घनस्तनाचा भार निराळाच आहे, तें मुखकमल निराळेंच आहे केशकलाप निराळाच आहे आणि गुण व लावण्य यांचा निधि अशी (अमली) सुंदरी (नितम्बिनी) ज्यानें घडवली तो विधि (ब्रह्मदेव) हि निराळाच आहे

[येथें प्रायस् चा प्राउ हा आदेश आहे]

> **प्राइव मुणिहँ वि भंतडी तें मणिअडा गणंति।**
> **अखइ निरामइ परमपइ अज्ज वि लउ न लहंति ॥ २ ॥**
> (प्रायो मुनीनामपि भ्रान्तिः ते मणीन् गणयन्ति।
> अक्षये निरामये परमपदे अद्यापि लयं न लभन्ते ॥)

प्राय मुनींनासुद्धा भ्रांति आहे, ते (फक्त) मणि मोजतात, (पण) अद्यापि अक्षर निरामय अशा परमपदांत ते लीन झालेले नाहींत

[येथें प्रायस् चा प्राइव हा आदेश आहे]

> **अंसुजलें प्राइम्व गोरिअहे सहि उव्वत्ता नयणसर।**
> **तें संमुह संपेसिआ देंति तिरिच्छी घत्त पर ॥ ३ ॥**
> (अश्रुजलेन प्रायः गौर्याः सखि उद्वृत्ते नयनसरसी।
> ते संमुखे संप्रेषिते दत्तः तिर्यग् घातं परम् ॥)

सखि, (मला वाटतें) सुंदरीचीं नयनरूपी सरोवरें अश्रुजलानें ओसंडत आहेत म्हणून ते जेव्हा समोरासमोर (कुणाकडे तरी पहाण्यास) वळतात, तेव्हा ते तिरका घाव देतात

[येथें, प्रायस् चा प्राइम्व हा आदेश आहे]

एसी पिउ रूसेसु हउँ रुट्ठी मइँ अणुणेइ।
पग्गिम्व एइ मणोरहइँ दुक्करु दइउ करेइ ॥ ४ ॥
(एष्यति प्रियः रोषिष्यामि अहं रुष्टां मामनुनयति।
प्रायः एतान् मनोरथान् दुष्करं दयितः कारयति।)

प्रियकर येईल मी रागावेन रागावलेल्या माझा तो अनुनय करील प्रायः, दुष्ट (दुष्कर) प्रियकर असे मनोरथ करायला लावतो

[येथें, प्रायस् चा पग्गिम्व असा आदेश आहे]

**वान्यथोनुः ॥ ४१५ ॥**

**अपभ्रंशे अन्यथाशब्दस्य अनु इत्यादेशो वा भवति।**

अपभ्रंशात 'अन्यथा' या शब्दाचा 'अनु' असा आदेश विकल्पाने होतो उदा -

विरहानलजालकरालिअउ पहिउ को वि बुड्डिवि ठिअउ।
अनु सिसिरकालि सीअलजलहु धूमु कहन्तिहु उट्ठिअउ ॥ १ ॥
(विरहानलज्वालाकरालितः पथिकः कोऽपि मङ्क्त्वा स्थितः।
अन्यथा शिशिरकाले शीतलजलात् धूमः कुत उत्थितः ॥)

विरहाग्नीच्या ज्वाळांनीं पेटलेल्या कोण्यातरी पथिकानें बुडी मारली असली पाहिजे, नाहींतर (या) शिशिर कालात थंड पाण्यातून वाफ (धूम) कशी आली असती?

[येथें अन्यथा चा अनु असा आदेश झाला आहे]
पक्षे। विकल्पपक्षीं (म्हणजे जेव्हां अनु होत नाहीं तेव्हा)
अन्नह। (अन्यथा।)

**कुतसः कउ कहतिहु ॥ ४१६ ॥**

**अपभ्रंशे कुतस्शब्दस्य कउ कहतिहु इत्यादेशौ भवतः।**

अपभ्रंशात कुतस् या शब्दाचे 'कउ' व 'कहन्तिहु' असे आदेश होतात उदा -

महु कन्तहो गुट्ठट्ठिअहो कउ झुंपडा वलन्ति।
अह रिउरुहिरें उल्हवइ अह अप्पणे न भन्ति ॥ १ ॥

(मम कान्तस्य गोष्ठस्थितस्य कुतः कुटीरकाणि ज्वलन्ति।
अथ रिपुरुधिरेण आर्द्रयति (विध्यापयति-टीकाकार) अथ आत्मना न भ्रान्तिः ॥)

माझा कांत घरी असता झोपड्या कशा पेटतील ? शत्रूच्या रक्ताने वा स्वत:च्या रक्ताने तो त्या विझवील, यात शंका नाही.

[ येथे कुतस् चा कउ हा आदेश आहे. ]

धूमु कहंतिहु उट्ठिअउ । ( ४१५ १ )

[ येथे, कुतस् चा कहंतिहु असा आदेश आहे. ]

तत्स्तदोस्तो ॥ ४१७ ॥

अपभ्रंशे ततस् तदा इत्येतयोस्तो इत्यादेशो भवति ।

अपभ्रंशात ततस् व तदा यांना तो असा आदेश होतो. उदा —

जइ भग्गा पारक्कडा तो सहि मज्झु पिएण ।
अह भग्गा अम्हहं तणा तो तें मारिअडेण ॥ ( ३७९ २ )

[ येथे तदा चा तो असा आदेश आहे. ]

एवं परं समं ध्रुवं मा मनाक् एम्व पर समाणु ध्रुवु मं मणाउं ॥ ४१८ ॥

अपभ्रंशे एवमादीनां एम्वादय आदेशा भवन्ति ।

अपभ्रंशात एवम् इत्यादींचे एम्व इत्यादि आदेश होतात. उदा —

एवम् एम्व । एवम् चा एम्व हा आदेश होतो —

पियसंगमि कउ निद्दडी पिअहो परोक्खहो केम्व ।
मइँ बिन्नि वि विन्नासिआ निद्द न एम्व न तेम्व ॥ १ ॥

( प्रियसङ्गमे कुतो निद्रा प्रियस्य परोक्षस्य कथम् ।
मया द्वे अपि विनाशिते निद्रा नैव न तथा । )

प्रियसंगमाच्या वेळी झोप कोठून (येणार) ? प्रियकर नजरेआड असताना कुठली झोप ? माझ्या दोन्ही (प्रकारच्या निद्रा) नष्ट झाल्या आहेत. मला अशीहि झोप येत नाही नि तशीहि झोप येत नाही.

परम् पर । परम् चा पर असा आदेश होतो.

गुणहिँ न संपइ कित्ति पर । ( ३३५ १ )

समम् समाणु । समम् चा समाणु हा आदेश होतो —

कन्तु जु सीहहो उवमिअइ तं महु खण्डिउ माणु ।
सीहु निरक्खय गय हणइ पिउ पय-रक्ख-समाणु ॥ २ ॥

( कान्तो यत् सिंहेन उपमीयते तन्मम खण्डितो मानः ।
सिंहः नीरक्षकान् गजान् हन्ति प्रियः पदरक्षैः समम् ॥ )

( माझ्या ) प्रियकराची सिंहाशी जी तुलना केली जाते त्यामुळे माझा मान खंडित होतो ( मला लाज वाटते ), कारण सिंह रक्षकरहित हत्तींना ठार करतो, ( पण माझा ) प्रियकर रक्षकासह ( त्यांना ) ठार करतो

**ध्रुवमो ध्रुवु** । ध्रुवम् चा ध्रुवु असा आदेश होतो –

**चचलु जीविउ ध्रुवु मरणु पिअ रूसिज्जइ काइं ।**
**होसहिँ दिअहा रूसणा दिव्वइं वरिससयाइं ॥ ३ ॥**
( चञ्चल जीवितं ध्रुवं मरणं प्रिय रुष्यते किम् ।
भविष्यन्ति दिवसा रोषयुक्ता ( रूसणा ) दिव्यानि वर्षशतानि ॥ )

जीवित चचळ आहे, मरण निश्चित आहे, प्रियकरा, कशाला रागवावे ? ज्या दिवशी राग आहे ते दिवस शेंकडों दिव्य वर्षांप्रमाणें भासतात

**मो म** । मा चा म हा आदेश होतो --
म धणि करहि विसाउ ( ३८५ १ )

**प्रायोग्रहणात्** । प्रायोग्रहणामुळें ( कधी मा चा म न होता म होतो, वा मा तसाच रहातो उदा–)

**माणि पणट्ठइ जइ न तणु तो देसडा चइज्ज ।**
**मा दुज्जणकरपल्लवेँहिँ दसिज्जंतु भमिज्ज ॥ ४ ॥**
( माने प्रनष्टे यदि न तनु ततः देश त्यजेः ।
मा दुर्जनकरपल्लवैः दर्श्यमानः भ्रमेः ॥ )

( आपला ) मान नष्ट झाल्यावर, जरी देह नाही तरी देश सोडून द्यावा दुष्टाच्या करपल्लवांनी दर्शविला जात ( तेथें ) हिंडू नको

[ येथें, मा तसाच राहिलेला आहे ]

**लोणु विलिज्जइ पाणिएंण अरि खल मेह म गज्जु ।**
**वालिउ गलइ सु झुंपडा गोरी तिम्मइ अज्जु ॥ ५ ॥**
( लवणं विलीयते पानीयेन अरे खल मेघ मा गर्ज ।
ज्वालितं गलति तत्कुटीरकं गौरी तिम्यति अद्य ॥ )

मीठ पाण्यानें विरघळतें अरे दुष्ट मेघा, गर्जू नको कारण (ती जळलेली झोपडी गळते, (आतली) सुंदरी आज भिजेल

[ येथें, मा चा म झालेला आहे ]

**मनाको मणाउ** । मनाक् चा मणाउ असा आदेश होतो --

४५१२१४१

विहवि पणट्ठइ वङ्कुडउ रिद्धिहिँ जणसामन्नु ।
किंपि मणाउं मह्नु पिअहो ससि अणुहरइ न अन्नु ॥ ६ ॥

( विभवे प्रनष्टे वक्रः ऋद्धौ जनसामान्य ।
किमपि मनाक् मम प्रियस्य शशी अनुहरति नान्य ॥ )

वैभव नष्ट झालें असता वक्र, वैभवात नेहमीप्रमाणें ( जनसामान्य ) असणारा चद्र – इतर दुसरा कोणीहि नाहीं – माझ्या प्रियकराचें किंचित् अनुकरण करतो

## किलाथवा–दिवा–सह–नहे किराहवइ दिवे सहु नाहिं ॥ ४१९ ॥

अपभ्रंशे किलादीना किरादय आदेशा भवन्ति ।

अपभ्रंशात किल इत्यादींचे किर इत्यादि आदेश होतात उदा –

**किलस्य किर ।** किल चा किर हा आदेश होतो –

किर खाइ न पिअइ न विद्दवइ धम्मि न वेच्चइ रूअडउ ।
इह किवणु न जाणइ जह जमहो खणे ँण पहुच्चइ दूअडउ ॥ १ ॥

( किल न खादति न पिबति न विद्रवति धर्म न व्ययति रूपम् ।
इह कृपणो न जानाति यथा यमस्य क्षणेन प्रभवति दूत ॥ )

खरोखर कृपण खातहि नाहीं पीतहि नाहीं, ( मनात ) विरघळतहि नाहीं व धर्मासाठीं एक रुपयाहि खर्च करीत नाहीं यमाचा दूत एका क्षणात प्रभावी होईल हें तो जाणतहि नाहीं

**अथवोहवइ ।** अथवा चा अहवइ असा आदेश होतो –

अहवइ न सुवसह एह खोडि ।
( अथवा न सुवशाना एष दोष । )

अथवा चागल्या वशात जन्मलेल्याचा हा दोष ( खोडि ) नव्हे

**प्रायोधिकारात् ।** प्रायोधिकारामुळे ( अथवा चा अहवइ न होता कधीं अहवा होइल उदा –)

जाइज्जइ तहिं देसडइ लब्भइ पियहो ँ पमाणु ।
जइ आवइ तो आणिअइ अहवा त जि निवाणु ॥ २ ॥

( यायते [ गम्यते ] तस्मिन् देशे लभ्यते प्रियस्य प्रमाणम् ।
यदि आगच्छति तदा आनीयते अथवा तत्रैव निर्वाणम् ॥ )

ज्या देशांत प्रियकराचा पत्ता ( प्रमाण ) लागेल तेथें जावें जर तो आला तर त्याला आणीन ( नाहीतर ) तेथेंच ( मी ) मरेन

[ येथें, अथवा चा अहवा झालेला आहे ]

**दिवो दिवे ।** दिवा चा दिवे असा आदेश होतो –

दिवि[1] दिवि गगाण्हाणु। (३९९ १)

सहस्य सहु। सह चा सहु असा आदेश होतो —

जउ पवसंतें सहुँ न गय न मुअ विओएँ तस्सु।

लज्जिज्जइ संदेसडा दिंतेहिँ सुहयजणस्सु ॥ २ ॥

(यत्प्रवसता सह न गता न मृता वियोगेन तस्य।

लज्ज्यते सदेशान् ददतीभि (अस्माभि) सुभगजनस्य ॥)

प्रवासाला गेलेल्या प्रियकराबरोबर मी गेले नाहीं, आणि त्याच्या वियोगानें मेलेहि नाहीं, या कारणानें त्या प्रियकरास संदेश देण्यास मला लाज वाटते

नहेर्नाहिं। नहि चा नाहिं असा आदेश होतो —

एत्तहे मेह पिअंति जलु एत्तहे वडवानल आवट्टइ।

पेक्खु गहीरिम सायरहो एक्क वि कणिअ नाहिं ओहट्टइ ॥ ४ ॥

(इत मेघा पिबन्ति जल इत वडवानल आवर्तते।

प्रेक्षस्व गभीरिमाण सागरस्य एकापि कणिका नहि अपभ्रस्यते ॥)

इकडे मेघ पाणी पितात इकडे वडवानल क्षुब्ध झाला आहे (तथापि) सागराचें गांभीर्य पहा, (पाण्याचा) एक कणहि कमी झालेला नाहीं

**पश्चादेवमेवैवेदानीं-प्रत्युतेतस पच्छइ एम्वइ जि एम्वहिं पच्चलिउ एत्तहे ॥ ४२० ॥**

अपभ्रंशे पश्चादादीना पच्छइ इत्यादय आदेशा भवन्ति।

अपभ्रंशात पश्चात् इत्यादींचे पच्छइ इत्यादि आदेश होतात उदा. —

पश्चात पच्छइ। पश्चात् चा पच्छइ हा आदेश होतो —

पच्छइ होइ विहाणु। (३६२ १)

एवमेवस्य एम्वइ। एवमेव चा एम्वइ असा आदेश होतो —

एम्वइ सुरउ समत्तु। (३३२ २)

एवस्य जि। एव चा जि हा आदेश होतो —

जाउ म जन्तउ पल्लवह देक्खउँ कइ पय देइ।

हिअइ तिरिच्छी हउ जि पर पिउ डम्बरइँ करेइ ॥ १ ॥

(यातु मा यान्त पल्लवत द्रक्ष्यामि कति पदानि ददाति।

हृदये तिरश्चीना अहमेव पर प्रिय आडम्बराणि करोति ॥)

---

1 दिवि मधील ह्रस्व ऐ यद्दल इ [illegible] इ व हें रूप

जाऊ दे (त्याला) नागाच्या (त्या) रा (मार्गे) बोलवूं नका जिती पावलें (तो पुढे) जातो तें पहाते त्याच्या हृदयात मी तिरवी (वसलेली) आहे (परंतु माझा) प्रियकर जाण्याचें केवळ अवडंबर करतोय

**इदानीम एम्वहिं ।** इदानीम् चा एम्वहिं असा आदेश होतो –
**हरि नचाविउ पगणइ विम्हइ पाडिउ लोउ ।**
**एम्वहिं राहपओहरइ जं भावइ त होउ ॥ २ ॥**
(हरि नर्तित प्राङ्गणे विस्मये पातित लोक ।
इदानीं राधापयोधरयो यत् (प्रति) भाति तद् भवतु ॥)

अंगणात हरीला नाचवला लोकाना आश्चर्यांत पाडलें आता राधेच्या स्तनाच जें व्हायच असेल तें होऊ दे

**प्रत्युतस्य पचलिउ ।** प्रत्युत चा पचलिउ हा आदेश होतो
**सावसलोणी गोरडी नवखी क वि विसगठि ।**
**भडु पचलिउ सो मरइ जासु न लग्गइ कंठि ॥ ३ ॥**
(सर्वसलावण्या गौरी नवा कापि विषग्रंथि ।
भट प्रत्युत स म्रियते यस्य न लगति कण्ठे ॥)

सर्वांगसुंदर गौरी ताज्या (नवीन) विषग्रंथी (बचनागा) प्रमाणें आहे पण ज्याच्या गळ्याला ती चिकटत नाहीं तो (तरुण) वीर मरतो
**इतस एत्तहे ।** इतस् चा एत्तहे असा आदेश होतो
**एत्तहे मेह पिअति जलु । (४१९४)**

## विषण्णोक्तवर्त्मनो वुन वुत्त विच्चं ॥ ४२१ ॥

**अपभ्रंशे विषण्णादीना वुन्नादय आदेशा भवन्ति ।**
अपभ्रंशात विषण्ण इत्यादींचे वुन इत्यादि आदेश होतात उदा –
**विषण्णस्य वुन्न ।** विषण्ण चा वुन हा आदेश होतो —

**मइँ वुत्तउ तुहुँ धुरु धरहि कसरेहिँ विगुत्ताइ ।**
**पइँ विणु धवल न चडइ भरु एम्वइ वुन्नउ काइ ॥ १ ॥**
(मया उक्त त्व धुर धर गलिवृषभै (कसरेहिँ) विनाटिता ।
त्वया विना धवल नारोहति भर इदानीं विषण्ण किम् ॥)

मी म्हटलें–हे ढवळ्या बैला तू धुरा धर वाईट बैलानीं आम्हाला पीडा दिली आहे, तुझ्याविना भार वाहिला जाणार नाहीं (पण) तू आता विषण्ण का ?

**उक्तस्य वुत्त ।** उक्त चा वुत्त हा आदेश होतो –

मइँ वुत्तउं । (४२१ १)
वर्त्मनो विच । वर्त्मन् चा विच असा आदेश होतो –
विचि न माइ । (३५० १)

### शीघ्रादीनां वहिल्लादय ॥४२२॥

अपभ्रंशे शीघ्रादीनां वहिल्लादय आदेशा भवन्ति ।
अपभ्रंशात शीघ्र इत्यादींचे वहिल इत्यादि आदेश होतात उदा :–
(शीघ्र चा वहिल असा आदेश होतो –)
एक्कु कइअह वि न आवही अन्नु वहिल्लउ जाहि ।
मइँ मित्तडा प्रमाणिअउ पइँ जेहउ खलु नाहिं ॥ १ ॥

(एक कदापि नागच्छसि अन्यत् शीघ्रं यासि ।
मया मित्र प्रमाणितः त्वया यादृशः (त्वं यथा) खलः नहि ॥

एक तू येत नाहीस दुसरें, लौकर जातोस मित्रा, मला कळलें आहे की तुझ्यासारखा दुष्ट कोणीहि नाहीं

झकटस्य घघल । झकट चा घघल हा आदेश होतो :–
जिवँ सुपुरिस तिवँ घघलइं जिवँ नइ तिवँ वलणाइं ।
जिवँ डोंगर तिवँ कोट्टरइं हिआ विसूरहि काइं ॥ २ ॥

(यथा सुपुरुषाः तथा कलहाः यथा नद्यः तथा वलनानि ।
यथा पर्वताः तथा कोटराणि हृदय खिद्यसे किम् ॥)

जसे सुपुरुष आहेत तसे कलह आहेत जशा नद्या आहेत, तशी वळणें आहेत, जसे डोंगर आहेत तशा दऱ्या आहेत हे हृदया, तू खिन्न का होतोस ?

अस्पृश्यसंसर्गस्य विट्टाल । 'अस्पृश्यसंसर्ग' चा 'विट्टाल' आदेश होतो —
जे छड्डेविणु रयणनिहि अप्पउँ तडि घल्लंति ।
तह संखइ विट्टालु पर फुक्किज्जंत भमंति ॥ ३ ॥
(ये मुक्त्वा रत्ननिधिं आत्मानं तटे क्षिपन्ति ।
तेषां शङ्खानां संसर्गः केवलं फूत्क्रियमाणाः भ्रमन्ति ॥

सागर सोडून जे स्वतःला तटावर फेंकतात त्या शंखाचा अस्पृश्यसंसर्ग आहे केवल (दुसऱ्याकडून) फुंकले जात ते भ्रमण करतात

भयस्य द्रवक्क । भय चा द्रवक्क असा आदेश होतो —
दिवेहिँ विढत्तउँ खाहि वढ संचि म एक्कु वि द्रम्मु ।
को वि द्रवक्कउ सो पडइ जेण समप्पइ जम्मु ॥ ४ ॥

( दिवसैः अर्जितं खाद मूर्ख संचिनु मा एकमपि द्रम्मम् ।
किमपि भयं तत् पतति येन समाप्यते जन्म ॥ )

मूर्खा, दिवसांत जें मिळेल तें खा, एक पैसा ( द्रम्म ) मुद्धा सांठवूं नको, कारण असें कांहीतरी भय येतें की ज्यानें जन्माचाच शेवट होतो.

आत्मीयस्य अप्पण । आत्मीय चा अप्पण हा आदेश होतो –

फोडेंति जे हिअडउं अप्पणउं । ( ३५०२ )

दृष्टेर्द्रेहि । दृष्टि चा द्रेहि असा आदेश होतो –

एक्कमेक्कउं जइ वि जोएदि हरि सुट्ठु सव्वायरेण ॥
तो वि द्रेहि जहिं कहिं वि राही ॥
को सक्कइ संवरेवि दड्ढनयणा नेहिं पलुट्टा ॥ ५ ॥

( एकैकं यद्यपि पश्यति हरिः सुष्ठु सर्वादरेण ।
तथापि दृष्टिः यत्र क्वापि राधा ।
कः शक्नोति संवरीतुं नयने स्नेहेन पर्यस्ते ॥ )

जरी चांगल्या प्रकारें, सर्वादरपूर्वक हरि एकेकाकडे पहातो, तरी जेथें राधा आहे तेथें याची दृष्टि जाते स्नेहानें भरलेले डोळे रोखण्यास कोण समर्थ आहे ?

गाढस्य निच्चट्ट । गाढ चा निच्चट्ट हा आदेश होतो –

विहवे कस्सु थिरत्तणउं जोव्वणि कस्सु मरट्टु ।
सो लेखडउ पठाविअइ जो लग्गइ निच्चट्टु ॥ ६ ॥

( विभवे कस्य स्थिरत्वं यौवने कस्य गर्वः ।
स लेखः प्रस्थाप्यते य लगति गाढम् ॥ )

वैभवात स्थिरता कुणाची ? यौवनात गर्व कुणाचा ? ( म्हणून ) जो खोलवर बिंबेल ( श-लागेल ) असा लेख पाठविला जात आहे

साधारणस्य सड्ढल । साधारण चा सड्ढल असा आदेश होतो

कहिँ ससहरु कहिँ मयरहरु कहिँ बरिहिणु कहिँ मेहु ।
दूरठिआह वि सज्जणह होइ असड्ढलु नेहु ॥ ७ ॥

( कुत्र शशधरः कुत्र मकरधरः कुत्र बर्हीं कुत्र मेघः ।
दूरस्थितानामपि सज्जनाना भवति असाधारणः स्नेहः ॥ )

कुठें चंद्र, कुठें समुद्र ! कुठें मोर, कुठें मेघ ! सज्जन जरी दूर असले तरी त्यांचा स्नेह असाधारण असतो

कौतुकस्य कोड्डु । कौतुक चा कोड्डु हा आदेश होतो –

कुंजरु अन्नइँ तरुअरइं कुड्डेँण घल्लइ हत्थु ।

मणु पुणु एक्कहिँ सल्लइहिँ जइ पुच्छह परमत्थु ॥ ८ ॥

( कुंजर अन्येषु तरुवरेषु कौतुकेन घर्षति हस्तम्।

मन पुन एकस्यां सल्लक्यां यदि पृच्छथ परमार्थम् ॥ )

इतर चांगल्या वृक्षावर हत्ती आपली सोंड कौतुकानें ( खेळ म्हणून ) घासतो, पण खरी गोष्ट विचाराल तर त्याचं मन मात्र एका सल्लकी ( वृक्षा ) वरच आहे

क्रीडायां खेड्डु । क्रीडा चा खेड्डु असा आदेश होतो –

खेड्डय कयमम्हेहिँ निच्छय किं पयंपह ।

अणुरत्ताउ भत्ताउ अम्हे मा चय सामिअ ॥ ९ ॥

( क्रीडा कृता अस्माभिः निश्चयं किं प्रजल्पत ।

अनुरक्ता भक्ता अस्मान् मा त्यज स्वामिन् ॥ )

स्वामी आम्ही क्रीडा केली तुम्ही असें का बोलता? अनुरक्त अशा आम्हा भक्तांचा त्याग करू नका

रम्यस्य रवण्णः । रम्य चा रवण्ण हा आदेश होतो –

सरिहिँ न सरेहिँ न सरवरेहिँ न वि उज्जाणवणेहिँ ।

देस रवण्णा होंति वढ निवसन्तेहिँ सुअणेहिँ ॥ १० ॥

( सरिद्भिः न सरोभिः न सरोवरैः नापि उद्यानवनैः ।

देशाः रम्या भवन्ति मूर्ख निवसद्भिः सुजनैः ॥ )

मूर्खा, नद्यांनी वा तळ्यांनी अथवा सरोवरांनी किंवा उद्यानांनी वा वनांनी देश रम्य होत नाहीत तर सुजनांच्या राहण्यानें ( रम्य ) होतात

अद्भुतस्य ढक्करि । अद्भुतचा ढक्करि असा आदेश होतो –

हिअडा पइँ एहु बोल्लिअओ महु अग्गइ सयवार ।

फुट्टिसु पिएँ पवसंति हउँ भण्डय ढक्करिसार ॥ ११ ॥

( हृदय त्वया एतद् उक्तं मम अग्रतः शतवारम् ।

स्फुटिष्यामि प्रियेण प्रवसता ( सह ) अहं भण्ड अद्भुतसार ॥ )

हे अद्भुतशक्तियुक्त शठ हृदया, तू माझ्यापुढे शेंकडा वेळा म्हणाला होतास कीं जर प्रियकर प्रवासाला जाईल तर मी फुटेन

हे सखीत्यस्य हेल्लि । हे सखि चा हेल्लि हा आदेश होतो –

हेल्लि म झङ्खहि आलु । ( ३७९ १ )

पृथक्पृथगित्यस्य जुअंजुअः ।

पृथक्पृथक् याचा जुअंजुअ असा आदेश होतो :–

एक्क कुडुल्ली पंचहिँ रुद्धी तहँ पंचहँ वि जुअंजुअ बुद्धी।
बहिणुएँ तं घर कहि किँव नंदउ जेत्थु कुडुंबउँ अप्पणछंदउँ ॥ १२ ॥
(एका कुटी पञ्चभिः रुद्धा तेषां पञ्चानामपि पृथक्पृथक् बुद्धिः।
भगिनि तद् गृहं कथय कथं नन्दतु यत्र कुटुम्बं आत्मच्छन्दकम् ॥)

एक (शरीररूपी) कुटी (झोपडी) आहे, तिच्यावर पाचांचा अधिकार आहे (रुद्ध); पाचांची बुद्धि पृथक् पृथक् आहे. हे बहिणी, जेथ कुटुंब आपापल्या छंदाप्रमाणे वागते ते घर आनंदी कसे राहील, ते सांग

मूढस्य नालिअ– वढौ। मूढ चे 'नालिअ' आणि 'वढ' असे आदेश होतात :–

जो पुणु मणि जि खसफसिहूअउ
चिंतइ देइ न दम्मु न रूअउ।
रइवसभमिर करग्गुल्लालिउ
घरहिँ जि कोंतु गुणइ सो नालिउ ॥ १३ ॥
(यः पुनः मनस्येव व्याकुलीभूतः
चिन्तयति ददाति न द्रम्मं न रूपकम्।
रतिवशभ्रमणशील कराग्रोल्लालितं
गृहे एव कुन्तं गणयति स मूढः ॥)

जो मनात व्याकुळ होऊन चिंता करतो पण एक पैसा किंवा रुपया देत नाही तो एक मूर्ख, रतिवश होऊन हिंडणारा व घरातच बोटांनी जो भाला फिरवतो, तो एक मूर्ख

दिवेहिँ विढत्तउँ खाहि वढ। (४२२.४)

नवस्य नवख। नव चा नवख[1] हा आदेश होतो –

नवखी कवि विसगंठि। (४२०.३)

अवस्कन्दस्य दडवड। अवस्कंद चा दडवड असा आदेश होतो –

चलेहिँ चलंतेहिँ लोअणेहिँ जे तइँ दिट्ठा बालि।
तहिँ मयरद्धय–दडवडउ पडइ अपूरइ कालि ॥ १४ ॥
(चलाभ्यां वलमानाभ्यां लोचनाभ्यां ये त्वया दृष्टा बाले।
तेषु मकरध्वजावस्कन्दः पतति अपूर्णे काले ॥)

हे बाले, तुझ्या चंचल डोळ्यांनी जे पाहिले गेले त्यांच्यावर अपूर्ण काळीच मदनाचा हल्ला होतो

---

१ म – नवखा, नवखी

५

यत्सुट्ठु । यदि चा छुड्ड हा आदेश होतो –

छुड्ड अग्घइ ववसाउ । ( ३८५ १ )

संबन्धिन केर तणौ । संबंधि चे केर व तण असे आदेश होतात –

गयउ सु केसरि पिअहु जलु निच्चिंतइँ हरिणाइ ।
जसु करेंएँ हुंकारडएँ मुहहुँ पडंति तृणाइ ॥ १५ ॥

( गत स केसरी पिवत जल निश्चित हरिणा ।
यस्य संबन्धिना हुंकारेण मुखेभ्य पतन्ति तृणानि ॥ )

हरिणानों ज्याच्या हुंकाराने मुखातून गवत गळून पडते तो सिंह ( आता ) गेला ( तेव्हा ) निश्चितपणे पाणी प्या

अइ भग्गा अम्हह तणा । ( ३७९ २ )
माभैषीरित्यस्य मब्भीसेति स्त्रीलिङ्गम् ।

मा भैषी याचा मब्भीसा असा स्त्रीलिंगी ( शब्द ) आदेश होतो –

सत्थावत्थह आलवणु साहु वि लोउ करेइ ।
आदन्नहँ मब्भीसडी जो सज्जणु सो देइ ॥ १६ ॥

( स्वस्थावस्थानामालपन सर्वोऽपि लोक करोति ।
आर्तानां मा भैषी इति य सुजन स ददाति ॥ )

स्वस्थावस्थेत असणाऱ्यांशी सर्वच लोक बोलतात ( पण ) भिऊ नको असें ( फक्त ) सज्जनच पीडिता ( दु खिता ) ना म्हणतात

यद्यद् दृष्ट तत्तदित्यस्य जाइट्ठिआ ।

यद् यद् दृष्ट तद् तद् याचा जाइट्ठिआ असा आदेश होतो –

जइ रच्चसि जाइट्ठिअए हिअडा मुद्धसहाव ।
लोहेँ फुट्टणएण जिवँ घणा सहेसइ ताव ॥ १७ ॥

( यदि रज्यसे यद्यद् दृष्ट तस्मिन् हृदय मुग्धस्वभाव ।
लोहेन स्फुटता यथा घन ( =ताप ) सहिष्यते तावत् ॥ )

हे मुग्ध्या हृदया जें जें पाहिलेस त्या ठिकाणी ( जर ) आसक्त झालास ( तर ) फुटणाऱ्या लोखंडाला जसे घणाचे घाव तसा ताप तुला सोसावा लागेल

हुहुरु-घुग्घादय शब्दचेष्टानुकरणयो ॥ ४२३ ॥

अपभ्रंशे हुहुर्वादय शब्दानुकरणे घुग्घादयश्चेष्टानुकरणे यथासंख्य प्रयोक्तव्या ।

अपभ्रंशात हुहुरु इत्यादि शब्द शब्दानुकरण दर्शविण्यास, व घुग्घ इत्यादि (शब्द) चेष्टानुकरण दर्शविण्यास अनुक्रमें उपयोजावेत उदा –

मइँ जाणिउँ बुड्डीसु हउँ पेम्मद्रहि हुहुरु त्ति।
नवरि अचिंतिय संपडिय विप्पियनाव झड त्ति ॥ १ ॥

(मया ज्ञात मङ्क्ष्यामि अह प्रेमहदे हुहुरु शब्द कृत्वा।
केवल अचिन्तिता सपतिता विप्रिय – नौ झटिति ॥)

मला वाटलें – हुहुरु शब्द करीत मी प्रेमरूपी सरोवरात बुडी मारेन पण अचानक कल्पना नसता विरहरूपी नौका (मग) मिळाली

आदिग्रहणात्। (सूत्रातील) आदि शब्दानें (असलेच इतर शब्दानुकारी शब्द जाणावयाचे आहेत)

खज्जइ नउ कसरक्केहिं पिज्जइ नउ घुण्टेहिं।
एम्वइ होइ सुहच्छडी पिएँ दिट्ठे नयणेहिं ॥ २ ॥ इत्यादि ॥

(खाद्यते न कसरत्कशब्द कृत्वा पीयते न घुट् शब्द कृत्वा।
एवमेव भवति सुखासिका प्रिये दृष्टे नयनाभ्याम् ॥)

जेव्हा डोळ्यानीं प्रियकर पाहिला जातो तेव्हा कस् कस् शब्द करीत खाल्लेहि जात नाहीं अथवा घुट् घुट् प्यालेहि जात नाहीं (तरी) सुखस्थिति आहे

इत्यादि (इतर उदाहरणें जाणावयाचीं आहेत)

[येथें, कसरक्क व घुट हे शब्दानुकरणी शब्द आहेत]

(चेष्टानुकरण दर्शविण्यास घुग्घ —)
अज्ज वि नाहु महु जि घरि सिद्धत्था वंदेइ।
ताउँ जि विरहु गवक्खेहिं मक्कडघुग्घिउ देइ ॥ ३ ॥

(अद्यापि नाथ: ममैव गृहे सिद्धार्थान् वन्दते।
तावदेव विरह: गवाक्षेषु मर्कटचेष्टा ददाति ॥)

माझा नाथ जैन प्रतिमाना वदन करीत अद्यापि घरातच आहे (प्रवासाला गेलेला नाहीं) तवरच विरह गवाक्षात माकडचेष्टा करीत आहे

आदिग्रहणात्। (सूत्रातील) आदि शब्दानें (असलेच इतर चेष्टानुकरणी शब्द जाणावयाचे आहेत उदा)

सिरि जरखंडी लोअडी गलि मणियडा न वीस।
तो वि गोट्ठडा कराविआ मुद्धएँ उट्ठबईस ॥ ४ ॥ इत्यादि।

[ येथें, केहिँ व रेसि हे निपात तादर्थ्यी आहेत. ]

एवं तेहिंरेसिमावुदाहार्यौ ।

याचप्रमाणें तेहिं व रेसि यांचीं उदाहरणें जाणावयाचीं आहेत.

वड्डत्तणहो॑ तणेण । ( ३६६·१ )

[ येथें, तणेण हा तादर्थ्यी निपात आहे ]

## पुनर्विनः स्वार्थे डुः ॥ ४२६ ॥

अपभ्रंशे पुनर्विना इत्येताभ्यां पर स्वार्थे डुः प्रत्ययो भवति ।

अपभ्रंशात पुनः आणि विना यांच्यापुढें स्वार्थे उ ( डु ) प्रत्यय लागतो. उदा. :—

सुमरिज्जइ तं वल्लहउं जं वीसरइ मणाउं ।

जहिँ पुणु सुमरणु जाउं गअ तहो॑ नेहहो॑ कइँ नाउँ ॥ १ ॥

( स्मर्यते तद् वल्लभं यद् विस्मर्यते मनाक् ।

यस्य पुनः स्मरणं जातं गतं तस्य स्नेहस्य किं नाम ॥ )

जें थोडे विसरलें असूनहि आठवलें जातें तें प्रिय म्हणावयाचें; पण ज्याचें स्मरण होतें व नष्ट होतें त्या स्नेहाचें नाव काय?

[ येथें, पुणु मध्यें स्वार्थे उ ( डु ) आहे ]

विणु जुज्झें न वलाहुं । ( ३८६ १ )

[ येथें, विणु मध्यें स्वार्थे उ ( डु ) आहे ]

## अवश्यमो डें-डौ ॥ ४२७ ॥

अपभ्रंशेऽवश्यमः स्वार्थे डें ड इत्येतौ प्रत्ययौ भवतः ।

अपभ्रंशांत 'अवश्यम्' ला स्वार्थे एं ( डें ) व अ ( ड ) हे प्रत्यय लागतात. उदा. :—

जिब्भिंदिउ नायगु वसि करहु जसु अधिन्नइँ अन्नइं ।

मूलि विणट्ठइ तुंबिणिहे अवसें सुक्कहिँ पण्णइं ॥ १ ॥

( जिह्वेन्द्रियं नायकं वशे कुरुत यस्य अधीनानि अन्यानि ।

मूले विनष्टे तुम्बिन्या अवश्यं शुष्यन्ति पर्णानि ॥ )

ज्याच्या अधीन इतर ( इंद्रियें ) अशा मुख्य जिव्हेंद्रियाला वश करा. तुंबिनी ( दुध्या भोपळ्या ) चें मूळ नष्ट झाल्यावर पानें अवश्य सुकून जातात.

[ येथें अवन्य चा अवर्से झाला आहे ]

अवस न सुअहिँ सुहच्छिअहिं । ( ३७६ २ )

[ येथें अवश्यम् चा अवस झाला आहे ]

एकशसो डि ॥४२८॥

अपभ्रंशे एकशश्शब्दात्स्वार्थे डिर्भवति ।

अपभ्रंशात एकश शब्दापुढ स्वार्थे इ ( डि ) प्रत्यय लागतो उदा -

एक्कसि सीलकलंकिअह दिज्जहिँ पच्छित्तइं ।

जो पुणु खण्डइ अणुदिअहु तसु पच्छित्तें काइं ॥ १ ॥

( एकश शीलकलङ्कितानां दीयन्ते प्रायश्चित्तानि ।

य पुन खण्डयति अनुदिवस तस्य प्रायश्चित्तेन किम् ॥ )

*एकदाच शील कलंकित झालेल्याना प्रायश्चित्ते दिलीं जातात पण जो रोज ( शील ) खण्डित करतो त्याला प्रायश्चित्ताचा काय उपयोग ?*

[ येथ, एकश चा एक्कसि झाला आहे ]

अडडडुल्लाः स्वार्थिक कलुक् च ॥ ४२९ ॥

अपभ्रंशे नाम्न परत स्वार्थे अ डड डुल्ल इत्येते त्रय प्रत्यया भवन्ति तत्सन्नियोगे स्वार्थे कप्रत्ययस्य लोपश्च ।

*अपभ्रंशात नामाच्या पुढ स्वार्थ अ अड ( डड ) उल्ल ( डुल्ल ) असे तीन प्रत्यय लागतात, आणि त्याच्या सनियोगामुळे स्वार्थ क प्रत्ययाचा लोप होतो*

( स्वार्थे अ प्रत्ययाचें उदाहरण )

विरहाणलजालकरालिअउ पहिउ पथि ज दिट्ठउ ।

त मेलवि सव्वहिँ पथिअहि सो जि किअउ अग्गिट्ठउ ॥ १ ॥

( विरहानलज्वालाकरालित पथिक पथि यद् दृष्ट ।

तद् मिलित्वा सर्वैं पथिकै स एव कृत अग्निष्ठ ॥ )

*जेव्हा विरहाग्नीच्या ज्वालानी होरपळलेला पाथक रस्त्यावर दिसला तेव्हा सर्व पथिकानीं मिळून त्याला अग्नीवर ठेवला ( कारण तो मेला होता )*

*[ येथें दिट्ठ किअउ, अग्गिट्ठउ मध्यें स्वार्थे अ आहे ]*

डड । अड ( डड ) ( स्वार्थे प्रत्ययाचें उदाहरण )

महु कतहो बे दोसडा । ( ३७९ १ )

[ येथ, दोसडा मध्ये अड ( डड ) आहे ]

डुल्ल । उल्ल ( डुल्ल ) ( स्वार्थे प्रत्ययाचे उदाहरण )

एक्क कुडुल्ली पंचहिँ रुद्धी । ( ४२२.१२ )

[ येथ, [1]कुडुल्ली मध्ये उल्ल ( डुल्ल ) आहे ]

**योगजाश्चैषाम् ॥ ४३० ॥**

अपभ्रंशे अडडडुल्लानां योगभेदेभ्यो ये जायन्ते डडअ इत्यादयः प्रत्ययास्तेऽपि स्वार्थे प्रायो भवन्ति ।

अपभ्रंशात अ, अड, उल्ल यांचेपासून परस्पराचे संयोगाने निरनिराळ्या प्रकारें साधलेले जे अडअ ( डडअ ) इत्यादि प्रत्यय होतात, ते सुद्धा प्राय स्वार्थे ( प्रत्यय ) असतात उदा —

**डडअ** । अडअ ( डडअ ) ( प्रत्ययाचें उदाहरण )

फोडेंति जे हिअडउं अप्पणउं । ( ३५० २ )

[ येथ, हिअडउ मध्यें डडअ ( अडअ ) प्रत्यय आहे ]

—अत्र किसलय ( १ २६९ ) इत्यादिना यलुक्।

येथ ( हृदयमध्ये ) ' किसलय ' इत्यादि सूत्रानुसार ' य ' चा लोप झाला आहे

डुल्लअ । उल्लअ ( डुल्लअ ) ( प्रत्ययाचे उदाहरण )

चूडुल्लउ चुण्णीहोइसइ । ( ३९५ २ )

[ येथें, चूडुल्लउ मध्यें उल्लअ ( डुल्लअ ) प्रत्यय आहे ]

डुल्लडड । उल्लअड ( डुल्लडड ) ( प्रत्ययाचें उदाहरण )

सामिपसाउ सलज्जु पिउ सीमासंधिहिँ वासु ।
पेक्खिवि बाहु बलुल्लडा धण मेल्लइ नीसासु ॥ १ ॥

( स्वामिप्रसादं सलज्जं प्रियं सीमासन्धौ वासम् ।
प्रेक्ष्य बाहुबलं धन्या मुञ्चति निश्वासम् ॥ )

( प्रियकरावरील ) स्वामीचा प्रसाद, सलज्ज प्रियकर व सीमासंधीवर वास, आणि ( प्रियकराचें ) बाहुबल पाहून ( सुखी ) सुंदरी निश्वास टाकते

[ येथें, बलुल्लडा मध्यें उल्लअड ( डुल्लडड ) प्रत्यय आहे )

---

१ सूत्र ४३१ पहा

—अन्त्यानि स्यामी दीर्घह्रस्वौ ( ४ ३३० ) इति दीर्घ । एव
बाहु वलुल्लडउ । अत्र प्रयाणां योग ।

यथ (बाहु वलुल्ल डउ या) द्वितीया एकवचनी स्यादि स्यामी दीर्घह्रस्वौ या सूत्रानुसार (अन्त्य स्वर) दीर्घ झाला आहे —याचप्रमाणे बाहु-वलुल्लडउ ( याहू होइल ) यथे ( डुल्ल डअ व अ या ) तीन्हींचाही योग आहे

स्त्रियां तदन्ताड्डी ॥ ४३१ ॥

अपभ्रंशे स्त्रियां वर्तमानेभ्य प्राक्तनसूत्रद्वयोक्तप्रत्ययान्तेभ्यो डी प्रत्ययो भवति ।

अपभ्रंशात स्त्रीलिंगात असणाऱ्या व मागील दोन सूत्रात ( म्हणजे ४२९ ४३० ) सांगितलेल्या प्रत्ययांनी अन्त पावणाऱ्या शब्दाला ई ( डी ) प्रत्यय लागतो उदा

पहिआ दिट्ठी गोरडी दिट्ठी मग्गु निअंत ।
अंसूसासे हिं कंचुआ तिंतुव्वाण करत ॥ १ ॥
( पथिक दृष्टा गौरी दृष्टा मार्गमवलोकयन्ती ।
अश्रूच्छ्वासै कञ्चुकं तिमितोद्वान ( आर्द्रशुष्क ) कुर्वती ॥ )

( एक पांथस्थ दुसऱ्या पथिकाला आपल्या प्रियेबद्दल विचारतो ) पथिका (मार्गी) प्रिया पाहिली ? तुझी वाट पहाणारी व अश्रु व श्वास यांनी चोळी ओली व सुकी करणारी ( अशी ती मला ) दिसली

[ यथे गोरडी मध्ये ई ( डी ) प्रत्यय आहे ]
एक्क कुडुल्ली पचहिँ रुद्धी । ( श्लोक १ ) ४२२ १२
[ यथ कुडुल्ली मध्ये ई ( डी ) प्रत्यय आहे ]

आ न्तताड्डा ॥ ४३२ ॥

अपभ्रंशे स्त्रियां वर्तमानात्प्रत्ययान्तप्रत्ययान्तात् डा प्रत्ययो भवति । ड्यपवाद ।

अपभ्रंशात स्त्रीलिंगात असणाऱ्या प्रत्ययांनी अन्त पावणाऱ्या वा प्रत्ययांनी अन्त न पावणाऱ्या शब्दाला आ ( डा ) प्रत्यय लागतो ( हा नियम ) ई ( डी ) प्रत्यय लागतो या ( नियमा ) चा अपवाद आहे

पिउ आइउ सुअ वत्तडी झुणि कन्नडइ पइट्ठ ।
तहो विरहहो नासन्तअहो धूलडिआ वि न दिट्ठ ॥ १ ॥
( प्रिय आयात श्रुता वार्ता ध्वनि कर्णं प्रविष्ट ।
तस्य विरहस्य न श्यत धूलिरपि न दृष्टा ॥ )

प्रियकर आला (ही) वार्ता ऐकली (त्याचा शब्द—) ध्वनि कानात शिरला, नष्ट होणाऱ्या त्या विरहाची धूळसुद्धा दिसली नाही

[ येथ, धूलडिआ मध्ये आ (डा) प्रत्यय आहे ]

अस्येदे ॥ ४३३ ॥

अपभ्रंशे स्त्रियां वर्तमानस्य नाम्नो योकारस्तस्य आकारे प्रत्यये परे इकारो भवति।

अपभ्रंशात स्त्रीलिंगात असणाऱ्या नामाचा (जो) अन्त्य अकार त्याचा आकार प्रत्यय पुढे असता इकार होतो उदा —

धूलडिआ वि न दिट्ठ। (४३२ १)

[ येथें, धूलडिआ मध्यें अकाराचा इकार झाला आहे ]

स्त्रियामित्येव। (नाम) स्त्रीलिंगी (असेल तरच हा नियम लागतो तसें नसल्यास हा नियम लागणार नाही उदा —)

झुणि कन्नडइ पइट्ठ। (४३२ १)

[ येथ, कन्नडइ मध्यें (स्त्रीलिंगा अभावीं) इकार झालेला नाही ]

युष्मदादेरीयस्य डार ॥ ४३४ ॥

अपभ्रंशे युष्मदादिभ्य परस्य ईयप्रत्ययस्य डार इत्यादेशो भवति।

अपभ्रंशात युष्मद् इत्यादींपुढे येणाऱ्या ईय प्रत्ययाचा आर (डार) असा आदेश होतो उदा —

संदेसें काईं तुहारेण जं संगहो न मिलिज्जइ।
सुइणंतरि पिएँ पाणिएँण पिअ पिआस किं छिज्जइ ॥ १ ॥

(सन्देशेन किं युष्मदीयेन यत्सङ्गाय न मिल्यते।
स्वप्नान्तरे पीतेन पानीयेन प्रिय पिपासा किं छिद्यते ॥)

(तुझा) संग मिळत नाही, (मग) तुझ्या संदेशाचा काय उपयोग? स्वप्नात प्यालेल्या पाण्याने (कधी) तहान भागते काय?

[ येथे, तुहार मध्यें आर (डार) आदेश आहे ]

दिहिअ अम्हारा कन्तु। (३४५ १)

बहिणि महारा कन्तु। (३५१ १)

[ येथे, अम्हार व महार मध्यें आर (डार) आदेश आहे ]

अतोर्डेत्तुल ॥ ४३५ ॥

अपभ्रंशे इदं किं यत् तदेतद्भ्य परस्य अतो प्रत्ययस्य डेत्तुल इत्यादेशो भवति ।

अपभ्रंशात इद्, किं, यद्, तद्, एतद् यापुढें येणाऱ्या 'अतु' प्रत्ययाचा एत्तुल (डेत्तुल) असा आदेश होतो उदा —

एत्तुलो । केत्तुलो । जेत्तुलो । तेत्तुलो । एत्तुलो ।
(इयान् । कियन् । यावन् । तावन् । एतावत् ।)

### त्रस्य डेत्तहे ॥ ४३६ ॥

अपभ्रंशे सर्वादे: सप्तम्यन्तात्परस्य त्रप्रत्ययस्य डेत्तहे इत्यादेशो भवति ।

अपभ्रंशात सर्वनामापुढे सप्तम्यर्थी येणाऱ्या 'त्र' प्रत्ययाचा एत्तहे (डेत्तहे) असा आदेश होतो उदा —

एत्तहे तेत्तहे वारि घरि लच्छि विसंठुल धाइ ।
पिअपब्भट्ठ व गोरडी निच्चल कहिँ वि न ठाइ ॥ १ ॥
(अत्र तत्र द्वारे गृहे लक्ष्मी विसंष्ठुला धावति ।
प्रियप्रभ्रष्टेव गौरी निश्चला क्वापि न तिष्ठति ॥)

येथें, तेथें, घरीं, दारीं (याप्रमाणें) चंचल लक्ष्मी फिरते, प्रियकरापासून वियुक्त झालेल्या सुंदरीप्रमाणें ती निश्चलपणें कोठेंहि रहात नाहीं
[येथें, एत्तहे व तेत्तहे मध्यें एत्तहे (डेत्तहे) हा आदेश आहे.]

### त्वतलोः प्पणः ॥ ४३७ ॥

अपभ्रंशे त्वतलोः प्रत्यययोः प्पण इत्यादेशो भवति ।

अपभ्रंशात त्व आणि त ल प्रत्ययांचा 'प्पण' असा आदेश होतो उदा —

वड्डप्पणु परि पाविअइ । (३६६ १)

[येथें, वड्डप्पणु मध्यें प्पण हा आदेश आहे ]

प्रायोधिकारात् ।

प्रायोधिकारामुळें (कधीं कधीं प्पण आदेश होत नाहीं उदा —)

वड्डत्तणहो तणेण । (३६६ १)

### तव्यस्य इएव्वउं एव्वउ एवा ॥ ४३८ ॥

अपभ्रंशे तव्यप्रत्ययस्य इएव्वउं एव्वउ एवा इत्येते त्रय आदेशा भवन्ति ।

अपभ्रंशात तव्य प्रत्ययाचे इएव्वउं, एव्वउ आणि एवा असे तीन आदेश होतात.

उदा —

( जित्वा अशेषं कषायबलं दत्वा अभयं जगतः ।
लात्वा महाव्रतं शिवं लभन्ते ध्यात्वा तत्त्वम् ॥ )

कषायरूपी सैन्य जिंकून, जगाला अभय देऊन, महाव्रत घेऊन, तत्त्वाचे ध्यान करून ( ऋषि ) आनंद ( शिव ) मिळवितात

[ येथे, जेप्पि मध्ये एप्पि, देप्पिणु मध्ये एप्पिणु, लेवि मध्ये एवि, आणि झाएविणु मध्ये एविणु, असे आदेश आहेत ]

पृथग्योग उत्तरार्थः ।

(या सूत्रात 'क्त्वा'चे चार आदेश) पृथक् सांगण्याचे कारण असे की (याच प्रत्ययाचा) पुढील सूत्रातहि उपयोग (करावयाचा आहे)

## तुम एवमणाणहमणहिं च ॥ ४४१ ॥

**अपभ्रंशे तुमः प्रत्ययस्य एवं अणं अणहं अणहिं इत्येते चत्वारः, चकारात् एप्पि एप्पिणु एवि एविणु इत्येते, एवं चाष्टावादेशा भवन्ति ।**

अपभ्रंशात तुम् प्रत्ययाचे एवं, अणं अणहं व अणहिं असे हे चार, (आणि सूत्रातील) चकारामुळे एप्पि, एप्पिणु, एवि, एविणु असे हे (चार), याप्रमाणे (एकूण) आठ आदेश होतात उदा :—

**देवं दुक्करु निअयधणु करण न तउ पडिहाइ ।**
**एम्वइ सुहु भुंजणहं मणु पर भुंजणहिं न जाइ ॥ १ ॥**
( दातुं दुष्करं निजकधनं कर्तुं न तपः प्रतिभाति ।
एवं सुखं भोक्तुं मनः परं भोक्तुं न याति ॥ )

स्वतःचे धन देणे दुष्कर आहे, तप करावे असे (कुणालाहि) वाटत नाही मनाला सुख भोगावे असे वाटते, पण भोगता (मात्र) येत नाही.

[ येथे, देवं मध्ये एवं, करण मध्ये अणं, भुंजणहं मध्ये अणहं, आणि भुंजणहिं मध्ये अणहिं, असे आदेश आहेत ]

**जेप्पि चएप्पिणु सयल धर लेविणु तवु पालेवि ।**
**विणु सन्तें तित्थेसरेण को सक्कइ भुवणे वि ॥ २ ॥**
( जेतुं त्यक्तुं सकलां धरां लातुं तपः पालयितुम् ।
विना शान्तिना तीर्थेश्वरेण कः शक्नोति भुवनेऽपि ॥ )

संपूर्ण पृथ्वी जिंकणे व (जिंकून) तिचा त्याग करणे, व्रत (तप) घेणे व (घेऊन) त्याचे पालन करणे, हे जगांत शांति तीर्थंकरांव्यतिरिक्त इतर कुणाला शक्य आहे?

## सामान्य उपसंहार

**व्यत्ययश्च ॥ ४४७ ॥**

**प्राकृतादिभाषालक्षणानां व्यत्ययश्च भवति ।**

आणि प्राकृत इत्यादि भाषांच्या लक्षणांचा व्यत्यय होतो

*यथा मागध्यां तिष्ठश्चिष्ठ ( ४ २९८ ) इत्युक्तं तथा प्राकृतपैशाचीशौरसेनीष्वपि* भवति । चिष्ठदि ।

*मागधीत* ' तिष्ठ ' चा ' चिष्ठ ' होतो असें जसें सांगितलें आहे, तद्वत् ( *माहाराष्ट्री* ) प्राकृत, पैशाची व शौरसेनी यामध्येंहि होतो ( उदा ) चिष्ठदि।

*अपभ्रंशे रेफस्याधो वा लुगुक्तो मागध्यामपि भवति ।*

अपभ्रंशात ( संयोगात ) पुढ असणारा र तसाच रहातो वा त्याचा लोप होतो, ( हा नियम ) मागधींतहि लागतो उदा –

**शदमाणुशमशभालके कुम्भशहश्र वशाहे शंचिदे, इत्याद्यन्यदपि द्रष्टव्यम्**

( शतमानुषमांसभारक कुम्भसहस्रवसाभिः संचितः ।)

—अशींच इतर उदाहरणे पहावींत

**न केवलं भाषालक्षणानां त्याद्यादेशानामपि व्यत्ययो भवति ।**

केवळ भाषालक्षणांतच व्यत्यय होतो असें नव्हे तर धातूंना लागणाऱ्या प्रत्ययांच्या आदेशाचाहि व्यत्यय होतो

**ये वर्तमानकाले प्रसिद्धास्ते भूतेऽपि भवन्ति ।**

जे वर्तमानकाळचे ( म्हणून प्रत्यय ) प्रसिद्ध आहेत ते भूतकाळांतहि लागतात उदा –

**अह पेच्छइ रहुतणओ । अथ प्रेक्षाचक्रे इत्यर्थः ।**

( अथ प्रेक्षांचक्रे रघुतनयः । ) नंतर रघुतनयानें पाहिलें

[ येथें, पेच्छइ हे प्रेक्षांचक्रे या अर्थी आहे ]

**आभासइ रयणीअरे । आबभाषे रजनीचरान् इत्यर्थः ।**

( राक्षसांना म्हणाला )

[ येथ, आभासइ हे आबभाषे या अर्थी आहे ]

**भूते प्रसिद्धा वर्तमानेऽपि ।**

# हेमचंद्रकृत अपभ्रंश व्याकरण
## टीपा

३२९ संस्कृतमधील शब्द अपभ्रंशात येतात त्यावेळीं त्या शब्दांमधील स्वरांच्या स्थानीं अपभ्रंशात प्राय इतर स्वर येतात –सूत्रात 'प्राय' म्हणण्याचें कारण असें —अपभ्रंशात ज्या शब्दांचीं रूपें विशेष म्हणून सांगितलीं आहेत त्या शब्दांचीं रूपेंसुद्धा कधींकधीं (माहाराष्ट्री) प्राकृत व शौरसेनी यातील रूपाप्रमाणें होतात.

३३० सूत्रातील 'सि' हें अक्षर प्रथमा एकवचन निदर्शक आहे सोईसाठीं विभक्ति–वचनाच्या पारिभाषिक संज्ञा पुढें दिल्या आहेत —

| विभक्ति | ए व | ब व (अ व) |
|---|---|---|
| प्र | सि | जस् (अस्) |
| द्वि. | अम् | शस् (अस्) |
| तृ | टा (आ) | भिस् |
| (च) | ङे (ए) | भ्यस् |
| प | ङसि (अस्) | भ्यस् |
| ष | ङस् (अस्) | आम् |
| स | ङि (इ) | सुप् (सु) |

३३० १ ढोल्ल (दे)—विट, नायक धण (स –धन्या)—प्रियाया धण आदेश, असें टीकाकार म्हणतो 'णाइ' (इव) साठीं सूत्र ४४४ पहा

३३० २ दड्ढ (दे)—शीघ्रम् [जु म –दड्वादड्वी (किरतपुराण १ २१ ३३)] 'रत्तडी' साठीं सूत्र ४३१ पहा 'करु' साठीं सूत्र ३८७ पहा 'तुहुं' साठीं सू. ३६८ पहा 'महुं' साठीं सूत्र ३७७ पहा

३३० ३ बिट्टी–मराठी व हिंदीतील बेटा, बेटी
'जिवँ (यथा) साठीं सूत्र ४०१ पहा

३३० ४ एइ (एते)—सू ३६३ एह (एषा)—सू. ३६२ एत्थु (अत्र) —सू ४०५

३३१ सूत्रातील उत् म्हणजे उ पहा —तपरस्तत्कालस्य । (सिद्धांतकौमुदी ११७०) याचप्रमाणें ओत् (सू. ३३२) म्हणजे ओ, इत् (सू ३३४) म्हणजे इ, एत् (सू ३३५) म्हणजे ए, उत् (सू. ३४०) म्हणजे उ असें जाणावयाचें

३३१ १ दइवि व्हइवि–सू. ४१९ पहा
२

३३२ सूत्रातील पुंसि म्हणजे पुल्लिंगे

३३२ १ ° निवट्टइ, छोक्कइ–सू. ३३१ पहा

३३१ २ घोअतिहे–सू. ३५० पहा. एम्वइ–सू. ४२० पहा, पिअ (प्रिय) हें षष्ठी ए. व चें रूप आहे सू. ३४५ पहा

३३३ १ दिअहडा–सू. ४२९–४३० पहा

ताण हे माहाराष्ट्री प्राकृतमध्यें षष्ठी अ व चें रूप आहे येथें त्याचा उपयोग द्वि अ व प्रमाणें केला आहे (हेम ३.१३४ पहा) दइएँ–सू. ३८२ पहा

३३४ १ तल्लई—लिंगभेदासाठीं सू. ४४५ पहा

३३५ प्राकृतांत हि, हिं, हिँ हे तृतीया अ व चे प्रत्यय आहेत अपभ्रंशांतील तृतीया अ व प्रत्ययांसाठीं सू. ३४७ पहा

३३६ १ गण्हइ—सू. ३९४ पहा जिवँ—सू. ३९७ व ४०१ पहा

३३८ १ किज्जउं—सू. ३८५ पहा

३३९ १ टीकाकाराच्या मतें —अन्योऽपि य प्रकार-द्वये कर्तृक्रमो भवति स विषम-स्थाने पतति । प्रकार द्वय किम् । प्रियते या शत्रून् जयति वेति भावार्थं । –सइ स्वयम्–रणिति–सू. ४३९ पहा

३४० १ येथें मुत्तु (मौक्त) हा शब्द पुल्लिंगांत वापरला आहे (सू. ४४५ पहा)—प्रायोऽधिकार प्राय म्हणजे कधी कधीं, बहुधा, इत्यादि.

३४० २ रिउवेरि, करवि या रूपांसाठीं सू. ४४० पहा दुहुँ–प्राकृत व अपभ्रंश यांत द्विवचन नसल्यानें द्विवचनाएवजी अनेकवचनाचा उपयोग केला जातो

३४१ १ नीसावँन्नु (नि सामान्यम्)–सू. ३९७ पहा —मेल्लिप्पिणु–सू. ४४० पहा

३४१ २ अग्गलउ–म –आगळा

३४१ ३ वि–सू. ४२० पहा

३४२ सू. ३३३ प्रमाणें तृतीया एकवचनांत 'ए' यतो सू. ३४२ नुसार या 'ए' वर अनुस्वार येतो वा त्याचेपुढें ण येतो

३४३ १ उम्हत्तण (उष्मत्व) हें भाववाचक नाम प्रकृतिमनाणें (हेम २.१५४) अपभ्रंश-प्रत्ययासाठीं सू. ४३७ पहा —जेवँ, तेवँ–सू. ४०१, ३९७ पहा

३४४ सूत्रांतील शुष् म्हणजे स्वर.

३४४ १ जिवँ सू. ४०१, ३९७ पहा

३४९.१ 'कर' ह्या स्थानीं 'किर' (= किल, खरोखर) असा पाठभेद प्रा. पिशेल यांनी स्वीकारला आहे.

३५०.१ 'तुच्छयर' हें त्या स्त्रीच्या प्रियकराचें संबोधन आहे, असें टीकाकार मानतो.-अक्खणहं-सू. ४४१ पहा.-कटरि हें अव्यय आश्चर्य दर्शवितें -विच्चि (वर्त्मनि)-सू. ४२१ पहा.

३५१.१ या श्लोकांत, लज्जेज्जंतु आणि एंतु या वर्तमानकालवाचक धातुसाधित विशेषणांच्या साहाय्यानें संकेतार्थ साधला आहे (हेम. ३.१८० पहा). भल्ल-म.-भला.

३५२.१ आपल्याकडे अशी एक समजूत प्रचलित आहे की घरावर बसून जर कावळा काव काव करीत असेल तर तें ओरडणं पाहुण्याचें आगमन सुचवितें. या श्लोकांत वर्णिलेली विरहिणी कावळ्याची काव काव ऐकते; पण प्रियकर येत असलेला मात्र तिला दिसत नाहीं. म्हणून ती (बहुधा) निराशेनें कावळ्याला हाकलून लावीत होती पण तितक्यांत तिला अचानक प्रियकर दिसतो. या घटनेचा परिणाम असा झाला —कावळ्याला हाकून लावण्याच्या क्रियेंत, विरहावस्थेंत कृश झालेल्या तिच्या हातांतून निम्म्या बांगड्या गळून जमिनीवर पडल्या. पण प्रियकराला पाहून झालेल्या आनंदानें तिचें शरीर-हातहि-फुगलें. त्यामुळें उरलेल्या बांगड्या (हाताला लहान होऊं लागल्यानें) कड्दिशी फुटल्या.

३५३ या सूत्रांत सांगितलेल्या इं प्रत्ययापूर्वी नपुं. नामाचा अन्त्य ऱ्हस्व स्वर विकल्पानें दीर्घ होतो (सू. ३३० पहा).

सूत्र ३३१ ते ३५४ पर्यंत अपभ्रंशातील नामाचा रूपविचार झाला आहे. सोईसाठीं हा सर्व रूपविचार येथें एकत्र दिला आहे.

अकारान्त पुल्लिंगी शब्द 'देव'

| विभक्ति | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. | देव, देवा, देवु, देवो | देव, देवा |
| द्वि. | देव, देवा, देवु | देव, देवा |
| तृ. | देवे, देवें, देवेण ( देविण ) ( देविं ) | देवहिं, देवेहिं |
| पं. | देवहे, देवहु | देवहुं |
| ष. | देव, देवसु, देवस्सु, देवहो, देवह | देव, देवहं |
| स. | देवे, देवि | देवहिं |
| सं. | देव, देवा, देवु, देवो | देव, देवा, देवहो. |

### इकारान्त पुल्लिंगी शब्द 'गिरि'

| | | |
|---|---|---|
| प्र. | गिरि, गिरी | गिरि, गिरी |
| द्वि. | गिरि, गिरी | गिरि, गिरी |
| तृ. | गिरिए, गिरिण, गिरिं | गिरिहिं |
| पं. | गिरिहे | गिरिहुं |
| ष. | गिरि, गिरिहे | गिरि, गिरिहं, गिरिहुं |
| स. | गिरिहि | गिरिहुं |
| सं. | गिरि, गिरी | गिरि, गिरी, गिरिहो. |

उकारान्त पुल्लिंगी शब्दाचीं रूपें 'गिरि' प्रमाणें होतात.

### अकारान्त नपुंसकलिंगी शब्द 'कमल'

| | | |
|---|---|---|
| प्र. द्वि. | कमल, कमला | कमल, कमला, कमलइं, कमलाइं. |

बाकीचीं रूपें अकारान्त पुल्लिंगी शब्दाप्रमाणें होतात.

### इकारान्त नपुंसकलिंगी शब्द 'वारि'

| | | |
|---|---|---|
| प्र. द्वि. | वारि, वारी | वारि, वारी, वारिइं, वारीइं. |

उरलेलीं रूपें उकारान्त पुल्लिंगी नामाप्रमाणें.

### उकारान्त नपुंसकलिंगी शब्द 'महु'

| | | |
|---|---|---|
| प्र. द्वि. | महु, महू | महु, महू, महुइं, महूइं |

बाकीचीं रूपें उकारान्त पुल्लिंगी नामाप्रमाणें.

### ककारान्त नपुंसकलिंगी शब्द 'तुच्छअ'

| | |
|---|---|
| प्र. द्वि. | तुच्छउं |

उरलेलीं रूपें 'कमल' प्रमाणें.

### आकारान्त स्त्रीलिंगी शब्द 'मुद्धा'

| | | |
|---|---|---|
| प्र. | मुद्ध, मुद्धा | मुद्धाउ, मुद्धाओ |
| द्वि. | मुद्ध, मुद्धा | मुद्धाउ, मुद्धाओ |
| तृ. | मुद्धए (मुद्धइ) | मुद्धहिं |

| | |
|---|---|
| प. मुद्दहे ( मुद्दहि ) | मुद्दहु |
| प. मुद्दहे ( मुद्दहि ) | मुद्दहु |
| स. मुद्दहि | मुद्दहिं |
| सं. मुद्द, मुद्दा | मुद्द मुद्दा, मुद्दहो, मुद्दाहो |

इकारान्त, ईकारान्त, उकारान्त आणि ऊकारान्त स्त्रीलिंगी शब्द 'मुद्दा' प्रमाणेंच चालतात

येथेंच, षड्भाषाचन्द्रिका यामध्यें सांगितलेला नामाचा रूपविचार तुलनेसाठीं मुद्दाम पुढें दिला आहे :—

### अकारान्त पुल्लिंगी 'राम' शब्द

| विभक्ति | ए व. | अ व |
|---|---|---|
| प्र | राम, रामा, रामु, रामो | राम, रामा |
| द्वि | राम, रामा, रामु, रामो | राम, रामा, रामि, रामे |
| तृ | रामें, रामें, रामेण | रामे, रामहिं, रामाहिं, रामेहिं |
| प | रामहे, रामाहे, रामहु, रामाहु | रामहु रामाहु |
| ष | राम, रामा, रामसु, रामासु<br>रामस्सु, रामहो, रामाहो | राम, रामा, रामह, रामाह |
| स | रामि, रामे | रामहिं, रामाहिं, रामसु, रामासु |
| स | राम, रामा, रामु रामो | रामहो, रामाहो |

### अकारान्त नपु 'कुड' शब्द

| | | |
|---|---|---|
| प्र | कुडु | कुडाइ, कुड, कुडे |
| द्वि | कुडु | कुडाइ, कुड, कुडे |
| सं. | कुडु | कुंडहो, कुडाहो. |

इतर रूपें अकारान्त पुल्लिंगी शब्दाप्रमाणें

### इकारान्त पुल्लिंगी 'कइ' शब्द

| | | |
|---|---|---|
| प्र. | कइ, कई | कइ कई, कइहो, कईहो |
| द्वि | कइ, कई | कइ, कई |
| तृ | कइण, कईण, कइएं, कईएं, कइ, कई | कइहिं, कईहिं |
| प | कइहे, कईहे | कइहु, कईहु |
| ष | कइ, कई | कइ, कई, कइह, कईह, कइहु, कईहु |
| स. | कइहि, कईहि, कइहु, कईहु | कइहिं, कईहिं |
| स. | कइ, कई | कइहो, कईहो |

### उकारान्त पुल्लिंगी 'कारु' शब्द

| | | |
|---|---|---|
| प्र | कारु, कारू | कारु, कारू कारुहो, कारूहो |
| द्वि | कारु, कारू | कारु, कारू |
| तृ | कारुण, कारूण, कारुएं, कारूएं, कारु, कारू | कारुहिं, कारूहिं |
| पं | कारुहे, कारूहे | कारुहुं कारूहुं |
| ष | कारु, कारू | कारु, कारू, कारुहं, कारूहं, कारुहुं, कारूहुं |
| स | कारुहि, कारूहि, कारुहुं, कारूहुं | कारुहिं, कारूहिं |
| सं | कारु, कारू | कारुहो, कारूहो |

### इकारान्त नपुं 'वारि' शब्द

| | | |
|---|---|---|
| प्र. द्वि | वारि | वारिइं |

इतर रूपें इकारान्त पुल्लिंगी शब्दाप्रमाणें

### आकारान्त स्त्रीलिंगी 'जाआ' शब्द

| | | |
|---|---|---|
| प्र | जाआ, जाअ, जाइ, जाइ | जाआउ, जाअउ, जाआओ, जाअओ, जाइउ, जाइउ, जाईओ, जाइओ |
| द्वि | ,, | ,, |
| तृ | जाआए, जाअए, जाआं, जाअं, जाईए, जाइए, जाइं, जइं, जाईएं, जाइएं | जाआहिं, जाअहिं, जाईहिं, जाइहिं |
| पं | जाआहे, जाअहे, जाईहे, जाइहे | जाईहु जाइहु, जाआहु, जाअहु |
| ष | जाआहे, जाअहे, जाइहे, जाइहे | जाआ, जाअ, जाई, जाइ |
| स | जाआहिं, जाअहिं, जाईहिं, जाइहिं | जाआहिं, जाअहिं, जाईहिं, जाइहिं |
| सं | जाआ, जाअ, जाई जाइ | जाआ, जाअ, जाई, जाइ जाआउ, जाअउ, जाआहो, जाअहो, जाईउ, जाइउ, जाईहो, जाइहो |

इकारान्त व ऊकारान्त स्त्रीलिंगी शब्दांची रूपें वरील 'जाई'च्या रूपाप्रमाणें होतात

३५५-३६७ या सूत्रांत अस्मद् (मी आम्ही) व युष्मद् (तू तुम्ही) ही दोन सर्वनामें सोडून, इतर सर्वनामांची जी विशिष्ट रूपें अपभ्रंशात होतात, ती सांगितलेली आहेत या वेगीळवी त्यांची इतर रूपें आपापल्या अन्त्यस्वरानुसार त्या त्या स्वरान्त नामाप्रमाणें होतात

येथच षड्भाषाचन्द्रिका यानध्यें सांगितलेल्या काही सर्वनामांचा रूपविचार तुलनेसाठी मुद्दाम पुढें दिला आहे —

## सव्व सर्वनाम पुल्लिंगी

| | | |
|---|---|---|
| प्र | सव्व, सव्वा, सव्वु, सव्वो | सव्व, सव्वा, सव्वे |
| द्वि | ,, ,, ,, | सव्व, सव्वा, सव्वि, सव्वे |
| तृ | सव्व, सव्वें, सव्वेण | सव्वे, सव्वहिं, सव्वाहिं, सव्वेहि |
| प | सव्वहु, सव्वाहु | सव्वहु, सव्वाहु |
| ष | सव्व, सव्वा, सव्वसु सव्वासु, सव्वस्सु, सव्वहो, सव्वाहो | सव्व, सव्वा, सव्वहं, सव्वाहं, सव्वेहिं |
| स | सव्वहिं सव्वाहिं | सव्वहिं, सव्वाहिं, सव्वसु, सव्वासु |

स्त्रीलिंगी 'सव्वा' अथवा 'साहा' 'आआ' प्रमाणें चालते

नपुं 'सव्व' हें 'कुड' प्रमाणें चालतें

यद् व तद् यांची पुल्लिंगातील 'ज' व 'त' हीं अंगें प्र ए व आणि द्वि ए. व सोडून इतरत्र पुल्लिंगी 'सव्व' प्रमाणें चालतात

त्यांचीं प्र ए व आणि द्वि ए व रूपें पुढीलप्रमाणें —

| | यद् | तद् |
|---|---|---|
| प्र व द्वि ए. व | ध्रु | ध्रुं |

यद् व तद् यांचीं 'जा' व 'ता' हीं स्त्रीलिंगी अंगें प ए व सोडून इतरत्र 'आआ' प्रमाणें चालतात पचमी एकवचनात त्यांचीं अनुक्रमें 'जहे' व 'तहे' अशीं रूपें होतात

### यद् नपु

| | | |
|---|---|---|
| प्र द्वि | ध्रुं ज | जाइं, जइ |

### तद् नपु

| | | |
|---|---|---|
| प्र द्वि | त्रु तं | ताइं, तइ |

उरलेलीं रूपें पुल्लिंगी 'ज' आणि 'त' प्रमाणें होतात

एतद् चें पुल्लिंगात 'एद' असें अंग होतें पुढें दिलेलीं रूपें सोडून इतरत्र 'एद' चीं रूपें पुल्लिंगी 'सव्व' प्रमाणें होतात :—

| | | |
|---|---|---|
| प्र | एद, एहो, एहु | एइ |
| द्वि | ,, ,, ,, | एइ |

एतद्चें स्त्रीलिंगात 'एदा' अंग होतें पुढील रूपें सोडून इतरत्र 'एदा' चीं रूपें 'आआ' प्रमाणें होतात

| | | |
|---|---|---|
| प्र द्वि | एह, एहो, एहु | एइ |

एतद् नपुं

| | | |
|---|---|---|
| प्र<br>द्वि | एहु, एहो, एहु | एइ, एइ, एदइ, एदाइ |

उरलेली रूपें पुल्लिंगी 'एद' प्रमाणें

अदस् चें 'अमु' असे पुल्लिंगी अंग होतें पुढील रूपें सोडून 'अमु' हें अंग 'काद' प्रमाणें चालतें —

प्र व द्वि. अ व ' ओइ.

अदस् नपु

| | | |
|---|---|---|
| प्र<br>द्वि | अमु | ओइ, अमुइ, अमूइ |

*उरलेली रूपें पुल्लिंगी 'अमु' प्रमाणें*

३५५ होंतउ हें हो (√भू) धातूचें स्वार्थे 'क' युक्त व का. धा वि चें रूप आहे होंतउ ची भवन् अशी संस्कृत छायाहि दिली गली आहे —जहा, तहा, कहां याची संस्कृत छाया यत, ततः, कुत अशीहि दिलेली आढळते (पिशेल, पृ १८९ पहा)

३५६ १ सहुं-सूत्र ४१९ पहा

३५७ २ या श्लोकात एका विरहिणीच्या स्थितीचें वर्णन आहे या श्लोकाचा भावार्थ असा —श्रावण-भाद्रपदातील पावसाच्या धारीप्रमाणें तिच्या डोळ्यातून अश्रु-धारा ओघळत होत्या, वसंत ऋतूतल्याप्रमाणें तिच्या बिछाना पल्लवाचा होता, शरद्-ऋतूतील मेघाप्रमाणें (अथवा काश-कुसुमाप्रमाणें) गाल पांढरे पडले होते, *ग्रीष्मातल्याप्रमाणें अंग तप्त होतें, शिशिर ऋतूतील कमलाप्रमाणें तिचें* मुखकमल कोमजलें होतें

—'*माहउ' या शब्दाची माधव व माघ अशी दोनहि प्रकारें संस्कृत छाया* होऊ शकेल (माधव-वसंत ऋतु, वैशाख गी ल को पृ ३७८)

३५७ ३ पइँ-सू ३७० पहा —*काइं-सू, ३६७ पहा*

३५८ १ महारउ-सू ४३४ पहा

३६१ १ वढ-सू ४२२ पहा. पच्छइ-सू ४२० पहा

३६५ १ येथें 'आइं सवँ' हा एक शब्द मानून त्याची 'जाति-स्मराणि' अशी *छाया अधिक बरी वाटते मउलिअहिं-सू, ३८२ पहा.*

३६५ ३ तुझ्नेसाठीं परमात्मप्रकाश २ १४७ पहा

३६६ १ काहीं शब्द भिन्न असलेल्या पुढील दोहा पहा .—

सयलु वि को वि तडप्फडइ सिद्धत्तणहु तणेण।

सिद्धत्तणु परि पावियइ चित्तह निम्मलएण ॥ पाहुडदोहा ८८

तडप्फडइ—म —तडफडणें —तणेण-सू ४२२ पहा वड्डप्पणु-सू ४३७ पहा.

३६७ कवण—गु. म —कवण चालू मराठींत कोण

३६७ ३ अणुहरहिं, रडहिं, नवहिं—सू ३८२ पहा. नवहिँ (नमन्ति)—सूत्र ३९७ पहा

३६७ ४ हा श्लोक म्हणजे एका विरही प्रियकराचे मेघाला उद्देशून बोल आहेत —गज्जहि-सू, ३८३ पहा

३६८ १ रुणझुण—म रुणझुणणें —रण्णडइ—अरण्य शब्दातील आद्य 'अ' चा लोप होऊन (हेम १ ६६ पहा) 'रण्ण' होतो 'रण्ण' ला स्वार्थे ड आणि अ हे प्रत्यय (सू ४२९ ४३० पहा) लागून रण्णडअ. त्याचें सप्तमी ए. व चें रूप 'रण्णडइ' (सू, ३३४)

३७० २ अन्य स्त्रीवर आसक्त झालेल्या नायकाला उद्देशून नायिकेचे उद्‌गार म्हणजे हा श्लोक

३७० ४ वेगला—म -वेगळा —कृदत—कृतान्त (सूत्र ३९६ पहा) द्वि ए. व. तइ चें उदाहरण :—

तईं गेउ अक्खउ ठाणु । कुमारपालचरित्त ८ ३२

३७१ १ तेवड्डउ—सू, ४०७ पहा.

३७६ १ एक योद्धा रणांगणावर जाताना आपल्या प्रियेला उद्देशून हे बोल बोलत आहे —पम्व—सू, ४१८ पहा.

३७६ २ एक विरहिणी प्रवासाला गेलेल्या आपल्या प्रियकराबद्दल हे शब्द बोलत आहे

—अवस—सू. ४२७ पहा

३७९ १ आलु—मिथ्या, अलीक, अनर्थक म -आळ.—हेल्लि—सू, ४२२ पहा

३७९ २ या श्लोकांतील 'तो' ची संस्कृत छाया सू, ४१७ नुसार तदा वा तत अशी होईल डॉ वैद्य संपादित पुस्तकात ती 'तत्' अशी आढळते. —पारक्कड—पारक्क—परकीय (हेम २ १४८) नंतर सू, ४२९ नुसार स्वार्थे प्रत्यय.

३६८-३८१ या सूत्रात अस्मद् व युष्मद् या दोन सर्वनामांचा अपभ्रंशातील रूप-विचार आला आहे ही रूपें एकत्र पुढें दिलीं आहेत —

### युष्मद्

| विभक्ति | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. | तुहुं | तुम्हे, तुम्हइं |
| द्वि. | पइं, तइं | तुम्हे, तुम्हइं |
| तृ. | पइं, तइ | तुम्हेहिं |
| पं. | तउ, तुज्झ, तुध्र | तुम्हहं |
| ष. | तउ, तुज्झ, तुध्र | तुम्हहं |
| स. | पइं, तइं | तुम्हासु |

### अस्मद्

| विभक्ति | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. | हउं | अम्हे, अम्हइं |
| द्वि. | *मइ* | *अम्हे, अम्हइं* |
| तृ. | मइं | अम्हेहिं |
| पं. | महु, मज्झु | अम्हहं |
| ष. | महु, मज्झु | अम्हहं |
| स. | मइ | अम्हासु. |

षड्भाषाचन्द्रिका या ग्रथात दिलेलीं अस्मद् व युष्मद् चीं रूपें तुलनेसाठीं मुद्दाम पुढें दिलीं आहेत :—

### युष्मद्

| विभक्ति | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. | तुहु | तुम्हे, तुम्हइ |
| द्वि. | पइं, तइं | ,, ,, |
| तृ. | ,, ,, | तुम्हेहिं |
| प. | तुज्झ, तुध्र, तउ, तुह, तओ | तुम्हहं |
| ष. | ,, ,, ,, ,, ,, | ,, |
| स. | पइं, तइ | तुम्हासु. |

### अस्मद्

| विभक्ति | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. | हउ | अम्हइं, अम्हेइं |
| द्वि. | मइ | ,, ,, |

| | | |
|---|---|---|
| तृ | मइं | अम्हेहिं |
| प | महु, मज्झु | अम्हहं |
| ष | ,, ,, | |
| स | मइं | अम्हासु. |

३८१-३८८ या सूत्रात अपभ्रंशातील धातु-रूप-विचार आलेला आहे अपभ्रंशातील धातु-रूप-विचार हा बराचसा महाराष्ट्री प्राकृतातील धातु-रूप-विचाराप्रमाणेच आहे फक्त, वर्तमानकाळ, आज्ञार्थ द्वि पु ए व, आणि भविष्यकाळ यात मात्र जो थोडासा फरक आहे, तो या सूत्रात सांगितला गेला आहे

३८२ संस्कृतात परस्मैपदाचे

| | | | |
|---|---|---|---|
| मि | वस् | मस् | |
| सि | थस् | थ | |
| ति | तस् | अन्ति | असे प्रत्यय आहेत |

त्यातील ति या प्रत्ययाला धरून त्यादि ही संज्ञा

३८३ १ बप्पीह्-चातक —*या श्लोकात* 'पिउ' *हा शब्द श्लिष्ट* आहे स्त्रीचे बाबतीत 'प्रिय', व चातकाचे बाबतीत 'पिबामि' यासाठी तो योजिलेला आहे—चातक हा फक्त मेघातून पडणारे पाणी पितो, भूमीवरील पीत नाही, *असा कविसंकेत आहे* —कित्तिउ-कियत्-( हेम २ १५७ पहा )

३८३ २ लहहि—लभसे संस्कृतमध्ये लभ् हा धातु आत्मनेपदी आहे सप्तमी म्हणजे विध्यर्थ

३८५ १ छुडु—यदि ( सू. ४२२ पहा )

३८६ १ विणु—सू ४२६ पहा

३८२-३८६ यांत वर्तमानकाळी अपभ्रंशात लागणारे जे अधिक प्रत्यय सांगितले आहेत, त पुढीलप्रमाणे —

| पुरुष | ए व | अ व |
|---|---|---|
| प्र पु | उ | हुं |
| द्वि पु | हि | हु |
| तृ पु | — | हिं |

३८७ अपभ्रंशात आज्ञार्थ द्वि पु एकवचनात लागणारे प्रत्यय या सूत्रात सांगितलेले आहेत ते असे —इ उ, ए. —संस्कृतमध्ये हि आणि स्व हे *आज्ञार्थ द्वि पु ए व चे प्रत्यय आहेत —पंचमी म्हणजे आज्ञार्थ*

३८७ २ जाम (यावत्) —सू. ४०६ पहा

३८७-३ एम्वहिँची संस्कृत छाया एवमेव अशी डॉ. वैद्य संपादित पुस्तकात आढळते पण सू. ४२० नुसार एम्वहिँ ची संस्कृत छाया इदानीम् अशी होईल —बप्पुडा —म —बापडा, बापुडा

३८८ संस्कृतात 'स्य' हे भविष्यकाळाचें चिह्न आहे

३८८ १ झडप्पड —म —झटपट

३८९ क्रिये हें कृ धातूचें कर्मणि वर्तमानकाल प्र पु ए व चें रूप आहे

३८९ १ योग्याकार शब्द फरकानें आढळणारा पुढील श्लोक पहा —
सता विसय जु परिहरइ बलि किज्जउँ हउँ तासु ।
सो दइवण जि मुंडियउ सीसु खडिल्लउ जासु ॥ परमात्मप्रकाश २ १३९

३९१ १ श्रीकृष्णाच्या उपस्थितीनें दुर्योधन गोंधळून गेला होता इतका की दोघांची भाषणें झाल्यानंतर तो भानावर आला

३९५ १ सरिसिम-सहस्नाता, सहस्नात (हेम २ १५४ पहा)
—छोल्ल (तक्ष्) —म -छोलणें

३९५ २ चूडुल्लउ .—सू. ४२९ पहा —झलक्क :—म -झळकणें

३९५ ३ सर्वाशन-रिपु-संभव —सर्व-भक्षक म्हणजे अग्नि (वडवानल), त्याचा शत्रु म्हणजे पाणी (समुद्र), त्यातून निर्माण झालेला म्हणजे चंद्र.

३९५ ४ खुड्डुक्क —म -खटकणें, खुडुक (होऊन बसणें) -घुडुक्क —म -गडगडणें —पवासुअ (प्रवासिक प्रवासिन्) —हेम १ ४४ पहा

३९५ ६ बप्पीकी-बापाची पहा बापिकें (ज्ञानेश्वरी १२६७)-चप —म -चापणें, चोपणें

३९५-७ तेत्तिउ —हेम २-१५७ पहा —तेवड्डु —सू. ४०७ पहा —घुडुअइ ऐवजीं धुद्धुअइ असाहि एक पाठ आढळतो

३९६ शौरसेनींतहि अनादि असंयुक्त त चा द होतो (हेम ४ २६०)

३९७ म -ग्राम-गाव, नाम-नाव, इ -लाक्षणिक —म्हणजे (वर) सांगितलेल्या लक्षणानीं सिद्ध झालेले तद्भव शब्द —जिवँ, तिवँ, जेवँ, तेवँ —सू. ४०१ पहा

३९९ व्यासेण वि भारह खंभि बद्धं । (व्यासेना प भारत स्तम्भे बद्धम् ।) असा एक पाठभेद आहे —व्यासानें सुद्धा भारत स्तंभात ग्रथित केलें

४०१ डित् (ड् + इत्) म्हणजे ज्यातील ड् हा इत् आहे आणि इत् म्हणजे जो येतो व आपलें कार्य करून निघून जातो तो (एति गच्छति इति इत्, स्वकार्यं कृत्वा विनश्यत्, इत्यर्थः ।) [प्रत्ययांत आद्य असणारे चु (म्हणजे च्, छ, ज,

द्, श्) आणि ट् (म्हणज ट्, र्, ड्, दे, ण्) हे इत् असतात.—प्रत्ययाद्यौ चुटू इतो स्तः। सि. कौ. १·३·७). हे डित् प्रत्यय शब्दाना लागताना, शब्दातील अन्त्य स्वरासह पुढील सर्व वर्ण लोप पावतात (डिति परे भस्य टेर्लोपः स्यात्। सि. कौ. ६·४·१४३, तथैव डित्त्वसामर्थ्यादभस्यापि टेर्लोपः। सि. कौ. २·४८५). टि म्हणजे एकाद्या शब्दातील स्वरामध्ये जो अन्त्य स्वर असतो, तो धरून पुढील सर्व वर्णांचा समूह (अचोऽन्त्यादि टि। अचामध्ये योऽन्त्यः स आदिर्यस्य तट्टिसंज्ञं स्यात्। सि. कौ. १·१·६४).

४०७ यावद्–जेवड; तावद्–तेवड.-म.–जवढा, तेवढा, गुजराती–जेवडुं, तेवडुं.

४०८ एवड्, केवड् :—म.–एवढा, केवढा

४०९·१ गजिउ :—म.–गाजलेला, गाजणे.

४१४·२ थोड्याफार शब्द–फरकानें आढळणारा पुढील श्लोक पहा .—

अलइ णिरामइ परमगइ अज्ज वि लउ ण लहंति।
भग्गी मणह ण भंतडी तिम दिवहडा गणंति॥ पाहुडदोहा १६९.

४१५·१ कहंतिहु :—सू. ४१६ पहा

४१६·१ छुरहा :—म –क्षार, क्षोपडी

४१८·१ वैद्य–संपादित पुस्तकात 'कउ' व 'परोक्खहो' याची 'कथं' व 'परोक्षे' अशी संस्कृत छाया आढळते पण सूत्र ४१६ व ३३८ नुसार कुतः आणि परोक्षस्य अशी संस्कृत छाया होईल

४१८·३ 'काइं'ची कथ अशी संस्कृत छाया दिली गेली आहे. पण सू. ३६७ नुसार किम् अशी संस्कृत छाया होईल

४१८·४ 'तो'ची संस्कृत छाया सू. ४१७ नुसार 'तत.' अथवा 'तदा' अशी होईल.

४१८·५ थोड्याफार शब्द–फरकानें आढळणारी पुढील ओळ पहा .—
जिम लोणु विलिज्जइ पाणियहं। पाहुडदोहा १७६

४१९ खोडी :-म.–खोड, खोडी.

४२०·३ पचलिओ हा पाठ वैद्य–संपादित पुस्तकात स्वीकारला गेला आहे.—नवली .–सू. ४२२ पहा

४२२·३ विट्टाल :–म.–विटाळ

४२२ ११ या श्लोकात शरीराचें रूपकात्मक वर्णन आहे. येथें पाच म्हणजे पाच इंद्रियें.—कुडुल्ली–सू. ४२९ पहा.

४२२ १४ दडवड :–जु म.–दडवादडवी (शिवपुराण १·२३·३३).

४२३ ४ उळवईस :–म –ऊठ‌अेस

४२५ तेहिं व रेसिं चीं उदाहरणें —

वड्डि कसु रेसिं तुहुँ अवर कम्मारम करेसि। **कुमारपालचरित** ८ ७०, वसु तेहिं परिगहु। **कुमारपालचरित** ८ ७१

४२७ १ थोड्या-फार शब्द फरकानें आढळणारा पुढील श्लोक पहा :—

पचहँ णायकु वसि करहु जेण होंति वसि अण्ण।
मूल विणट्ठइ तरुवरहँ अवसइँ सुक्कहिं पण्ण॥ **परमात्मप्रकाश** २ १४०

४३३ धूलडिआ—धूलि + अड = धूल् + अड = धूलड
नतर, धूलड + आ = धूलडि + आ = धूलडिआ

४३४ ईय हा मत्वर्थी प्रत्यय आहे

४३६ धाइ ची मराठि अशी संस्कृत-छाया वैद्य-संपादित पुस्तकांत आहे

४३७ त्व आणि तल् (ता) हे संस्कृतमध्यें भाववाचक नामें सिद्ध करण्याचे प्रत्यय आहेत

४३८ तव्य—विध्यर्थी कर्मणि धातुसाधित विशेषण सिद्ध करण्याचा प्रत्यय

४३८ १ टीकाकाराच्या मतें, विद्यासिद्धीसाठीं कोणा एका सिद्ध पुरुषानें नायिकेला धन इत्यादि देऊन तिचा भर्ता मागितला, तेव्हा ती हे शब्द उच्चारीत आहे

४३९ क्त्वा—पूर्वकालवाचक धातुसाधित अव्ययें सिद्ध करण्याचा प्रत्यय

४३९ १ अम्हहिं चें स्थानीं अम्हह अम्हहि पाठभेद आढळतो

४३९ २,३ या श्लोकात, मुंज शब्दानें मुंज नांवाचा माळव्याचा राजा, अथवा मुंज नावाचा चालुक्य राजाचा एक मंत्रि अभिप्रेत आहे, असें काहींचें म्हणणें आहे

४४० १ जैनधर्मांत *क्रोध, मान, माया व लोभ यांना कषाय म्हणतात*

४४१ तुम्—हेत्वर्थक धातुसाधित अव्ययें (तुमन्त) सिद्ध करण्याचा प्रत्यय

४४३ तृन् (–तृ)–धातूंपासून कर्तृवाचक नामें सिद्ध करण्याचा प्रत्यय

४४८ १ गउडवह १५.

## सूत्र-सूची


| सूत्र | सूत्र-क्रमांक |
|---|---|
| अ-डड-डुल्ला. स्वार्थिक-क-लुक् च | ४२९ |
| अतो डसेः | ४०३ |
| अतोर्डेत्तुलः | ४३५ |
| अदस ओइ | ३६४ |
| अनादौ स्वरादसंयुक्तानाम्— | ३९६ |
| अन्त्य-त्र्यस्याद्यस्य उं | ३८५ |
| अन्यादृशोन्नाइसावराइसौ | ४१३ |
| अभूतोऽपि क्वचित् | ३९९ |
| अम्हह भ्यसाम्भ्याम् | ३८० |
| अम्हेहिं भिसा | ३७८ |
| अवश्यमो डें-डौ | ४२७ |
| अस्येदे | ४३३ |
| आद्गो णानुस्वारौ | ३४२ |
| आन्तान्ताड्डाः | ४३२ |
| आपद्विपत्सम्पदां द इः | ४०० |
| आमन्त्र्ये जसो हो | ३४६ |
| आमो हं | ३३९ |
| इदम आय. | ३६५ |
| इदम इमुः क्लीबे | ३६१ |
| इवार्थे नं-नउ-नाइ— | ४४४ |
| ए चेदुतः | ३४३ |
| एइर्जस्-शसोः | ३६३ |
| एकशसो डि | ४२८ |
| एट्टि | ३३३ |
| एतदः स्त्री-पु-क्लीबे | ३६२ |
| एत्थु कुत्रात्रे | ४०५ |
| एप्येप्पिण्वेव्येविणवः | ४४० |
| एवं-परं-समं-ध्रुवं-मा— | ४१८ |
| कथं-यथा-तथां थादे- | ४०१ |
| कादि-स्थैदोत्तोदुच्चार-लाघवम् | ४१० |
| किमः काइ-कवणौ वा | ३६७ |
| किमो डिहे वा | ३५६ |
| किलाथवा-दिवा-सह-नहेः | ४१९ |
| कुतसः कउ कहंतिहु | ४१६ |
| क्त्व इ-इउ-इवि-अवयः | ४३९ |
| क्रिये कीसु | ३८९ |
| क्लीबे जस्-शसोरिं | ३५३ |
| गमेरेप्पिण्वेप्प्योरेर्लुग् वा | ४४२ |
| ग्रहेर्गृण्हः | ३९४ |
| घइमादयोनर्थकाः | ४२४ |
| जस्-शसोरम्हे अम्हइं | ३७६ |
| जस्-शसोस्तुम्हे तुम्हइं | ३६९ |
| ङसः सु-हो-स्सवः | ३३८ |
| ङसि-ङस्भ्यां तउ तुज्झ तुध्र | ३७२ |
| ङसि-भ्यस्-ङीनां हे-हुं-हयः | ३४१ |
| ङसेर्हे-हू | ३३६ |
| ङस्-ङस्योर्हे | ३५० |
| ङिनेच्च | ३३४ |
| डेर्हिं | ३५२, ३५७ |
| ट ए | ३४९ |
| टा-ङयमा पइं तइं | ३७० |
| टा-ङयमा मइं | ३७७ |
| तक्ष्यादीनां छोल्लादयः | ३९५ |
| ततस्तदोस्तोः | ४१७ |
| तव्यस्य इएव्वउं एव्वउं एवा | ४३८ |
| तादर्थ्ये केहिं-तेहिं-रेसि-रेसिं-तणेणाः | ४२५ |

तुम एवमणाणहमणहिं च ४४१
तुम्हासु सुपा ३७४
तृनोणअः ४४३
त्यादेराद्य-त्रयस्य— ३८२
त्रस्य डेत्तहे ४३६
त्व-तलोः प्पणः ४३७
दृशेः प्रस्सः ३९३
पदान्ते उं-हुं-हिं-हंकाराणाम् ४११
परस्परस्यादिरः ४०९
पश्चादेवमेवैवेदानीं-प्रत्युतेतसः ४२०
पुनर्विनः स्वार्थे डुः ४२६
प्रायसः प्राउ-प्राइव-प्राइम्व-
 पग्गिम्वाः ४१४
बहुत्वे हुः ३८४
बहुत्वे हु ३८६
ब्रुगो ब्रुवो वा ३९१
भिसा तुम्हेहिं ३७१
भिस्येद्वा ३३५
भिस्सुपोर्हि ३४७
भुवः पर्यासौ हुच्चः ३९०
भ्यसामोर्हुः ३५१
भ्यसाम्भ्या तुम्हहं ३७३
भ्यसो हु ३३७
मध्यत्रयस्याद्यस्य हिः ३८३
महु मज्झु ङसि-ङस्भ्याम् ३७९
मोऽनुनासिको वो वा ३९७
म्हो म्भो वा ४१२
युष्मदादेरीयस्य डारः ४३४
लिङ्गमतन्त्रम् ४४५
वर्त्स्यति-स्यस्य सः ३८८
वाधो रो लुक् ३९८
वान्ययोनुः ४१५
वा यत्तदोतोर्डेवडः ४०७
विषण्णोक्त-वर्त्मनो वुन्न-वुत्त-
 विच्चं ४२१
वेदं-किमोर्यादेः ४०८
व्यत्ययश्च ४४७
व्रजेर्वुञः ३९२
शीघ्रादीनां वहिल्लादयः ४२२
शेषं संस्कृतवत् सिद्धम् ४४८
शौरसेनीवत् ४४६
षष्ठ्याः ३४५
सर्वस्य साहो वा ३६६
सर्वादेर्ङसेर्हां ३५५
सावस्मदो हउं ३७५
सुपा अम्हासु ३८१
सौ पुंस्योद्वा ३३२
स्त्रिया जस्-शसोरुदोत् ३४८
स्त्रिया डहे ३५०
स्त्रिया तदन्ताड्डीः ४३१
स्यमोरस्योत् ३३१
स्यम्-जस्-शसां लुक् ३४४
स्यादौ दीर्घ-ह्रस्वौ ३३०
स्वराणां स्वराः प्रायोऽपभ्रंशे ३२९